THE OFFICER
Your Personal Mentor

We have been Recognised By...

Stanford | Seed
Stanford Institute for Innovatio in Developing Economies

# चालू घडामोडी जुलै 2024




- आसियान परिषद : 2024
- 2024 च्या स्वातंत्र्यदिनाची थीम: 'विकसित भारत'
- अर्थसंकल्प 2024-25
- हिल्या स्वयंचलित ट्रान्शिपमेंट बंदराच्या टर्मिनलचे उद्घाटन
- सुजाता सौनिक राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव

The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16

9665666195 / 9665288834


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
वैकल्पिक विषय
समाजशास्त्र
विषयाचे महाराष्ट्राचे एकमेव तज्ज्ञ मार्गदर्शक
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
Main Course - By Covering all Micro Topics Of Syllabus
Assignments - 650+ प्रश्नांचा उत्तर लेखन सराव
1:1 Personal Mentoring
अमर्याद Watch Time
Target Oriented Monthly & Weekly Schedule
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
अधिकारी वर्गाशी संवाद
Regular Evalauation & Critical Feedback By Amol Sir
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
ACHIEVE SOCIOLOGY EXCELLENCE IN LESS THAN
90 Days!
DOWNLOAD OUR FREE APP
BATCH START 9 SEP 2024
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834
THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
INTENSIVE LEARNING PROGRAM
1 Year Course

THE OFFICER
Your Personal Mentor


# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| 1. भारत व जग | 4 |
| 2. राजकीय व घटनात्मक | 18 |
| 3. आर्थिक | 22 |
| 4. नियुक्ती | 32 |
| 5. दिनविशेष | 40 |
| 6. विज्ञान व तंत्रज्ञान | 55 |
| 7. निधन | 69 |
| 8. कृषी व पर्यावरण | 77 |
| 9. सामाजिक व शैक्षणिक | 85 |
| 10. विविधा | 96 |
| 11. क्रीडा | 98 |
| 12. पुरस्कार | 113 |
| 13. संरक्षण व सुरक्षा | 121 |
| 14. आरोग्य व पोषण | 126 |



# 1. भारत व जग

## मसूद पेझेश्कियान विजयी



- इराणमध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुधारणावादी नेते मसूद पेझेश्कियान विजयी झाले असून त्यांनी कट्टर मूलतत्त्ववादी नेते सईद जलिली यांचा पराभव केला.
- पेझेश्कियान यांनी पाश्चात्त्य देशांशी संबंध सुधारण्याचे तसेच इराणमधील महिलांना केस झाकणे अनिवार्य करणाऱ्या हिजाबसंबंधी कायद्याच्या तरतुदी शिथिल करण्याचे आश्वासन दिले आहे.
- पेझेश्कियान हे हृदयरोगतज्ज्ञ आहेत.
- पेझेश्कियान यांना 1 कोटी 63 लाख मते मिळाली, तर जलीली यांना एक कोटी 35 लाख मते मिळाली.
- देशभरात सुमारे तीन कोटी नागरिकांनी मतदान केले होते.

**मसूद पेझेश्कियान**

✓ **जन्म:** 29 सप्टेंबर, 1954 (वय 69)महाबाद, इराण

✓ पेझेश्कियान यांनी इराणच्या संसदेत ताब्रीझ , ओस्कू आणि अझरशहर निवडणूक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले आणि 2016 ते 2020 पर्यंत त्याचे पहिले उपसभापती म्हणूनही काम केले.

- ✓ मोहम्मद खतामी यांच्या सरकारमध्ये 2001 ते 2005 दरम्यान ते आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री होते .
- ✓ 1980 च्या दशकात पेझेश्कियान यांची पश्चिम अझरबैजान प्रांतातील पिरानशहर आणि नागदेह काउंटीचे गव्हर्नर म्हणून निवड झाली .
- ✓ **राजकीय पक्ष :** स्वतंत्र

## रेचेल रिव्ह पहिल्या महिला अर्थमंत्री



- रेचेल रिव्ह यांना कीर स्टार्मर यांना अर्थमंत्री म्हणून नियुक्त केले आहे.
- त्या ब्रिटनच्या पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत. तसेच डेव्हिड लॅमी यांना हे परराष्ट्र मंत्री म्हणून नियुक्त केले आहे.
- ब्रिटनच्या उपपंतप्रधान म्हणून अंजेला रेनर यांची निवड करण्यात आली.
- भारतीय वंशांच्या लिसा नंदी यांचाही मंत्रिमंडळात समावेश
- वायव्य ब्रिटनच्या विगन संसदीय क्षेत्रातून प्रचंड मतांनी विजयी होणाऱ्या भारतीय वंशांच्या लिसा नंदी यांना संस्कृती, माध्यम आणि क्रीडा मंत्री म्हणून नियुक्त केले आहे.

**लिसा नंदी यांच्याविषयी...**

- ✓ लिसा नंदी यांचे वडील दीपक नंदी हे इंग्रजीचे नामांकित प्राध्यापक आणि ते 1956 मध्ये ब्रिटनला स्थलांतरित झाले होते.
- ✓ ते मूळचे पश्चिम बंगालचे होते.
- ✓ लिसा नंदी यांचे शालेय शिक्षण पार्सवूड स्कूल आणि होलीक्रॉस महाविद्यालयात झाले.
- ✓ त्यांनी लंडन विद्यापीठात उच्च शिक्षण घेतले आहे.
- ✓ लिसा नंदी यांनी कारर्किदीच्या प्रारंभी मजूर पक्षाचे खासदार नील गेरार्ड यांच्यासमवेत काम केले आहे.

## रशिया-भारत आर्थिक क्षेत्रांच्या विकासाबाबत संयुक्त निवेदन



- रशिया आणि भारत यांच्यात मॉस्को येथे 8-9 जुलै 2024 रोजी पार पडलेल्या 22 व्या वार्षिक द्विपक्षीय शिखर परिषदेनंतर, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय व्यावहारिक सहकार्याच्या विद्यमान मुद्द्यांवर आणि रशिया-भारत विशेष आणि विशेषाधिकार धोरणात्मक भागीदारीच्या विकासाबाबत विचारांचे आदानप्रदान केले.
- परस्पर आदर आणि समानतेच्या तत्त्वांचे दृढतेने पालन करून, परस्पर फायदेशीर आणि दीर्घकालीन आधारावर दोन्ही देशांचा सार्वभौम विकास, रशिया-भारत व्यापार आणि आर्थिक सहकार्याला चालना देऊन द्विपक्षीय परस्पर संवादाला अतिरिक्त प्रोत्साहन देणे, दोन्ही राज्यांमधील वस्तू आणि सेवांमधील व्यापाराच्या गतिमान वाढीचा कल कायम ठेवण्याच्या आणि 2030 पर्यंत लक्षणीय वाढ सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने खालील घोषणा केल्या :

✓ भारत आणि रशिया यांच्यातील द्विपक्षीय व्यापाराशी संबंधित बिगर – आयात शुल्क व्यापार अडथळे दूर करणे.

✓ 2030 पर्यंत (परस्पर सहमतीनुसार) संतुलित द्विपक्षीय व्यापार साध्य करण्यासाठी भारताकडून वस्तूंच्या वाढीव पुरवठ्यासह 100 अब्ज अमेरिकी डॉलर्सपेक्षा जास्त द्विपक्षीय व्यापार साध्य करणे.

✓ विशेष गुंतवणूक व्यवस्थांच्या चौकटीत उभय देशांच्या गुंतवणूक उपक्रमांचे पुनरुज्जीवन.

✓ राष्ट्रीय चलनांचा वापर करून द्विपक्षीय सेटलमेंट प्रणाली विकसित करणे. परस्पर सेटलमेंटमध्ये डिजिटल आर्थिक साधनांचा सातत्यपूर्ण वापर.

- ✓ उत्तर-दक्षिण आंतरराष्ट्रीय वाहतूक कॉरिडॉर, नॉर्दर्न सी रूट आणि चेन्नई-व्लादिवोस्तोक सी लाइनचे नवीन मार्ग सुरू करून भारतासोबत मालवाहतूक वाढवणे.
- ✓ वस्तूंच्या निर्बाध वाहतुकीसाठी डिजिटल प्रणाली वापरून सीमाशुल्क प्रक्रिया अधिक सर्वोत्तम बनवणे.
- ✓ कृषी उत्पादने, अन्न आणि खतांमध्ये द्विपक्षीय व्यापाराच्या प्रमाणात वाढ करणे.
- ✓ पशुवैद्यकीय, स्वच्छताविषयक आणि फायटोसॅनिटरी प्रतिबंध आणि बंदी काढून टाकण्याच्या उद्देशाने गहन संवाद जारी ठेवणे
- ✓ अणुऊर्जा, तेल शुद्धीकरण आणि पेट्रोकेमिकल्स यासह प्रमुख ऊर्जा क्षेत्रांमध्ये सहकार्याचा विकास आणि ऊर्जा पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि उपकरणे या क्षेत्रातील सहकार्य आणि भागीदारीचे स्वरूप विस्तारणे.
- ✓ जागतिक ऊर्जा संक्रमणाची शक्यता लक्षात घेऊन परस्पर आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेची सुविधा उपलब्ध करणे.
- ✓ पायाभूत सुविधांचा विकास, वाहतूक अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल उत्पादन आणि जहाज बांधणी, अंतराळ आणि इतर औद्योगिक क्षेत्रातील परस्परसंवाद मजबूत करणे.
- ✓ उपकंपन्या आणि औद्योगिक क्लस्टर उभारून भारतीय आणि रशियन कंपन्यांना परस्परांच्या बाजारपेठेत प्रवेशाची सुविधा देणे.
- ✓ मानकीकरण, मापनशास्त्र आणि अनुरूपता मूल्यांकन या क्षेत्रातील उभय पक्षांच्या दृष्टिकोनांचे अभिसरण करणे.
- ✓ डिजिटल अर्थव्यवस्था, विज्ञान आणि संशोधन, शैक्षणिक देवाणघेवाण आणि उच्च तंत्रज्ञान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी इंटर्नशिपच्या विविध क्षेत्रातील गुंतवणूक आणि संयुक्त प्रकल्पांना प्रोत्साहन देणे.
- ✓ अनुकूल वित्तीय व्यवस्था प्रदान करून नवीन संयुक्त (उपकंपनी) कंपन्यांच्या निर्मितीची सुविधा देणे.

✓ औषधे आणि प्रगत वैद्यकीय उपकरणांचा विकास आणि पुरवठ्यामध्ये नियोजनबद्ध सहकार्याला प्रोत्साहन देणे.

✓ रशियामध्ये भारतीय वैद्यकीय संस्थांच्या शाखा उघडण्याच्या आणि पात्र वैद्यकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच वैद्यकीय आणि जैविक सुरक्षेच्या क्षेत्रात समन्वय मजबूत करण्याच्या संधींचे अवलोकन करणे.

✓ मानवतावादी सहकार्याचा विकास, शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, संस्कृती, पर्यटन, क्रीडा, आरोग्यसेवा आणि इतर क्षेत्रातील परस्परसंवादाचा सातत्यपूर्ण विस्तार करणे.

**भारतीयांच्या सुटकेस रशिया अनुकूल...**

❖ रशियाच्या सैन्यामध्ये सहाय्यक कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या सर्व भारतीयांची सुटका करण्याचे आणि त्यांचे प्रत्यार्पण करण्याचे रशियाने व्यापकपणे मान्य केले आहे.

❖ अनेक भारतीय तरुणांना नोकरी किंवा शिक्षणाचे प्रलोभन दाखवून रशियाला पाठवण्यात आले होते.

❖ प्रत्यक्षात त्यांना युद्ध दरम्यान रशियन सैन्यासाठी सहाय्यक कर्मचारी म्हणून काम करण्यास भाग पाडण्यात आले होते .

❖ या तरुणांच्या सुटकेसाठी प्रयत्न करावेत अशी मागणी केली जात होती

## आयएमओ परिषदेत जागतिक सागरी संवादाचे भारताने केले नेतृत्व

- बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे सचिव टी.के. रामचंद्रन यांच्या नेतृत्वाखाली भारताचे एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ लंडनमधील आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेच्या (आयएमओ) परिषदेच्या 132 व्या सत्रात सहभागी होत आहे.

- आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेच्या परिषदेवरील निर्वाचित सदस्य असलेला आणि आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारात सर्वाधिक स्वारस्य असलेल्या देशांच्या श्रेणीतल्या भारताने खलाशांना कामावरून कमी करण्याच्या समस्येवर भर दिला. शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले की प्रयत्न करूनही, सध्या 292 भारतीय खलाशांचा समावेश असलेली 44 सक्रिय प्रकरणे आहेत.
- या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना आणि पर्यवेक्षणाच्या गरजेवरील भारताच्या ठाम भूमिकेला चांगला प्रतिसाद मिळाला.
- 8 जुलै 2024 रोजी सुरू झालेले आयएमओ परिषदेचे 132 वे सत्र 12 जुलै 2024 पर्यंत चालू राहील, ज्यामध्ये जागतिक सागरी मोहिमांच्या भविष्यासाठी विविध गंभीर समस्या आणि प्रस्तावांवर विचारविनिमय केला जाईल.

## भारत - ऑस्ट्रिया संबंध दृढ करण्यासाठी कटिबद्ध



- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 10 जुलै रोजी ऑस्ट्रियाचे चॅन्सलर कार्ल नेहॅमर यांच्याबरोबर दोन्ही देशांदरम्यानचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी विविध मार्गांविषयी चर्चा केली.
- ऑस्ट्रियात मोदी यांचे सैनिकी सलामी देऊन मागील 41 वर्षांमध्ये ऑस्ट्रियाला जाणारे नरेंद्र मोदी हे भारताचे पहिले पंतप्रधान आहेत.
- याआधी भारताचे माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 1983 मध्ये ऑस्ट्रियाचा दौरा केला होता.
- दोन राष्ट्रांच्या चर्चेदरम्यान मोदींनी ऑस्ट्रियाच्या कंपन्यांना भारतामध्ये गुंतवणूक करण्याचे आमंत्रण दिले.
- गेल्या वर्षी (2023) दोन्ही देशा दरम्यानचा व्यापार 2.93 ऑब्ज डॉलर इतका होता.

## लाहोर उच्च न्यायालयात प्रथमच महिला मुख्य न्यायाधीश



- न्यायमूर्ती आलिया नीलम यांनी लाहोर उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली.
- उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदावर विराजमान झालेल्या त्या पाकिस्तानमधील पहिल्या महिला आहेत.
- पंजाबचे राज्यपाल सरदार सलीम हैदर खान यांनी त्यांना पदाची शपथ दिली.
- पंजाब प्रांताच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री मरियम नवाज शपथविधी सोहळ्याला हजेरी लावली होती.
- न्यायमूर्ती नीलम यांना लाहोर उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या ज्येष्ठतेच्या क्रमवारीत तिसरे स्थान देण्यात आले होते, परंतु पाकिस्तानचे मुख्य न्यायाधीश काझी फैज इसा यांच्या अध्यक्षतेखालील न्यायिक आयोगाने त्यांना या पदासाठी नामनिर्देशित करण्याचा निर्णय घेतला.
- न्यायमूर्ती नीलम यांनी 1995 मध्ये पंजाब विद्यापीठातून एलएलबी पदवी मिळवली आणि 1996 मध्ये वकील म्हणून नोंदणी केली.
- न्यायमूर्ती नीलम यांनी 2008 मध्ये सर्वोच्च न्यायालयात वकील म्हणून नोंदणी केली.
- 2013 मध्ये त्या लाहोर उच्च न्यायालयाच्या हंगामी न्यायाधीश झाल्या.

## नेपाळच्या पंतप्रधानपदी के. पी. शर्मा ओली.



- के.पी. शर्मा ओली यांची तिसऱ्यांदा नेपाळच्या पंतप्रधानपदी नियुक्ती करण्यात आली.

- ओली यांनी प्रतिनिधीगृहात पुष्प कमल दहल प्रचंड यांच्याविरोधात विश्वासदर्शक ठराव जिंकला.
- यानंतर राज्यघटनेच्या कलम 76 (2) नुसार नवीन सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली.
- नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी ओली यांची कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-युनिफाइड मार्क्सिस्ट लेनिनिस्ट (सीपीएन-यूएमएल)- नेपाळी काँग्रेस (एनसी) युतीचे नवे पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली.
- याआधी ओली 11 ऑक्टोबर 2015 ते 3 ऑगस्ट 2016 आणि त्यानंतर 5 फेब्रुवारी 2018 ते 13 जुलै 2021 या कालावधीत नेपाळचे पंतप्रधान होते.

## अंटार्क्टिकात भारताचे पोस्ट ऑफिस



- भारतीय पोस्ट विभागाने जवळपास चार दशकांनंतर अंटार्क्टिका येथील भारती संशोधन केंद्रावर पोस्ट ऑफिसची दुसरी शाखा उघडली.
- अंटार्क्टिकासाठी अभिप्रेत असलेल्या पत्रांना आता MH- 1718 हा नवीन पिन कोड वापरला जाईल.
- सध्या, भारताची मैत्री आणि भारती ही दोन सक्रिय संशोधन केंद्रे अंटार्क्टिकामध्ये कार्यरत आहेत.
- 1984 मध्ये, भारताने अंटार्क्टिकामध्ये दक्षिण गंगोत्री (भारतातील पहिले संशोधन केंद्र) येथे पहिले पोस्ट ऑफिस सुरू केले.
- 1988- 89 मध्ये, दक्षिण गंगोत्री बर्फात बुडाले. त्यानंतर भारताने 26 जानेवारी 1990 रोजी अंटार्क्टिका येथील मैत्री संशोधन केंद्रावर दुसरे पोस्ट ऑफिस स्थापन केले.
- अंटार्क्टिकामधील पोस्ट ऑफिससाठी असलेली पत्रे गोव्यातील National Centre for Polar and Ocean Research कडे पाठवली जातात.

## ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री भारत दौऱ्यावर



- भारत आणि ब्रिटनदरम्यानच्या मुक्त व्यापार कराराला चालना देण्यासाठी ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री डेव्हिड लॅमी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी देशाच्या राजधानीत दाखल झाले.
- भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारावर 90% सहमती झाल्याचे मानले जात असून या करारावर शिक्कामोर्तब करण्यासाठी ब्रिटन उत्सुक आहे.
- परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, उद्योग व वाणिज्य मंत्री पीयूष गोयल तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याशी लॅमी चर्चा करतील.

## आसियान परिषद : 2024



भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणामध्ये आणि हिंद-प्रशांत क्षेत्राबाबतच्या धोरणामध्ये 'आसियान' गटाला अत्यंत महत्त्व असून या गटातील सदस्य देशांमध्ये राजकीय, आर्थिक आणि सुरक्षा सहकार्य अधिक दृढ होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारताच्या वतीने परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केले.

- लाओसची राजधानी व्हिएनटाइन येथे 'असोसिएशन ऑफ साऊथ-ईस्ट एशियन नेशन्स' (आसियान) दहा देशांच्या संघटनेची परिषद सुरू झाली असून यामध्ये जयशंकर हे भारताचे प्रतिनिधीत्व करत आहेत.
- मागील वर्षी जाकार्ता येथे झालेल्या या गटाच्या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते.
- भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणात आसियान गटाला प्रचंड महत्त्व आहे. या धोरणावर भारताने हिंद-प्रशांत धोरण आखले आहे. या गटातील देशांनी एकमेकांशी असलेले राजकीय, आर्थिक आणि सुरक्षा सहकार्य आणखी मजबूत करणे आवश्यक आहे. सदस्य देशांमधील जनतेचाही

एकमेकांशी संपर्क वाढणे गरजेचे आहे.'' भारत आणि आसियान गटातील भागीदारीचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत आहे.

- भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. या धोरणाद्वारे भारताने आशिया-प्रशांत क्षेत्रातील देशांबरोबर आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध दृढ करण्यावर भर दिला आहे.
- आसियान' गटात इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपिन्स, सिंगापूर, थायलंड, ब्रुनेई, व्हिएतनाम, लाओस, म्यानमार आणि कंबोडिया या देशांचा समावेश आहे.
- **आसियान** : (Association of Southeast Asian Nations) ही आग्नेय आशियामधील 10 स्वतंत्र देशांची एक राजकीय व आर्थिक संघटना आहे.
- आसियानची स्थापना इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स, सिंगापूर व थायलंड ह्या देशांनी 8 ऑगस्ट 1967 रोजी केली.
- त्यानंतर आसियानचा विस्तार करून ब्रुनेई, बर्मा, कंबोडिया, लाओस व व्हियेतनाम ह्या देशांना प्रवेश देण्यात आलेला आहे.

## पुरवठा परीषदेच्या उपाध्यक्षपदी भारताची निवड



- भारत आणि हिंद-प्रशांत आर्थिक आराखड्यातील (आयपीईएफ -इंडो-पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क फॉर प्रोस्पॅरिटी) इतर 13 भागीदार देशांनी महत्त्वाचा टप्पा गाठत, पुरवठा साखळी'विषयक लवचिकतेशी संबंधित महत्त्वपूर्ण ठरलेल्या समृद्धतेसाठी हिंद-प्रशांत आर्थिक आराखडा (आयपीईएफ) कराराअंतर्गत जागतिक पातळीवर तीन पुरवठा साखळी संस्थांची स्थापना केली आहे.
- पुरवठा साखळी परिषद (एसएससी), आपत्ती प्रतिसाद नेटवर्क (सीआरएन)

तसेच कामगार हक्कसंबंधी सल्लागार मंडळ (एलआरएबी) या संस्थांच्या उदघाटनपर आभासी बैठकांमुळे हिंद-प्रशांत परिसरातील पुरवठा साखळी मजबूत करण्याबाबत भागीदार देशांमध्ये सहकार्य वाढवण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे.

- या उदघाटनपर आभासी बैठकांच्या माध्यमातून, 14 आयपीईएफ भागीदार देशांनी महत्त्वाच्या पुरवठा साखळ्यांची लवचिकता तसेच स्पर्धात्मकता अधिक बळकट करण्यासाठी आणि कामगारांच्या हक्कांना अधिक मजबूत करतानाच आर्थिक समृद्धतेला धोका निर्माण करणाऱ्या पुरवठा साखळीतील समस्यांसाठी चांगल्या पद्धतीने सज्ज राहून प्रतिसाद देण्यासंदर्भात अधिक सखोल सहकार्य देऊ करण्यासंदर्भात कटिबद्धता तसेच सामुहिक निर्धाराला दुजोरा दिला.
- पुरवठा साखळी कराराला अनुसरुन, आयपीईएफ भागीदारांनी राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य आणि आर्थिक स्वास्थ्याच्या दृष्टीने महत्त्वाची क्षेत्रे आणि वस्तू यांच्या पुरवठा साखळ्या मजबूत करण्यासाठी लक्ष्यित आणि कृती-केंद्रित कार्य करण्याच्या उद्देशाने पुरवठा साखळी परिषदेसह पुरवठा साखळीसंबंधी तीन संस्थांची जागतिक पातळीवर स्थापना केली.
- उद्घाटनपर बैठकांमध्ये या तिन्ही पुरवठा साखळी संस्थांनी दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी अध्यक्ष तसेच उपाध्यक्षांची निवड केली. निवड करण्यात आलेले अध्यक्ष आणि उपाध्यक्ष खालीलप्रमाणे आहेत:

**पुरवठा साखळी परिषद :**

- ✓ अमेरिका (अध्यक्ष) आणि भारत (उपाध्यक्ष)
- ✓ **आपत्ती प्रतिसाद नेटवर्क**: कोरिया प्रजासत्ताक (अध्यक्ष) आणि जपान (उपाध्यक्ष)
- ✓ **कामगार हक्कसंबंधी सल्लागार मंडळ:** अमेरिका (अध्यक्ष) आणि फिजी (उपाध्यक्ष)
- ✓ पुरवठा साखळी परिषदेतील सदस्यांनी यावेळी संदर्भाचे निकष निश्चित केले

आणि कार्यविषयक प्राथमिक प्राधान्यक्रमांवर चर्चा केली.

- ✓ पुरवठा साखळी परिषदेच्या अनुषंगाने सप्टेंबर 2024 मध्ये वॉशिंग्टन येथे होणार असलेल्या मंडळाच्या पहिल्या प्रत्यक्ष स्वरूपाच्या बैठकीमध्ये यावर सविस्तर उहापोह करण्यात येईल.
- ✓ आयपीईएफ पुरवठा साखळ्यांना अधिक लवचिक, मजबूत तसेच उत्तम प्रकारे एकत्रित करण्याच्या तसेच एकूणच हिंद-प्रशांत परिसरातील देशांचा आर्थिक विकास तसेच प्रगती साधण्यासाठी योगदान देण्याच्या उद्देशाने नोव्हेंबर 2023 मध्ये वॉशिंग्टन येथे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी आयपीईएफ भागीदार देशांच्या मंत्र्यांसह पहिल्या आयपीईएफ पुरवठा साखळी लवचिकता करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या.
- ✓ फेब्रुवारी 2024 मध्ये या कराराला मान्यता देण्यात आली असून तेव्हापासून हा करार लागू झाला आहे.

**आयपीईएफबद्दल माहिती:**

- ❖ भारत, ऑस्ट्रेलिया, ब्रुनेई, फिजी, इंडोनेशिया, जपान, कोरिया प्रजासत्ताक, मलेशिया, न्युझीलंड, फिलिपाईन्स, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम आणि अमेरिका या 14 देशांच्या सहभागासह जपानमध्ये टोकियो येथे 23 मे 2022 रोजी आयपीईएफची सुरुवात करण्यात आली.
- ❖ हिंद-प्रशांत क्षेत्रात वृद्धीविषयक प्रगती, आर्थिक स्थैर्य आणि समृद्धता निर्माण करण्याच्या लक्ष्यासह सदस्य देशांदरम्यान आर्थिक सहभाग आणि सहकार्य बळकट करण्याच्या उद्देशाने आयपीईएफची रचना करण्यात आली आहे.
- ❖ व्यापार (स्तंभ 1), पुरवठा साखळी लवचिकता(स्तंभ 2), स्वच्छ अर्थव्यवस्था (स्तंभ 3) आणि न्याय्य अर्थ्यव्यवस्था (स्तंभ 4) या घटकांशी संबंधित चार स्तंभांवर सदर आराखड्याची रचना करण्यात आली आहे.



## मादुरो तिसऱ्यांदा व्हेनेझुएलाच्या अध्यक्षपदी

- व्हेनेझुएलाच्या अध्यक्षपदी निकोलस मादुरो हे तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.
- अध्यक्षपदासाठी 28 जुलै रोजी मतदान झाले होते. 29 जुलै रोजी निकाल जाहीर झाला.
- व्हेनेझुएलाच्या 'नॅशनल इलेक्ट्रॉल कौन्सिल'ने मादुरो हे 51 टक्के मत मिळवून विजयी झाल्याचे घोषित केले.
- प्रमुख विरोधक एडमुंडो गोंझालेझ यांना 44 टक्के मते मिळाली.
- निकोलस मदुरो मोरोस हे व्हेनेझुएलाचे राजकारणी आहेत. व्हेनेझुएलाचे लोकप्रिय नेते हुगो चावेझ यांचे राजकिय वारसदार मानले जातात.
- हुगो चावेझ यांच्या सरकारमध्ये ते उपराष्ट्रपती आणि परराष्ट्र मंत्री होते.
- चावेझ यांच्या निधनानंतर मार्च 2013 मध्ये ते काळजीवाहू राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले.
- त्यानंतर झालेल्या फेरनिवडणुकांमध्ये 14 एप्रिल 2013 रोजी निर्वाचन आयोगाने त्यांना विजयी घोषित केले.
- मादुरो हे 'युनायटेड सोशालिस्ट पार्टी ऑफ व्हेनेझुएला' या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात.

## कीर स्टार्मर ब्रिटनचे नवे पंतप्रधान



- ब्रिटनमध्ये झालेल्या संसदीय निवडणुकीमध्ये मजूर पक्षाने (लेबर पार्टी) 650 सदस्यीय कनिष्ठ सभागृहामध्ये 412 जागांवर विजय मिळवत तब्बल 14 वर्षांनी सत्तेत पुनरागमन केले.
- पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ हुजूर पक्षाचा (कॉन्झर्व्हेटिव्ह) ऐतिहासिक पराभव झाला.
- मजूर पक्षाचे नेते सर कीर स्टार्मर ब्रिटनचे नवे पंतप्रधान असतील.
- स्टार्मर यांनी सन 2019मध्ये जेरेमी कॉर्बिन यांच्याकडून मजूर पक्षाची धुरा स्वीकारली होती.
- स्टार्मर 2015 पासून होलबोर्न अँड सेंट पँक्रासचे खासदार आहेत.
- स्टार्मर गॉर्डन ब्राउन नंतरचे पहिले मजूर पक्षाचे पंतप्रधान आहे.
- स्टार्मरचा जन्म 2 सप्टेंबर, 1962 रोजी साउथवार्क, लंडन येथे झाला.
- त्यांचे बालपण सरेमधील ऑक्स्टेड शहरात गेले. त्यांचे आईवडील मजूर पार्टीचे समर्थक होते.
- वडील हे साधे कामगार होते, तर आई एका रुग्णालयामध्ये परिचारिका म्हणून काम करत होती.
- कीर स्टार्मर हे तरुण - वयापासून राजकारणात सक्रिय होते.
- समाजवादी विचारधारेचा प्रभाव असल्याने त्यांनी वयाच्या 16 व्या वर्षी लेबर पक्षात प्रवेश केला होता.
- कीर स्टार्मर यांना शिक्षणामध्ये विशेष गती होती.
- लीड्स विद्यापीठातून त्यांनी कायदे शाखेची पदवी घेतली तर प्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यापीठातून त्यांनी नागरी कायद्याबाबत पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतले.
- प्रत्यक्ष वकील म्हणून काम करत असताना त्यांनी मानवी हक्काचा पुरस्कार केला.

- उत्तर आयर्लंड नियोजन मंडळाचे मानवी हक्क सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले.
- त्यांची 2002 मध्ये राणीच्या परिषदेमध्ये नियुक्ती करण्यात आली होती.
- ते 2008 ते 2013 या काळामध्ये जनसुनावणी विभागाचे संचालक होते.
- ते 2015 मध्ये हॉलबॉर्न आणि सेंट पॅनक्रास येथून हाउस कॉमन्सचे सदस्य म्हणून निवडून आले.
- हे दोन्ही मतदारसंघ मजूर पक्षाचे बालेकिल्ले म्हणून ओळखले जातात.

**या धोरणाचा पुरस्कार:**

- ✓ आर्थिक स्थैर्य अन् वृद्धी
- ✓ आरोग्य सेवेतील सुधारणा
- ✓ सीमा सुरक्षेवर भर
- ✓ ऊर्जा पुरवठ्याचे राष्ट्रीयीकरण
- ✓ समाजविरोधी घटकांना पायबंद
- ✓ शिक्षकांची भरती
- ✓ भारताशी मैत्रीवर भर, मुक्त व्यापाराचा पुरस्कार
- ✓ इस्त्राईलला शस्त्रे देण्यास विरोध, पॅलेस्टाईनला पाठिंबा

**पक्ष निहाय जिंकलेल्या जागा:**

- ❖**एकूण जागा -** 650
- ❖**बहुमतासाठी -** 326
- ❖**मजूर पक्ष -** 412
- ❖**हुजूर पक्ष -** 121
- ❖**लिबरल डेमोक्रॅट्स -** 71
- ❖**एसएनपी (स्कॉटिश नॅशनल पार्टी) -** 9
- ❖**एसएफ(सिन फेईन) -** 7
- ❖**इतर -** 28


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC/MPSC
We Have Been Recognised By...
Stanford | Seed
Stanford Institute for Innovation in Developing Economies
केवळ एकच बॅच
खास विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव
प्रथमच OFFLINE
वैकल्पिक विषय
समाजशास्त्र
विषयाचे महाराष्ट्राचे एकमेव तज्ज्ञ मार्गदर्शक
Free Demo Sessions
22 | 23 | 24 July 2024
English Batch - 8:00am To 10:00am
मराठी बॅच - सकाळी 10:30 ते 12:30
अमोल घोडके सर
13 Years
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
स्थळ : श्रीनिधि बिल्डिंग, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स समोर, महाराष्ट्र एज्युकेशन सोसाइटी गेट, कॉसमॉस बँक शेजारी, टिळक रोड, पुणे - 30
9665666195 \ 9665288834
FREE COURSES AVAILABLE
Download The App



# 2. राजकीय व घटनात्मक

## हेमंत सोरेन झारखंडचे मुख्यमंत्री



- झारखंडचे मुख्यमंत्री चंपई सोरेन यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णनन यांच्याकडे राजीनामा सादर केला.
- यानंतर झारखंड मुक्ती मोर्चा (झामुमो) पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष हेमंत सोरेन सरकार स्थापनेचा दावा केला असून, ते पुन्हा झारखंडचे मुख्यमंत्री होणार आहेत.
- 'झामुमो'च्या नेतृत्वाखालील आघाडीमधील घटक पक्षांच्या बैठकीत सोरेन यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली.
- सोरेन हे राज्याचे 13 वे मुख्यमंत्री असतील.
- हेमंत सोरेन यांची 'झामुमो' विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली.
- जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लाँडरिंगप्रकरणी तुरुंगवास झालेले हेमंत सोरेन यांना उच्च न्यायालयाने जामीन ह मंजूर केल्यानंतर, 28 जून रोजी तब्बल पाच महिन्यांनंतर त्यांची सुटका झाली.

## उत्तराखंड सहकारी संस्थांत महिला आरक्षण



- उत्तराखंड सरकारने सहकारी संस्थांमध्ये महिलांना 33% आरक्षण देऊ केले.
- मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय चे घेतला.
- मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या नेतृत्वाखालील उत्तराखंडच्या सरकारने 10 जिल्हा सहकारी बँका, 670 बहुउद्देशीय सहकारी संस्था, राज्य सहकारी बँक, गृहनिर्माण आणि बांधकाम सहकारी महासंघ, प्रादेशिक सहकारी संघ, ग्राहक सहकारी संस्थांमध्ये महिलांसाठी 33% आरक्षण अनिवार्य केले आहे.

## पंजाब आणि हरियाणाच्या मुख्य न्यायाधीशपदी शील नागू



पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांनी न्यायमूर्ती शील नागू यांना पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश पदाची शपथ दिली.

- न्यायमूर्ती नागू यापूर्वी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे कार्यकारी मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहत होते.
- काही दिवसांपूर्वी न्यायमूर्ती नागू यांची पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पदी नियुक्ती करण्यात आली होती.

## मुस्लिम महिला पोटगी मागू शकते



- भारतीय फौजदारी संहितेच्या कलम 125 अंतर्गत मुस्लीम महिला तिच्या

पतीकडून पोटगी मागू शकते असा दूरगामी परिणाम करणारा महत्त्वाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

- देशामध्ये 'मुस्लिम महिला (घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण) कायदा, 1986' हा धर्मनिरपेक्ष कायद्यावर वरचढ असणार नाही असेही यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले.
- कोणत्याही धर्मातील सर्व विवाहित महिलांना, भारतीय फौजदारी संहितेच्या कलम 125 च्या धर्मतटस्थ तरतुदी लागू असतील असे **न्या. बी व्ही नागरत्ना** आणि **न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह** यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.
- दोन्ही न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे निकालपत्र लिहिले.

## सर्वोच्च न्यायालयात प्रथमच मणिपूरमधील न्यायाधीश



- न्या. नॉन्गमेकापम कोटेश्वर सिंह आणि न्या. आर माधवन यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली.
- त्यांनी शपथ घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या 34 म्हणजे मंजुरीइतकी होईल.
- ते जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असून सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती होणारे मणिपूरमधील पहिले न्यायाधीश आहेत.
- "न्या. सिंह यांच्या नियुक्तीमुळे ईशान्य भारताला प्रतिनिधित्व मिळेल आणि विशेषतः ते सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती होणारे मणिपूरमधील पहिले न्यायाधीश असतील.
- न्यायाधीश सिंह यांची ऑक्टोबर 2011 मध्ये गौहत्ती उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली होती.
- मणिपूर उच्च न्यायालयाची निर्मिती झाल्यानंतर त्यांची तिकडे बदली करण्यात आली होती.

- गेल्या वर्षी फेब्रुवारी - महिन्यात त्यांची जम्मू आणि - काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झाली. ते फेब्रुवारी 2028 पर्यंत कार्यरत राहतील.
- न्या. आर माधवन हे मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश - म्हणून काम पाहत आहेत.
- ते जून 2028 पर्यंत कार्यरत राहतील

**2024 च्या स्वातंत्र्यदिनाची थीम: 'विकसित भारत '**




- 78 व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याची थीम 'विकसित भारत' अशी आहे.
- 2047 पर्यंत देशाला विकसित राष्ट्रात रुपांतरित करण्याच्या सरकारच्या संकल्पनेनुसार ही थीम निश्चित करण्यात आली आहे.
- संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते ए. भारत भूषण बाबू यांनी ही माहिती दिली
- भारत 2047 मध्ये स्वातंत्र्याची 100 वे पूर्ण करणार असल्याने गेल्या तीन वर्षांपासूनच काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.
- या उद्दिष्टांमध्ये परिस्थितीनुरुप वेळोवेळी सुधारणा केली जात आहे.2024 चा स्वातंत्र्य दिन सोहळा 'विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित असणार आहे.

THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
Stanford Seed
INTENSIVE LEARNING PROGRAM
1 Year Course
FREE DEMO LECTURES
9 सप्टेंबर ते 11 सप्टेंबर 2024 रोजी
(सायं. 7:00)
Google Meet
LIVE ON
अमोल घोडके सर आणि टीम
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
कोर्सची वैशिष्ट्ये :-
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
State Board Foundation Course
NCRT Foundation Course
Main Course- By Covering all Micro Topics of Syllabus
Daily Answer Writing Practice
Three-Layer Mentor Support
A Methodology Fir Assessment of Civil Services Aptitude and Swot
(AMACSS) वर आधारित मूल्यमापन आणि नियोजन
संपूर्ण वर्षाचे AMACSS वर आधारित व वैयक्तिक स्वरूपाचे अभ्यासाचे सुक्षम नियोजन
अभ्यासक्रमातील घटकनिहाय आणि उपघटकनिहाय 2000+ प्रश्नांचा उत्तर लेखन सराव
अद्ययावत आणि परिपूर्ण नोट्स
अधिकारी वर्गाशी संवाद
बॅच सुरु
9 सप्टेंबर 2024
त्वरा करा प्रवेश मर्यादित
FREE COURSES AVAILABLE
9665666195 / 9665288834




# 3. आर्थिक

## गती शक्ती विद्यापीठ आणि एअरबस यांच्यात करार




- भारतीय विमान वाहतूक क्षेत्राला लक्षणीयरीत्या बळकट करण्याकरिता भारतीय रेल्वेच्या वडोदरा येथील गती शक्ती विद्यापीठ (जीएसव्ही) आणि एअरबस यांनी सहकार्य करार केला.
- सप्टेंबर 2023 मध्ये स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने, रेमी मेलर्ड (एअरबस भारत आणि दक्षिण आशियाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक) आणि प्रा. मनोज चौधरी (गतीशक्ती विद्यापीठाचे कुलगुरू) यांच्यात नवी दिल्लीतील रेल्वे भवन येथे अंतिम करार झाला.
- रेल्वे, माहिती आणि प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आणि गतीशक्ती विद्यापीठाचे पहिले कुलपती अश्विनी वैष्णव, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू आणि रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

## अर्थसंकल्प 2024-25

- रोजगार निर्मितीसाठी गुंतवणुकीला प्राधान्य व प्रोत्साहन योजना, ग्रामीण असंतोष दूर करण्यासाठी लघु उद्योगांना चालना तसेच मध्यम वर्गाला दिलासा देणारी कर सवलत अशा विविध तरतुदी करून 2024 - 25 साठीचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत मांडला.
- लोकसभेतील सुमारे दीड तासांच्या भाषणांमध्ये सितारामन यांनी उत्पादनवाढ, रोजगारवाढ, कृषी, सामाजिक न्याय, नागरी विकास, ऊर्जासुरक्षा, पायाभूत सुविधांचा विकास, आर्थिक सुधारणा इत्यादींना प्राधान्य देणारा अर्थसंकल्प सादर केला .
- हा त्यांचा सातवा अर्थसंकल्प आहे .
- यापूर्वी मोरारजी देसाई यांनी सहा अर्थसंकल्प मांडले होते.

**ठळक वैशिष्ट्ये:**

**प्रमुख क्षेत्रांसाठी तरतुदी:**

1) संरक्षण - 4,54,773 कोटी

2) ग्रामीण विकास - 2,65,808 कोटी

3) कृषी - 1,51,851 कोटी

4) गृह - 1,50,983 कोटी

5) शिक्षण - 1,25,638 कोटी

6) आयटी, दूरसंचार - 1,16, 342 कोटी

7) आरोग्य - 89,287 कोटी

8) ऊर्जा - 68, 769 कोटी

9) सामाजिक कल्याण - 56, 501 कोटी

10) उद्योग - 47, 559 कोटी

**विकसित भारतासाठी नऊ प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे:**

**1) कृषी उत्पादकता**

- शेतकऱ्यांना देय रक्कम मिळण्यासाठी शेतजमीन आणि शेतकरी यांची डिजिटल नोंदणी
- गरीब कल्याण अन्न योजनेला पाच वर्षांची मुदतवाढ
- उच्च उत्पादन क्षमता असलेले आणि सर्व वातावरणात टिकून राहणारी 109 प्रकारच्या फळबिया पुरविणार.
- उच्च गुणवत्ता असलेल्या बियाणांची निर्मिती करण्यासाठी खासगी क्षेत्राला निधी पुरविणार

- कृषी आणि पूरक क्षेत्रासाठी 1.52 लाख कोटी रुपये
- डाळी आणि तेलबियांचे उत्पादन वाढवून
- स्वयंपूर्ण होणार
- भाजीपाला पुरवठा साखळी विकसित करणार
- एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देणार
- एक हजार बायो-इनपुट रिसोर्स केंद्र स्थापन करणार

**2) रोजगार व कौशल्यविकास**

- रोजगार व कौशल्यविकासासाठी पंतप्रधानांच्या पाच योजना. पुढील पाच वर्षांत 4.1 कोटी युवकांना संधी. 2 लाख कोटी रुपयांची तरतूद
- तीन रोजगार योजना राबविणार. नोकरीस सुरुवात करणाऱ्या तीस लाख युवकांना एक महिन्याचा पीएफ देणार.
- शिक्षण क्षेत्रासाठी 1.48 लाख कोटी रुपये एक लाख विद्यार्थ्यांना ई-व्हाऊचरद्वारे तीन टक्के व्याजदराने कर्ज; उच्च शिक्षणासाठी 10 लाखांपर्यंत कर्ज देणार
- कौशल्य विकासासाठीच्या आदर्श कर्ज योजनेअंतर्गत आता 7.5 लाखापर्यंत कर्ज
- राज्यांच्या सहकार्याने नव्या कौशल्य योजना; पुढील पाच वर्षांत 20 लाख युवकांना प्रशिक्षण देणार
- नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे उभारणार

**3) सर्वसमावेश विकास**

- बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या व्यापक विकासासाठी 'पूर्वोदय' योजना तयार करणार
- नालंदा विद्यापीठाला गतवैभव प्राप्त करून देणार, पर्यटनस्थळ म्हणून विकास करणार
- अमृतसर-कोलकता औद्योगिक कॉरिडॉरवर गया येथे उद्योग केंद्र उभारणार
- महिला आणि मुलींना उपयुक्त असणाऱ्या योजनांसाठी तीन लाख कोटी रुपये

- आदिवासी समुदायांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पंतप्रधान जनजातीय उन्नत ग्राम अभियान राबविणार
- ईशान्य भारतात इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या शंभर शाखा उघडणार

**4) उत्पादन आणि सेवा**

- यंत्रे आणि उपकरणे खरेदीसाठी सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांना मुदत कर्ज घेताना 'थर्ड पार्टी'ची गरज नाही
- आर्थिक अडचणीच्या काळातही कर्ज मिळणार
- पूर्वी मुद्रा कर्ज घेऊन ते फेडलेल्यांसाठी कर्जमर्यादा 10 लाखांवरून 20 लाख रु.
- ई कॉमर्स निर्यात केंद्र उभारणार

**5) नगरविकास**

- हस्तांतरावर आधारित विकास : तीसलाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या 14 मोठ्या शहरामध्ये हस्तांतरावर आधारित विकास करणार.
- मुद्रांक शुल्क : महिलांनी मालमत्ता खरेदी करावी यासाठी मुद्रांक शुल्कात घट करण्यास राज्यांना प्रोत्साहन
- रस्ते बाजार : निवडक शहरांमध्ये शंभर आठवडी बाजार सुरू करण्यासाठी योजना
- जल व्यवस्थापन : शंभर शहरांमध्ये जल व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापन प्रकल्प आणि सेवा राबविणार. या प्रकल्पांसाठी बँकांद्वारे
- कर्जपुरवठा शक्य घरकुल योजना : शहरी भागातील एक कोटी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना पीएम आवास योजनेचा लाभ देणार

**6) ऊर्जा सुरक्षा**

- ऊर्जा प्रकल्पांसाठी 21,400 कोटी रुपयांची तरतूद
- रोजगार, वाढ आणि पर्यावरणाच्या शाश्वत स्थितीसाठी 'ऊर्जा हस्तांतर मार्ग' धोरण राबविणार
- ऊर्जा साठवणूक प्रकल्पांना प्रोत्साहन देणार

- छोट्या आणि मध्यम आकाराच्या अणुभट्ट्यांचा विकास करणार
- औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी नवे करार करणार
- इमारतींच्या छतांवर सौर पॅनेल बसविणाऱ्यांसाठी योजना. एक कोटी घरांना महिन्याला तीनशे युनिटपर्यंतची वीज मोफत मिळू शकणार

**7) पायाभूत सुविधा**

- भांडवली खर्चासाठी सरकारकडून 11,11,111 कोटी रुपयांचा निधी
- पायाभूत सुविधांच्या विकासासाठी राज्यांना 1.5 लाख कोटींचे दीर्घकालीन व्याजमुक्त कर्ज देणार
- ग्रामीण रस्ते योजनेचा चौथा टप्पा राबविणार
- बिहार, आसाम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि सिक्कीम या पूरग्रस्त राज्यांना निधी पुरविणार
- विष्णुपाद मंदिर कॉरिडॉर आणि महाबोधी मंदिर कॉरिडॉरचा विकास करणार
- मंदिरे, स्मारके, अभयारण्ये, समुद्रकिनारे यांच्या विकासासाठी मदत करणार

**8) संशोधन आणि विकास**

- मूलभूत संशोधनासाठी 'अनुसंधान राष्ट्रीय संशोधन निधी' स्थापन करणार
- खासगी क्षेत्रात संशोधनाला प्रोत्साहन मिळावे यासाठी एक लाख कोटींची तरतूद
- अवकाश संशोधनाला आणि उद्योगाला बळ देण्यासाठी एक हजार कोटी रुपयांचा निधी

**9) 'नेक्स्ट जनरेशन' सुधारणा**

- ग्रामीण भागातील सर्व जमिनींना 'युनिक लँड पार्सल आयडेंटिफिकेशन नंबर' देणार
- जमिनींच्या नोंदी स्थानिक पातळीवर होणार
- ई श्रम पोर्टल इतर पोर्टलशी जोडणार, जेणेकरून नोकरी शोधणाऱ्यांसाठी आणि देणाऱ्यांसाठी सोयीचे जाणार आहे

- उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील तक्रारींचे निवारण वेगाने करण्यासाठी श्रम सुविधा आणि समाधान पोर्टलमध्ये बदल करणार
- जमीन व्यवस्थापन, नगर नियोजन यामधील नियमांमध्ये सुधारणा करणार

**इतर प्रमुख वैशिष्ट्ये:**

- स्टार्टअप इकोसिस्टीम विकसित करणार
- परकी कंपन्यावरील कंपनी कर 40% वरून 35 टक्क्यांवर
- देशांतर्गत वाहतूक करणाऱ्या परकी जहाज कंपन्यांना सवलती
- 100 शहरांमध्ये औद्योगिक पार्क उभारणार
- अर्थव्यवस्थेच्या डिजिटायझेशनसाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढविणार
- उद्योगस्नेही वातावरण निर्मितीसाठी जनविश्वास विधेयक 2.0 आणणार
- व्यापार सुधारणा कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन
- मोबाईल फोन ,चार्जर ,हँडसेट निर्मितीसाठी लागणाऱ्या घटकांसाठी आयात शुल्क घटवून 15 टक्क्यांवर
- 1000 आयटीना अद्यावत करणार
- ग्राम विकासासाठी 2.66 लाख कोटींची तरतूद
- ज्येष्ठ कलाकारांना ज्यांचे वार्षिक उत्पन्न 72 हजारांपेक्षा कमी आहे त्यांना आर्थिक मदत
- दुरुस्तीसाठी आयात केलेल्या मालाची निर्यात करण्यासाठीची काल मर्यादा सहा महिन्यांवरून एक वर्षापर्यंत वाढविली
- याच अंतर्गत तीन ते पाच वर्ष वॉरंटी असलेल्या वस्तूंची दुरुस्तीसाठी फेर आयात करण्याचीही कालमर्यादा वाढवली
- देखभाल आणि दुरुस्ती उद्योगाला बळ
- कर्करोगाच्या रुग्णांना दिलासा देताना आणखी तीन प्रकारच्या औषधांवरील सीमाशुल्क माफ
- मोबाई,ल मोबाईल पीसीबीए व चार्जर यांच्यावरील सीमा शुल्क 15 टाक्यांवर

- दुर्मिळ खनिजांच्या आयातीवरील सीमा शुल्क रद्द
- सौर घट आणि बॅटरी निर्मितीसाठी सवलत असणाऱ्या वस्तूंच्या यादीचा विस्तार

**महाराष्ट्रासाठी 7,545 कोटी:**

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाट्याला 7,545 कोटींच्या वर निधी आला.
- विदर्भ व मराठवाड्यातील सिंचना बरोबरच मुंबई, पुणे व नागपूर या शहरांच्या मेट्रोसाठी मोठ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

1) विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प : 600 कोटी

2) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार : 400 कोटी

3)सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनोमिक कॉरिडॉर : 466 कोटी

4) पर्यावरण पूरक शाश्वत कृषी प्रकल्प : 598 कोटी

5) महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : 150 कोटी

6) मुंबई मेट्रो :1087 कोटी

7) दिल्ली - मुंबई औद्योगिक कॉरिडॉर :499 कोटी

8) ग्रीन अर्बन मोबिलिटी :150 कोटी

9) नागपूर मेट्रो : 683 कोटी

10) नाग नदी पुनर्जीवन : 500 कोटी

11) पुणे मेट्रो : 814 कोटी

12) मुळा मुठा नदी संवर्धन : 690 कोटी

**नवीन कर प्रणाली (आर्थिक वर्ष: 2024-25)**

| **उत्पन्न रुपये** | **कर%** |
|---|---|
| 1) 0 ते 3,00,000 | 0 |
| 2) 3 लाख ते 7 लाख | 5 |
| 3) 7 लाख ते 10 लाख | 10 |
| 4) 10 लाख ते 12 लाख | 15 |
| 5) 12 लाख ते 15 लाख | 20 |
| 6) 15 लाखापेक्षा अधिक | 30 |

**अल्पवयीनांसाठी 'वात्सल्य' ही नवीन पेन्शन योजना जाहीर**

- केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारामन यांनी 2024-25 चा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला.

- त्यामध्ये अल्पवयीन मुलांसाठी 'वात्सल्य' नावाची नवीन पेन्शन योजना प्रस्तावित केली आहे.
- ही एक योगदानाधारित पेन्शन योजना असून यात पालकांचे योगदान असेल.
- वयाची प्रौढता प्राप्त झाल्यावर, ही योजना सहजपणे सामान्य एनपीएस खात्यात रूपांतरित केली जाऊ शकते.
- केंद्रीय मंत्र्यांनी व एनपीएसचा आढावा घेणाऱ्या समितीने त्यांच्या कामात बऱ्यापैकी प्रगती केल्याचेही जाहीर केले.
- त्यांनी राष्ट्रीय परिषदेच्या संयुक्त सल्लागार यंत्रणेच्या केंद्रीय शासकीय कर्मचाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाजूने रचनात्मक दृष्टिकोन समजून घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.
- त्याचबरोबर "सामान्य नागरिकांचे रक्षण करण्यासाठी वित्तीय शिस्त राखत संबंधित मुद्द्यांचे निराकरण करणारा एक उपाय याद्वारे शोधला जाईल"

## पहिल्या स्वयंचलित ट्रान्शिपमेंट बंदराच्या टर्मिनलचे उद्घाटन



- देशातील पहिल्या संपूर्ण स्वयंचलित ट्रान्शिपमेंट बंदराच्या टर्मिनलचे उद्घाटन केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या हस्ते झाले.
- केरळ येथील विझिंगम येथे बांधण्यात आलेल्या या मदर पोर्टवर अर्थात मोठ्या बंदरावर मोठ्या जहाजांतील कंटेनर उतरवून घेण्याची आणि ते बदलण्याचे सोय आहे.
- या बंदरावर चीनहून आलेले मालवाहू सॅन फर्नांडो हे जहाज पहिल्यांदा दाखल झाले.
- पाण्याचे फवारे मारून या जहाजाचे स्वागत केले. मालवाहू जहाज सॅन फर्नांडो हे एक हजारांपेक्षा अधिक कंटेनर घेऊन विहिंजम बंदरावर आले.
- या बंदराची निर्मिती आणि बांधणी अदानी समूहाची कंपनी अदानी पोर्ट्स

अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडकडून करण्यात आली आहे.

- या प्रकल्पावरून केरळ सरकार आणि अदानी पोर्ट्स कंपनी यांच्यात करार झाला आणि त्यानुसार या प्रकल्पाचे काम 5 डिसेंबर 2015 रोजी अदानी पोर्ट्सने सुरू केले.
- या बंदर उभारणीसाठी सुमारे 8,867कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून यापैकी 5,595 कोटी केरळ सरकारने तर केंद्र सरकारने 818 कोटी रुपयांचा निधी दिला.
- विंझिगम या बंदराची निर्मिती खासगी आणि सार्वजनिक भागीदारीतून करण्यात आली आहे.

## देशातील पहिला 'टुरिझम इंडेक्स फंड'



- टाटा म्युच्युअल फंडाने पर्यटन आणि आदरातिथ्य व्यवसायांत गुंतवणूक करणारा 'टाटा निफ्टी इंडिया टुरिझम इंडेक्स फंडा'ची घोषणा केली.
- 8 जुलैपासून हा फंड गुंतवणुकीसाठी खुला झाला असून 19 जुलैपर्यंत फंडाचा 'एनएफओ' सुरू असेल.
- टाटा निफ्टी इंडिया टुरिझम इंडेक्स फंड ही एक निष्क्रिय (पॅसिव्ह) धाटणीची आणि गुंतवणुकीस कायम खुली असलेला (ओपन-एंडेड) निर्देशांकाधारित योजना असून, गुंतवणूकदारांना पर्यटन, प्रवास, आदरातिथ्य व्यवसायांत गुंतवणूक संधी उपलब्ध करून देईल.
- वाढत्या दरडोई उत्पन्नामुळे सुट्टीतील प्रवास, सहलींकडे नागरिकांचा कल वाढत आहे. भारतीय ग्राहकांच्या अभिरुचीत बदल होत असून विवेकाधीन खर्चातही वाढ होत आहे.
- या फंडाचा मानदंड असलेल्या 'निफ्टी इंडिया टुरिझम इंडेक्स' (टीआरआय, म्हणजेच एकूण परतावा निर्देशांक) निर्देशांकात प्रवास आणि पर्यटना-संबंधित उद्योग जसे की हॉटेल्स आणि क्विक सर्व्हिस रेस्टॉरन्ट्स, नागरी विमान वाहतूक, विमानतळ आणि विमानतळ, सहल आयोजक कंपन्या

सेवा आणि ट्रॉलीज, बॅग, सुटकेस चे उत्पादक यांचा समावेश आहे.

- संलग्न निर्देशांकात 30 कंपन्यांचा समावेश असून कोणत्याही कंपनीचे भारमान हे 20 टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.





# 4. नियुक्ती

## विनय क्वात्रा अमेरिकेतील राजदूत



- माजी परराष्ट्र सचिव विनय मोहन क्वात्रा यांची अमेरिकेमध्ये भारतीय राजदूतपदी नेमणूक करण्यात आली.
- अमेरिकेतील भारतीय राजदूत राहिलेले तरनजितसिंग जानेवारीमध्ये निवृत्त झाल्यानंतर हे पद रिक्त होते.
- त्या पार्श्वभूमीवर विनय मोहन क्वात्रा लवकरच वॉशिंग्टन येथे भारतीय वकिलातीमध्ये पदाची सुत्रे स्वीकारतील.
- भारतीय परराष्ट्र सेवेच्या 1988 च्या तुकडीचे अधिकारी असलेले विनय मोहन क्वात्रा परराष्ट्र सचिवपदावरून नुकतेच निवृत्त झाले होते.
- 34 वर्षांच्या सेवाकाळात क्वात्रा 2017 ते 2020 या कालावधीत फ्रान्समध्ये भारतीय राजदूत होते.
- तत्पूर्वी त्यांनी 2010 ते 2013 या कालावधीत अमेरिकेतील भारतीय वकिलातीमध्ये वाणिज्य विभागाची, याखेरीज चीनमधील भारतीय वकिलातीमध्ये देखील त्यांनी महत्त्वाची जबाबदारी हाताळली होती.

YOUR PERSONAL MENTOR

## इदाशिशा नोंगरांग मेघालयाच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक



- मेघालयने 'इदाशिशा नोंगरांग' यांची राज्याच्या 'पहिल्या महिला पोलीस महासंचालक' पदी नियुक्ती केली.
- नोंगरांग ह्या 1992 च्या बॅचच्या भारतीय पोलिस सेवेतील (IPS) अधिकारी आहेत.
- त्यांच्या आधी मेघालायच्या पोलीस महासंचालक पदी लज्जा राम बिश्नोई हे होते.

## सी. पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे नवे राज्यपाल

- तमिळनाडू भाजपचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेचे माजी खासदार सी. पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्राचे 24 वे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली आहे.
- ते सध्या झारखंड आणि तेलंगणचे (अतिरिक्त कार्यभार) राज्यपाल आहेत.
- तसेच महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि भाजप आमदार हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- राज्यपाल रमेश बैस यांची राज्यपालपदाची मुदत संपुष्टात आली. त्यांच्या जागी राधाकृष्णन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- गेले चार महिने दोन राज्यांच्या राज्यपालपदाचा कार्यभार ते सांभाळत आहेत.
- **सी .पी. राधाकृष्णन:**
- ज्येष्ठ भाजप नेते सी. पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे नवे राज्यपाल असणार आहेत.
- दक्षिणेतील भाजपचा चेहरा म्हणून राधाकृष्णन त्यांच्याकडे पाहिले जाते.
- त्यांचा जन्म 4 मे 1957 रोजी तिरुपूरमध्ये झाला.

- वयाच्या 16 व्या वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी काम सुरू केले.
- गेल्या तीन दशकांपेक्षा जास्त काळ ते भारतीय जनता पक्षामध्ये सक्रिय आहेत.
- राधाकृष्णन भाजपच्या तिकिटावर दोन वेळा तमिळनाडूच्या कोइमतूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून निवडून आले आहेत; तसेच त्यांनी काही वर्षे तमिळनाडू भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे.
- सन 2014 आणि 2019 च्या निवडणुकीत भाजपने त्यांना लोकसभेचे तिकीट दिले होते. मात्र, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींची लाट असूनही ते पराभूत झाले होते.
- 18 फेब्रुवारी 2023 रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती.
- त्यानंतर दीड वर्षांनी त्यांच्याकडे महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.
- राधाकृष्णन यांचा दक्षिण भारतातील भाजपाच्या प्रमुख नेत्यांमध्ये उल्लेख केला जातो.

**नवीन नेमणूक झालेले 9 राज्यांचे राज्यपाल**

| राज्यपाल | राज्य |
|---|---|
| 1) सी. पी. राधाकृष्णन | महाराष्ट्र |
| 2) हरिभाऊ बागडे | राजस्थान |
| 3) संतोषकुमार गंगवार | झारखंड |
| 4) रमण डेका | छत्तीसगड |
| 5) सी. एच. विजयशंकर | मेघालय |
| 6) ओमप्रकाश माथूर | सिक्कीम |
| 7) गुलाबचंद कटारिया | पंजाब, चंडीगड |
| 8) लक्ष्मण प्रसाद आचार्य | आसाम, मणिपूर (अतिरिक्त कार्यभार) |
| 9) जिष्णु देव वर्मा | तेलंगणा |

## सुजाता सौनिक राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव



- राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणून सुजाता सौनिक यांची निवड करण्यात आली.
- 30 जून रोजी मावळते मुख्य सचिव डॉक्टर नितीन करीर यांच्याकडून सुजाता यांनी सूत्रे स्वीकारली.
- त्यांचा कार्यकाळ जून 2025 पर्यंत एक वर्षाचा राहणार आहे .
- ते राज्याचे 45 वे मुख्य सचिव आहेत.
- 1987 च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असलेल्या सुजाता सौनिक या सर्वात ज्येष्ठ अधिकारी आहेत.
- सौनिक यांनी आपल्या 37 वर्षांच्या प्रशासकीय सेवेत राज्यात विविध ठिकाणी काम केले आहे. सौनिक यांनी सार्वजनिक आरोग्य, हवामान बदल आणि आपत्ती व्यवस्थापन,कौशल्य विकास, प्रशासन अशा अनेक विभागांत अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविणाऱ्या आणि राज्य तसेच केंद्र सरकारमध्ये विविध पातळीवर धोरणे तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
- तसेच कंबोडिया आणि कोसोवो येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर दोन संयुक्त राष्ट्र मिशनमध्ये काम केले आहे.
- तसेच त्यांनी केंद्र सरकार आणि संयुक्त राष्ट्रातही विविध महत्त्वाच्या पदांवर काम करताना आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे.
- मूळच्या हरियाणातील असलेल्या सुजाता सौनिक यांनी आपले शालेय शिक्षण चंदिगड येथे पूर्ण केले तर पंजाब विद्यापीठातून इतिहास या विषयात एमए केले आहे.
- सैनिकी यांनी विद्यापीठातून प्रथम येत सुवर्णपदक देखील पटकावले होते.

**राज्याच्या इतिहासात प्रथमच प्रशासन, पोलीस प्रमुखपदी महिला अधिकारी**

- सुजाता सौनिक यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आल्याने राज्याच्या इतिहासात प्रथमच प्रशासन आणि पोलीस दलाच्या प्रमुखपदी महिला अधिकारी विराजमान झाले आहेत.

- 2017 मध्ये कर्नाटकात अशाच प्रकारे दोन्ही महिला अधिकारी सर्वोच्च पदावर होत्या.
- 2017 मध्ये मुख्य सचिवपदी के. रत्नप्रभा तर पोलीस महासंचालपदी निलमणी एम. राजू या दोन्ही एकाच वेळी सर्वोच्चपदी होत्या. त्यानंतर राज्यात दोन्ही महिला अधिकारी सर्वोच्च पदावर विराजमान झाल्या आहेत.
- मुख्यमंत्रीपदाचा अपवाद वगळता मुख्य न्यायमूर्तीपासून ते मुख्य सचिवापर्यंत विविध पद भूषवण्याची संधी राज्यात महिलांना आतापर्यंत मिळाली आहे.

**पती-पत्नी मुख्य सचिवपदी असण्याची पहिलीच वेळ**

- सुजाता सौनिक या वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. त्या जून 2025 मध्ये निवृत्त होत आहेत.
- निवृत्त आयएएस अधिकारी मनोज सौनिक यांच्या त्या पत्नी आहेत. तेदेखील राज्याचे मुख्य सचिव होते.
- त्यामुळे पती आणि पत्नी यांनी हे पद भूषविण्याची ही बहुधा पहिलीच वेळ आहे.
- कौशल्य विकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गृह मंत्रालय, सरकारच्या सल्लागार आणि सहसचिव अशा महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले आहे.

## राज्याच्या वनबलप्रमुख शोमिता बिश्वास

- राज्याचे वनबल प्रमुख म्हणून भारतीय वनसेवेतील अधिकारी शोमिता बिश्वास यांची नियुक्ती करण्यात आली.
- राज्यातील महिला अधिकारी पहिल्यांदाच महत्त्वाच्या पदावर आले आहेत.
- राज्याच्या पोलिस महासंचालक पदाची सूत्रे रश्मी शुक्ला यांच्या हाती तर मुख्य सचिव म्हणून सुजाता सौनिक यांची नियुक्ती करण्यात आली.
- राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक शैलेश टेंभुर्णीकर हे 31 जुलै रोजी

सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या जागी या पदावर बिश्वास यांची नियुक्ती होईल

## शेखर कपूर 'इफ्फी'चे नवे संचालक

- ज्येष्ठ चित्रपटनिर्माते शेखर कपूर यांची आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सवाच्या (इफ्फी)संचालकपदी नियुक्ती करण्यात आली.
- कपूर यांच्या नेतृत्वाखाली गोवा येथे 55 वा व 56 वा चित्रपट महोत्सव होणार आहे.
- माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या वतीने याबाबत माहिती देण्यात आली.
- कपूर यांनी 'मासूम', मिस्टर इंडिया, बँडेड क्वीन या लोकप्रिय चित्रपटांची निर्मिती केली आहे.

## नीता अंबानी यांची 'आयओसी' च्या सदस्यपदी निवड

- आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या सदस्यपदी नीता अंबानी यांची एकमताने फेरनिवड झाली आहे.
- एकूण 93 मतदारांनी मतदान केले आणि सर्व 93 मते नीता अंबानी यांना मिळाली.
- नीता अंबानी 2016 रिओ दि जानेरो ऑलिंपिक गेम्समध्ये प्रथमच आयओसी सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या.
- नीता अंबानी यांच्या नेतृत्वाखाली भारताला 40 वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयओसीच्या वार्षिक बैठकीचे यजमानपद मिळाले आहे.

## 'एमसीए' च्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक

- अमोल काळे यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची निवड करण्यात आली.
- 'एमसीए'चे विद्यमान सचिव अजिंक्य नाईक यांनी विद्यमान उपाध्यक्ष संजय नाईक यांना 221-114 अशा फरकाने पराभूत केले.

- विशेष म्हणजे अजिंक्य नाईक (37 वर्षे) हे 'एमसीए'चे आजवरचे सर्वांत युवा अध्यक्ष ठरले आहेत.
- निवडणूक अधिकारी जे. एस. सहारिया यांनी निवडणुकीचा निकाल जाहीर केला.

## 'यूपीएससी'च्या अध्यक्षांचा राजीनामा



- केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष म्हणून मनोज सोनी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
- आंतरराष्ट्रीय संबंध आणि राज्यशास्त्राचे जाणकार असलेले मनोज सोनी 28 जून 2017 ला लोकसेवा आयोगाचे सदस्य होते.
- त्यानंतर 16 मे 2023 ला त्यांनी आयोगाच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली होती.
- मनोज सोनी यांचा कार्यकाळ 2019 पर्यंत होता.
- हा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

## लळीत यांची निवड



- प. बंगालमधील राज्य सरकारच्या विद्यापीठांमध्ये कुलगुरूंची निवड व नियुक्त्यांवर देखरेख ठेवण्यासाठी नेमलेल्या समितीवर सर्वोच्च न्यायालयाने माजी सरन्यायाधीश उदय लळीत यांची नेमणूक केली.
- विद्यापीठांच्या कारभारावरुन राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचा सर्व विद्यापीठांचे कुलगुरू असलेले राज्यपाल सी.व्ही. आनंद बोस यांच्याशी वाद आहे. या पार्श्वभूमीवर ललित यांची नियुक्ती केली आहे.

## एन. एस. सुब्रह्मणी लष्कराचे उपप्रमुख



- लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रह्मणी यांनी लष्कराचे उपप्रमुख म्हणून सूत्रे स्वीकारली.
- सुब्रह्मणी लष्कराच्या मध्य विभागाचे प्रमुख होते. त्यांनी 1985मध्ये 'गढवाल रायफल्स' मधून लष्करी कारकिर्दीला सुरुवात केली.
- आसाममध्ये राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन ऱ्हायनो'चे नेतृत्व केले होते.

## 'एसबीआय'च्या अध्यक्षपदी शेट्टी



- वित्तसेवा संस्था विभागाने (एफएसबीआय) भारतीय स्टेट बँक या देशातील सर्वांत मोठ्या बँकेच्या अध्यक्षपदी चल्ला श्रीनिवासुलू शेट्टी यांची नियुक्ती केली आहे.
- ते बँकेचे सर्वांत वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक आहेत.
- विद्यमान अध्यक्ष दिनेशकुमार खारा हे 28 ऑगस्टला सेवानिवृत्त होत आहेत. त्यानंतर शेट्टी हे पदाची जबाबदारी सांभाळतील.
- शेट्टी यांच्याकडे सध्या आंतरराष्ट्रीय बँकिंग, जागतिक बाजारपेठा आणि तंत्रज्ञानातील बदल या विभागांची जबाबदारी आहे.

### SBI ही देशातील सर्वात मोठी बँक

स्टेट बँक ऑफ इंडिया ही देशातील सर्वात मोठी सरकारी बँक आहे.

एसबीआयमध्ये सरकारचा 56.92% हिस्सा आहे.

त्याची स्थापना 1 जुलै 1955 रोजी झाली.

बँकेचे मुख्यालय मुंबईत आहे.

एसबीआयच्या 22,405 हून अधिक शाखा आहेत आणि 48 कोटींहून अधिक ग्राहकांचा बाजारातील एक चतुर्थांश हिस्सा आहे.

बँक जगातील 29 देशांमध्ये कार्यरत आहे.

भारताबाहेर त्याच्या 235 शाखा आहेत.

# 5. दिनविशेष

## 1 जुलै : कृषी दिन



- हरित क्रांतीचे जनक वसंतराव फुलसिंग नाईक यांच्या स्मरणार्थ हा दिवस महाराष्ट्र  कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.
- कृषी क्षेत्राच्या वाढीसाठी मदत करणाऱ्या वसंतराव फुलसिंग नाईक यांच्या प्रयत्नांना मान्यता देण्यासाठी राज्यात 1 जुलै ते 7 जुलै या कालावधीत कृषी सप्ताह पाळला जातो.
- भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती "कृषी दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन 1989 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला.
- तेव्हापासून एक जुलैला शासकीय स्तरावर सर्व कार्यालयात कृषीदिन साजरा होत आहे.

## 1 जुलै : राष्ट्रीय डॉक्टर दिन




- भारतात दरवर्षी 1 जुलै रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय डॉक्टर दिन हा देशातील वैद्यकीय व्यावसायिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि साजरा करण्याचा दिवस आहे.
- राष्ट्राचे आरोग्य आणि कल्याण सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांची वचनबद्धता, समर्पण आणि अथक प्रयत्नांना मान्यता देण्याचा हा दिवस आहे.

### राष्ट्रीय डॉक्टर दिनाचा इतिहास

✓ भारतात राष्ट्रीय डॉक्टर दिन 1 जुलै रोजी साजरा केला जातो आणि त्याचा इतिहास डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या जीवनाशी आणि वारशाशी जोडलेला आहे.

✓ डॉ. रॉय यांचा जन्म 1 जुलै 1882 रोजी झाला आणि त्याच तारखेला 1962 मध्ये त्यांचे निधन झाले, राष्ट्रीय उत्सवासाठी निवडलेल्या दिवसाशी एक मार्मिक योगायोग आहे.

✓ कलकत्ता मेडिकल कॉलेजमधून पदवीधर झालेले ते प्रसिद्ध वैद्य होते.

✓ सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक न्यायासाठीचे त्यांचे समर्पण त्यांना लंडन विद्यापीठात वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यामध्ये पुढील अभ्यास करण्यास प्रवृत्त केले.

✓ डॉ. रॉय यांनी 14 वर्षे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणून काम केले, त्यांनी राज्याच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांमध्ये योगदान दिले.

✓ त्यांनी अनेक रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये स्थापन केली, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा उपक्रमांना चॅम्पियन केले आणि सर्वांसाठी आरोग्य सेवांमध्ये प्रवेश सुधारण्यासाठी वकिली केली.

### राष्ट्रीय डॉक्टर दिनाची स्थापना

➢ 1991 मध्ये, इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) ने डॉ. रॉय यांचे वैद्यक क्षेत्रातील अपवादात्मक

योगदान आणि भारतातील लोकांच्या सेवेतील त्यांच्या समर्पणाचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रीय डॉक्टर्स डे स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला.

- देशभरातील वैद्यकीय व्यावसायिकांच्या अथक परिश्रमाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने हा प्रस्ताव तत्परतेने स्वीकारला.
- डॉ. रॉय यांच्या जयंती आणि पुण्यतिथीशी जुळण्यासाठी 1 जुलै ही अधिकृत तारीख म्हणून निवडली गेली. हे राष्ट्राच्या आरोग्यसेवा लँडस्केपवर त्यांनी केलेल्या चिरस्थायी प्रभावाचे प्रतीक आहे.

## 1 जुलै : चार्टर्ड अकाउंटंट्स दिन

- दरवर्षी 1 जुलै रोजी चार्टर्ड अकाउंटंट्स(सनदी लेखापाल) दिन साजरा केला जातो.
- 1 जुलै 1949 या वर्षी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) ची स्थापना झाली त्यामुळे 1 जुलै रोजी हा दिवस साजरा केला जातो
- ICAI ची स्थापना सनदी लेखापाल कायदा, 1949 अंतर्गत संसदेच्या कायद्याद्वारे करण्यात आली.
- ICAI ही भारतातील चार्टर्ड अकाउंटन्सी व्यवसायासाठी एकमेव नियामक संस्था आहे.
- ICAI व्यावसायिक शिक्षण प्रदान करते, परीक्षा मानके सेट करते आणि प्रतिष्ठित CA पद मंजूर करते.
- ICAI लेखा आणि लेखापरीक्षण मानके तयार करते, आर्थिक अहवालात सातत्य आणि पारदर्शकता सुनिश्चित करते.
- ICAI CA साठी अनिवार्य व्यावसायिक विकास कार्यक्रमांद्वारे सतत शिकण्यास प्रोत्साहन देते.

**महत्व:**

✓ सीए दिन सनदी लेखापालांचे व्यवसाय आणि आर्थिक क्षेत्रातील योगदान ओळखतो .

- ✓ हे आर्थिक अखंडता राखण्यासाठी, उत्तरदायित्वाला चालना देण्यासाठी आणि आर्थिक वाढीस समर्थन देण्यासाठी त्यांचे कौशल्य हायलाइट करते.
- ✓ सीए दिनानिमित्त सेमिनार, कार्यशाळा, परिषदा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.
- ✓ या इव्हेंट्समुळे ज्ञानाची देवाणघेवाण, व्यावसायिक नेटवर्किंग आणि उद्योगातील कल आणि आव्हानांवर चर्चा करणे सुलभ होते.

## 3 जुलै : आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन



- प्लॅस्टिक प्रदूषण दूर करण्यासाठी लोकांना एकल-वापर प्लास्टिकचा वापर टाळण्यास प्रवृत्त करण्यासाठी दरवर्षी 3 जुलै रोजी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस साजरा केला जातो .
- प्लॅस्टिक पिशवीमुक्त जग शक्य आहे आणि एकेरी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांसाठी योग्य पर्यावरणीय पर्याय उपलब्ध आहेत याविषयी जागरूकता पसरवण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस जगभरात साजरा केला जातो.
- 2022 मध्ये संपूर्णपणे प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालणारा बांगलादेश हा जगातील पहिला देश होता.

**इतिहास:**

- ✓ बॅग फ्री वर्ल्ड या संस्थेने आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिनाची स्थापना केली.
- ✓ या संस्थेने प्लॅस्टिकमुक्त जगाचा प्रचार करणाऱ्या अनेक मोहिमा सुरू केल्या ज्यामुळे जगातील इतर भागांना प्लास्टिक पिशवी मुक्त दिनामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळाली.
- ✓ झिरो वेस्ट युरोप (ZWE) चे सदस्य असलेल्या रेझेरोने 3 जुलै 2008 रोजी

पहिला आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस साजरा केला.

✓ 2015 मध्ये, युरोपियन युनियनने एकल-वापरणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करण्यासाठी काही निर्देशही पारित केले.

❖ **उद्दीष्ट:** सामूहिक जाणीव निर्माण करणे आणि व्यक्ती, समुदाय आणि व्यवसायांना प्लास्टिक पिशव्यांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणासाठी कार्य करण्यासाठी पावले उचलण्यास प्रोत्साहित करणे हे आहे.

## आंतरराष्ट्रीय सहकार दिन




- आंतरराष्ट्रीय सहकार दिन हा 1923 पासून आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीद्वारे जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी साजरा केला जाणारा सहकारी चळवळीचा वार्षिक उत्सव आहे.
- 2024 मध्ये 102 वा आंतरराष्ट्रीय सहकारी दिवस आणि संयुक्त राष्ट्रांनी मान्यता प्राप्त 30 वा आंतरराष्ट्रीय सहकारी दिवस म्हणून साजरा केला जात आहे
- 2024 ची थीम : " **सहकारिता सर्वांसाठी एक चांगले भविष्य घडवणारी"**
- 16 डिसेंबर 1992 रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ठराव घोषित केला.
- "जुलै 1995 चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकारी दिवस म्हणून घोषित केला गेला, जो आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या स्थापनेच्या शताब्दी निमित्त आहे."
- 1995 पासून संयुक्त राष्ट्रसंघाचा आंतरराष्ट्रीय सहकार दिन संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय सहकार दिनासोबत साजरा केला जातो.

- जगभरातील सहकारी संस्था विविध पद्धतीने हा दिवस साजरा करतात.
- गुजरातमध्ये गांधीनगर इथे 102 व्या आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त 'सहकार से समृद्धी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
- केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी या कार्यक्रमाला संबोधित केले.

## 6 जुलै: जागतिक पशुजन्य रोग दिवस




- पशुजन्य रोगांच्या जोखमीबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी 6 जुलै रोजी जागतिक पशुजन्य रोग दिवस पाळला जातो.
- झुनोसेस हे संसर्गजन्य रोग (विषाणू, जीवाणू आणि परजीवी) आहेत जे प्राण्यांपासून मानवापर्यंत पसरतात किंवा मानवाकडून प्राण्यांकडे संक्रमित होतात.
- याच दिवशी 6 जुलै 1885 रोजी प्रथमच लुई पाश्चरने रेबीज विषाणू विरूद्ध लस यशस्वीरित्या दिली जो एक पशुजन्य रोग आहे.
- या दिवसाची आठवण म्हणून 6 जुलै हा दिवस जागतिक पशुजन्य रोग दिवस म्हणून पाळला जातो.

## 11 जुलै : जागतिक लोकसंख्या दिन




- लोकसंख्या नियंत्रणासह जागतिक लोकसंख्या समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी दरवर्षी 11 जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो.
- जागतिक लोकसंख्या दिन 2024 ची **थीम: " कोणालाही मागे न ठेवण्यासाठी प्रत्येकाची गणना**

THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR

**करा" (To leave no one behind, count everyone)**

- **जागतिक लोकसंख्या दिनाचा इतिहास**
- 1989 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने या विशेष दिवसाची स्थापना केली.
- संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने पर्यावरण आणि विकासावर लोकसंख्येच्या प्रभावांबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी हा दिवस पाळण्याचा निर्णय घेतला.
- 11 जुलै 1990 पासून हा दिवस जगभरात साजरा केला जातो.
- 11 जुलै 1987 रोजी जगाची लोकसंख्या पाच अब्जांवर पोहोचली. याचा परिणाम डॉ. के. सी. झकारिया यांनी सुचविल्याप्रमाणे जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्याच्या प्रारंभावर झाला.

**जागतिक लोकसंख्या दिनाचे महत्त्व**

✓ जागतिक लोकसंख्या दिन जागतिक लोकसंख्येशी संबंधित प्रचलित मुद्दे समोर आणण्यावर लक्ष केंद्रित करतो.

✓ जगातील महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांपासून ते आर्थिक संकटापासून ते दारिद्र्यापर्यंत, जागतिक लोकसंख्या दिन हा लोकांचे जीवन बदलण्यासाठी आणि त्यांना चांगले बनविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आठवण करून देतो.

✓ प्रत्येक व्यक्तीला आश्वासने, क्षमता आणि संधींनी भरलेले भविष्य असेल असे जग निर्माण करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्रसंघ हा दिवस साजरा करण्यावर लक्ष केंद्रित करते.

## 12 जुलै : जागतिक मलाला दिन



- युवा कार्यकर्त्या मलाला युसुफझाईचा सन्मान करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने 12 जुलै हा दिन 'जागतिक मलाला दिन' म्हणून घोषित केला.

- जगभरातील महिला आणि मुलांच्या हक्कांचा सन्मान करण्यासाठी मलाला युसुफझाईचा जन्मदिन मलाला दिन म्हणून साजरा केला जातो.
- मलालाने तिच्या आयुष्यात अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला. मलालाने निर्धाराने महिलांच्या सन्मानासाठी आणि शिक्षणासाठी दहशतवादी तालिबान्यांशी लढा दिला.
- तालिबान दहशतवादी मोहिमे दरम्यान 2008 च्या अखेरीस सुमारे 400 शाळा नष्ट करण्यात आल्या आणि आत्मघाती हल्ले ही रोजचीच घटना ठरत गेली पण मलालाचा असा विश्वास होता की शिक्षणाचा अधिकार प्रत्येकाला आहे आणि म्हणूनच ती तालिबानच्या विरोधात उभी राहिली आणि शाळेत जाण्याचा निर्धार केला.
- 9 ऑक्टोबर 2012 रोजी सकाळी शाळेतून घरी परतत असताना तालिबानच्या दोन सदस्यांनी पंधरा वर्षीय मलालावर गोळ्या झाडल्या. यामुळे ती कोमात गेली होती .
- 16 ऑक्टोबर 2012 रोजी ती कोमातून बाहेर आली आणि त्यानंतरही तिने आपला लढा सुरूच ठेवला.
- मलालाने न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र संघात भाषण दिले आणि याच वर्षी तिने "**आय एम मलाला : द गर्ल हू स्टुडप फॉर एज्युकेशन अँड शॉर्ट बाय द तालिबान**" हे तिचे पहिले पुस्तक आणि आत्मचरित्र प्रकाशित केले.

**नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित**

- ✓ 2014 या वर्षी मलालाला नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .
- ✓ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणारी मलाला सर्वात तरुण महिला ठरली.
- ✓ या पुरस्काराने तिच्या अथक प्रयत्नांची आणि मुलींच्या शिक्षणासाठी जो तिचा लढा सुरू होता त्याला एक वेगळी ओळख मिळवून दिली.
- ✓ 2017 मध्ये मलालाला संयुक्त राष्ट्र शांतता दूत म्हणून नियुक्त करण्यात आले.

## 15 जुलै : जागतिक युवा कौशल्य दिन




- 2024 च्या जागतिक युवा कौशल्य दिनाची थीम : **"शांतता आणि विकासासाठी युवा कौशल्य"**
- ही थीम शांतता निर्माण आणि संघर्ष निराकरणात तरुणांची भूमिका अधोरेखित करते.
- जागतिक युवा कौशल्य दिन हा नोव्हेंबर 2014 मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने नियुक्त केलेला वार्षिक कार्यक्रम आहे, ज्याचा पहिला उत्सव 15 जुलै 2015 रोजी साजरा केला जातो.
- या दिवसाचा उद्देश युवा कौशल्य विकासाच्या महत्त्वाविषयी जागरूकता वाढवणे आणि समजून घेणे हा आहे. जागतिक स्तरावर तरुणांना भेडसावणारी बेरोजगारी आणि अल्प बेरोजगारीची आव्हाने.
- तरुणांना त्यांच्या वैयक्तिक विकासासाठी, आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि कर्मचाऱ्यांमध्ये एकात्मता आणण्यासाठी रोजगारक्षम कौशल्ये आणि क्षमतांनी सुसज्ज करणे महत्त्वाचे आहे हे या उपक्रमाने ओळखले आहे.
- हे सरकार, शैक्षणिक संस्था, नियोक्ते आणि संस्थांना प्रशिक्षण, शिक्षण आणि उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करते जे तरुण लोकांची कौशल्ये आणि क्षमता वाढवतात, त्यांना श्रमिक बाजारात अधिक प्रभावीपणे सहभागी होण्यास आणि शाश्वत विकास लक्ष्यांमध्ये योगदान देण्यास सक्षम करते.

**जागतिक युवा कौशल्य दिन 2024: उत्सव**

✓ तरुणांची रोजगारक्षमता आणि उद्योजकता वाढवण्याचे मार्ग म्हणून व्यावसायिक प्रशिक्षण, शिक्षण आणि प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहन देते .

✓ संस्था, शैक्षणिक संस्था आणि समुदाय व्यावहारिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि तरुणांना नियोक्त्यांसोबत जोडण्यासाठी कौशल्य विकास कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि करिअर मेळावे आयोजित करतात.

## 18 जुलै: नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस




- नेल्सन मंडेला यांच्या जीवनाचा आणि वारशाचा सन्मान करण्यासाठी नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी 18 जुलै रोजी साजरा केला जातो.
- संयुक्त राष्ट्रांनी 2009 मध्ये ठरावाद्वारे या दिवसाची घोषणा केली
- 18 जुलै 2010 रोजी पहिला UN मंडेला दिवस साजरा करण्यात आला .
- 2024 ची थीम **"गरिबी आणि असमानतेशी लढा आपल्या हातात आहे."**

**नेल्सन मंडेला**

✓ नेल्सन मंडेला हे 1994 ते 1999 या काळात दक्षिण आफ्रिकेचे माजी अध्यक्ष होते.

✓ 18 जुलै 1918 रोजी दक्षिण आफ्रिकेतील मवेझो येथे जन्मलेले मंडेला हे वर्णभेदाविरुद्धच्या लढ्यात एक मध्यवर्ती व्यक्ती होते आणि दक्षिण आफ्रिकेतील बहु-वांशिक लोकशाहीच्या संक्रमणामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

✓ बहुसंख्य असूनही गोऱ्या अल्पसंख्याकांकडून भेदभावाचा सामना करणाऱ्या काळ्या लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी लढा दिला.

✓ नेल्सन मंडेला यांनी समता आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी आणि मानवतेची सेवा करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले.

✓ त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना 1993 मध्ये नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## 20 जुलै : जागतिक बुद्धिबळ दिन



- बुद्धिबळ दिन 1924 मध्ये पॅरिसमध्ये आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ (FIDE) ची स्थापना झाल्याची तारीख म्हणून दरवर्षी 20 जुलै रोजी जागतिक बुद्धिबळ दिन साजरा केला जातो.
- जागतिक बुद्धिबळ दिवस 2024 हा बुद्धिबळ खेळाडू, उत्साही आणि संघटनांद्वारे बुद्धिबळाच्या खेळाचा आणि त्याच्या अनेक फायद्यांचा प्रचार करण्यासाठी जगभरात साजरा केला जातो.

### जागतिक बुद्धिबळ दिवसाचा इतिहास

✓ 1924 मध्ये आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ (FIDE) ची स्थापना झाल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी 20 जुलै रोजी जागतिक बुद्धिबळ दिन साजरा केला जातो.

✓ 1966 मध्ये, UNESCO ने जागतिक बुद्धिबळ दिनाची संकल्पना मांडली, हे ओळखून बुद्धिबळ हा एक खेळ आहे जो बौद्धिक वाढ, गंभीर विचारांना प्रोत्साहन देतो. , आणि सांस्कृतिक विविधता. असे मानले जाते की बुद्धिबळ हा खेळ, जो एकेकाळी "चतुरंग" म्हणून ओळखला जात होता, तो जवळजवळ 1500 वर्षांपूर्वीचा आहे आणि त्याचा उगम भारतात झाला आहे.

✓ जागतिक बुद्धिबळ दिन 2024 चा उद्देश वय, लिंग किंवा पार्श्वभूमी काहीही असले तरी प्रत्येकासाठी एक खेळ म्हणून बुद्धिबळाचा प्रचार करणे हा आहे.

✓ ग्लोबल चेस अलायन्स (FIDE) ची स्थापना 1924 मध्ये पॅरिस, फ्रान्स येथे अर्जेंटिना, चेकोस्लोव्हाकिया, फ्रान्स,

पोलंड, रोमानिया, स्पेन, स्वित्झर्लंड आणि युगोस्लाव्हियाच्या सार्वजनिक बुद्धिबळ संघटनांनी केली.

## 26 जुलै : कारगिल विजय दिवस

- 26 जुलै 2024 रोजी कारगिल विजय दिवसाचा 25 वा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे.
- हा दिवस कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना समर्पित आहे.
- कारगिल युद्ध मे-जुलै 1999 च्या दरम्यान जम्मू आणि काश्मीरमधील कारगिल (आता लडाखच्या केंद्रशासित प्रदेशातील एक जिल्हा) जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) लढले गेले आणि यात भारताचा विजय झाला.

**ऑपरेशन विजय**

✓ 1999 मध्ये, भारत आणि पाकिस्तानने काश्मीर प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडवण्यासाठी लाहोर करारावर स्वाक्षरी केली.

✓ 'तथापि, पाकिस्तानी सैन्याने सियाचीनमधील भारतीय सैन्याला तोडण्याच्या आशेने 'ऑपरेशन बद्र' अंतर्गत नियंत्रण रेषेच्या (एलओसी) भारतीय बाजूकडे 3 मे 1999 रोजी, पाकिस्तानने हे युद्ध सुरू केले. तेव्हा कारगिलच्या खडकाळ प्रदेशात सुमारे 5000 पाकिस्तानी सैनिकांनी घुसखोरी केली.

✓ भारतीय लष्कराने प्रत्युत्तर देत 'ऑपरेशन विजय 'सुरु केले

## 28 जुलै : जागतिक निसर्ग संवर्धन दिन

- दरवर्षी जागतिक निसर्ग संवर्धन दिन 28 जुलै रोजी साजरा केला जातो.
- हा दिवस निसर्ग आणि पर्यावरणाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी साजरा करण्यात येतो.
- या दिवशी नैसर्गिक संसाधनाचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षणावर जास्त भर दिला जातो.
- **जागतिक निसर्ग संवर्धन दिन 2024 ची थीम** : “लोक आणि वनस्पती जोडणे, वाइल्डलाइफ संवर्धनात डिजिटल इनोव्हेशन एक्सप्लोअर करणे.”

- **जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे महत्त्व**
- अनेक वर्षांपासून हवामान बदलामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहे.
- जागतिक तापमान वाढ, ग्लोबल वार्मिंग, प्रदूषण आणि नैसर्गिक समतोल बिघडत आहेत.
- त्यामुळे अशा परिस्थितीत निसर्गाचे संरक्षण करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. यामुळे पृथ्वीवर होणाऱ्या नकारात्मक परिणाम कमी होण्यास मदत होईल.
- या दिवशी निसर्ग समजून घेऊन त्याच्या हितासाठी कार्य करणे महत्त्वेचे असून अनेकजण जागृकता निर्माण करण्याचे काम करतात. यासाठी जगभरात विविध कार्यक्रम आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात.

## 29 जुलै : आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

- दरवर्षी 29 जुलै रोजी आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन सादरा केला जातो.
- जगभरातील नष्ट होत जाणारी प्राण्यांची प्रजाती असलेल्या वाघांच्या संवर्धनाविषयी जागरुकता निर्माण करणे हा यामागचा हेतू आहे.
- वाघांच्या नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करण्यासाठी जागतिक स्तरावर आराखडा तयार करणे आणि व्याघ्र संवर्धनाच्या मुद्द्यांसाठी जनजागृती व समर्थन करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

**आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाचा इतिहास**

✓ जागतिक व्याघ्र दिन ज्याला आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस देखील म्हणतात, 2010 मध्ये सेंट पीटर्सबर्ग व्याघ्र शिखर परिषदेदरम्यान स्थापित करण्यात आला.

✓ रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे झालेल्या या परिषदेचे आयोजन ग्लोबल टायगर इनिशिएटिव्हने (GTI) केले होते, ज्यात अनेक राष्ट्रे, आंतरराष्ट्रीय संघटना आणि व्याघ्र संवर्धनासाठी समर्पित संवर्धन गटांचा समावेश आहे.

- ✓ वाघांची संख्या असलेल्या व्याघ्र श्रेणी देशांनी जागतिक स्तरावर वाघांच्या संख्येत होणारी चिंताजनक घट दूर करण्यासाठी एकत्र आले.
- ✓ वाघांचे आणि त्यांच्या अधिवासाचे रक्षण करण्यासाठी समन्वित प्रयत्नांची तातडीची गरज ओळखून टीआरसीने व्याघ्र संवर्धन आणि त्यासमोरील आव्हानांविषयी जनजागृती करण्यासाठी दरवर्षी एक दिवस समर्पित करण्याचा निर्णय घेतला.
- ✓ त्यांनी आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनासाठी 29 जुलैची निवड केली.
- ✓ हे शिखर परिषदेच्या पहिल्या आणि शेवटच्या दिवसांमधील मध्यबिंदू चिन्हित करून, वाघ वाचविण्यासाठी सुरू असलेल्या जागतिक प्रयत्नांचे प्रतीक आहे.

**आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाचे महत्व**

- ➢ जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात प्रतिष्ठित बीग कॅट म्हणजेच वाघांना गंभीर धोक्यांचा सामना करावा लागत आहे.
- ➢ आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन त्यांच्या दुर्दशेबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी समर्पित आहे.
- ➢ या दिवशी सर्व स्तरातील लोक एकत्र येऊन व्याघ्र संवर्धनाची तातडीची गरज अधोरेखित करतात.
- ➢ अधिवास नष्ट करणे, शिकार करणे आणि वन्यजीवांच्या अवैध तस्करीमुळे या प्राण्यांना धोका निर्माण झाला आहे, ज्यामुळे ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.
- ➢ आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाचा उद्देश वाघांचे भवितव्य सुनिश्चित करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे, लोकांचा पाठिंबा मिळविणे आणि शाश्वत उपक्रमांना प्रोत्साहन देणे आहे.
- ➢ व्याघ्र संरक्षणातील संधी आणि आव्हाने अधोरेखित करून भविष्यातील पिढ्यांसाठी आपल्या ग्रहावरील जैवविविधतेचे जतन करणे हे या दिवसाचे उद्दिष्ट आहे.

## संविधान हत्या दिवस



- केंद्र सरकारने दरवर्षी 25 जून हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे.
- हा दिवस 1975 च्या आणीबाणीच्या अमानुष यातना सहन करणाऱ्या सर्वांच्या अतुलनीय योगदानाचे स्मरण करून देईल.
- त्या काळात, स्वतःचा कोणताही दोष नसताना लाखो लोकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि माध्यमांचा आवाज दडपून टाकण्यात आला.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या निर्णयाचा उद्देश, अत्याचारी सरकारच्या हातून अक्षम्य छळ सहन करूनही लोकशाहीच्या पुनरुज्जीवनासाठी संघर्ष करणाऱ्या लाखो लोकांच्या आत्म्याचा सन्मान करण्याचा असल्याचे केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले.
- 'संविधान हत्या दिवस' साजरा केल्याने आपल्या लोकशाहीचचे संरक्षण आणि व्यक्तिस्वातंत्र्याची चिरंतन ज्योत प्रत्येक भारतीयांमध्ये तेवत ठेवण्यात मदत होईल, अशा रीतीने कोणत्याही हुकूमशाही शक्तीला या भयावहतेची पुनरावृत्ती होण्यापासून रोखता येईल.

---------------------


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
Stanford Seed
ONLINE + OFFLINE BATCH
सामान्य अध्ययन पेपर IV
नीतिशास्त्र
बॅच सुरु
5 सप्टेंबर
2024
ACHIEVE ETHICS EXCELLENCE IN LESS THAN
45 Days!
Free Demo Sessions
30 | 31 August 2024
मराठी बॅच- सकाळी 8:30 ते 10:30
GET FREE CHECKLIST OF ETHICS AT SEMINAR
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
स्थळ: गणेश कड अकॅडमी, श्रीनिधी बिल्डिंग, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी गेट, कॉसमॉस बँक शेजारी, टिळक रोड, पुणे- ३०
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834
THE OFFICER
Your Personal Mentor
DOWNLOAD OUR FREE APP




# 6. विज्ञान व तंत्रज्ञान

## पुणे येथे राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषदेचे आयोजन



- एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या वतीने 19 ते 21 जुलै या कालावधीत देशात प्रथमच विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित भारतीय शास्त्रज्ञांची तीन दिवसीय पहिली राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली आहे.
- विकसित भारत 2047 ही मध्यवर्ती संकल्पना असलेल्या या परिषदेत
- विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांच्या हस्ते 19 जुलै रोजी परिषदेचे उद्घाटन होणार आहे.
- वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक व सचिव डॉक्टर एन. कलाईसेलवी, माजी महासंचालक डॉ.शेखर मांडे ,मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे माजी कुलगुरू डॉ. गणपती यादव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताला चार पदके

- आंतरराष्ट्रीय गणित आणि भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये

पदकांची लयलूट केल्यानंतर भारतीय विद्यार्थ्यांच्या संघाने सौदी अरेबियातील रियाध शहरात रंगलेल्या 56 व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये एक सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले आहे.

- 2024 च्या या स्पर्धेत 94 देशांतील (5 निरीक्षक देशांसह) 327विद्यार्थी सहभागी झाले होते.
- देशनिहाय पदकतालिकेत या वर्षी भारत अकराव्या स्थानी आहे.
- सौदी अरेबियातील रियाध शहरात 21 ते 30 जुलै या कालावधीत 56 व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडचे 2024आयोजन करण्यात आले होते.
- भारतीय विद्यार्थ्यांच्या संघातील महाराष्ट्रातील जळगावमधील देवेश पंकज भैया याने सुवर्ण पदक पटकावले.
- मुंबईतील अवनीश बन्सल आणि तेलंगणामधील हैदराबाद येथील हर्षिन पोसीना यांनी रौप्य पदकांची कमाई केली.
- तर मुंबईतील कश्यप खंडेलवाल याने कांस्य पदक जिंकले.
- होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र हे, विविध ठिकाणी होणाऱ्या गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्रातील आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड्स मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विद्यार्थ्यांना निवडण्याचे तसेच प्रशिक्षणाचे नोडल केंद्र आहे.
- होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राद्वारे घेतली जाणारी राष्ट्रीय ऑलिम्पियाड परीक्षा अंतिम संघ निवडीसाठीचे प्रवेशद्वार म्हणून ओळखली जाते.

## फिजिक्स ऑलिम्पियाड'मध्ये भारतीय संघाला पाच पदके

- इराणमध्ये झालेल्या 54 व्या 'इंटरनॅशनल फिजिक्स ऑलिम्पियाड'मध्ये भारतीय संघाने

पाच पदके मिळवण्याची कामगिरी केली.

- भारतीय संघाला दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदके मिळाली असून, संघातील सर्व पाचही सदस्यांनी ही पदके पटकाविली.
- 21 ते 29 जुलै या कालावधीत इराणमधील इस्फाहान येथे ही स्पर्धा झाली.
- भारतीय संघातील छत्तीसगढ येथील रिदम केडिया आणि मध्य प्रदेशातील वेद लाहोटी यांनी सुवर्णपदक, तर नागपूर येथील आकर्ष राज सहाय, उत्तर प्रदेशातील भाव्या तिवारी, राजस्थानमधील जयविर सिंग यांनी रौप्यपदकाची कमाई केली.
- पदकनिहाय निकालात भारतीय संघ व्हिएतनामसह चौथ्या स्थानी राहिला.
- चीनने पहिले, रशियाने दुसरे,रोमानियाने तिसरे स्थान प्राप्त केले.
- स्पर्धेत एकूण 18 सुवर्ण, 25 रौप्य,53 कांस्य पदके देण्यात आली.
- 33 देशांतील एकूण 193 विद्यार्थ्यांचा स्पर्धेत सहभाग होता.
- हरितवायू उत्सर्जनामुळे होणारे परिणाम, पॉल ट्रॅपचा वापर करून आयन पकडणे, डॉप्लर कुलिंग टेक्नॉलॉजी, बायनरी स्टार सिस्टिम स्टॅबिलिटी असे स्पर्धेतील विषय होते.

## गणित ऑलिम्पियाडमध्ये भारताला चार सुवर्ण

- इंग्लंडमधील बाथ शहरात पार पडलेल्या 65 व्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये (आयएमओ 2024) सहा विद्यार्थ्यांच्या भारतीय संघाने 4 सुवर्ण व 1 रौप्य पदक आणि एका विशेष पारितोषिकाची कमाई केली.
- आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये 1989 मध्ये पदार्पण केल्यानंतर भारतीय संघाची ही आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी असून भारताने यावर्षी 108 देशांमधून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

- यापूर्वी 'आयएमओ' 1998 आणि 2001 मध्ये भारत सातव्या क्रमांकावर होता.
- इंग्लंडमधील बाथ शहरात 11 ते 22 जुलै या कालावधीत 65 व्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडचे आयोजन करण्यात आले होते.
- या स्पर्धेत एकूण 108 देशातील 609 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्यामध्ये 528 विद्यार्थी आणि 81 विद्यार्थिनींचा समावेश होता.
- सहा विद्यार्थ्यांच्या भारतीय संघातील पुण्यातील आदित्य मांगुडी वेंकट गणेश (इयत्ता अकरावी), गुवाहाटीतील आनंदा भादुरी (इयत्ता बारावी), नोएडातील कणव तलवार (इयत्ता दहावी) आणि मुंबईतील रुशील माथुर (इयत्ता बारावी) यांनी सुवर्ण पदकाची कमाई केली.
- दिल्लीतील अर्जुन गुप्ता (इयत्ता बारावी) याने रौप्य पदक पटकावले, तर पुण्यातील सिद्धार्थ चोप्रा (इयत्ता बारावी) याने विशेष पारितोषिक प्राप्त केले.
- या स्पर्धेच्या अंतिम जागतिक क्रमवारीत अमेरिकेने 192 गुणांची कमाई करीत प्रथम स्थान, चीन आणि दक्षिण कोरिया यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले.
- तर भारतीय संघाने 167 गुणांची कमाई करीत चौथ्या स्थान पटकावले.

## जीवशास्त्र ऑलिंपियाड स्पर्धा, 2024



- भारतीय विद्यार्थ्यांच्या संघाने 35 व्या आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये दमदार यश मिळवले.
- एका विद्यार्थ्याने सुवर्णपदक पटकाविले, तर तीन विद्यार्थ्यांनी रौप्यपदकाची कमाई केली.
- पदकविजेत्यांमध्ये महाराष्ट्रातील दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

- कझाकिस्तानमध्ये अस्ताना येथे 7 ते 13 जुलै या कालावधीत ही स्पर्धा झाली.
- मुंबईच्या वेदान्त साकरे या विद्यार्थ्याने सुवर्णपदक पटकाविले, तर रत्नागिरीचा ईशान पेडणेकर, चेन्नईचा श्रीजित सीवाकुमार, बरेलीचा यशस्वी कुमार या विद्यार्थ्यांनी रौप्य पदक मिळवले.
- टीडीएम प्रयोगशाळेचे प्राध्यापक शशी कुमार मेनन, टाटा मूलभूत संशोधन संस्थेतील होमी भाभा, विज्ञान शिक्षण केंद्रातील डॉक्टर मयुरी रेगे यांनी या संघाचे नेतृत्व केले.
- आयआयटी मुंबईतील डॉक्टर राजेश पाटकर, बडोदा येथील एम. एस. विद्यापीठातील डॉक्टर देवेश सुतार यांनी वैज्ञानिक निरीक्षक म्हणून काम केले.
- यावर्षीच्या जीवशास्त्र ऑलिंपियाडमध्ये 80 देशातील 305 विद्यार्थ्यांचा समावेश होता.
- स्पर्धेत एकूण 29 सुवर्णपदके देण्यात आली.

## श्वसन करणाऱ्या रॉकेटची यशस्वी चाचणी

- भारतीय अवकाश संशोधन संस्थेतर्फे (इस्रो) श्वसन करणाऱ्या इंधन यंत्रणेची (एअर ब्रीदिंग प्रॉपल्शन टेक्नॉलॉजी) श्रीहरिकोटा येथे यशस्वी चाचणी घेण्यात आली.
- या चाचणीसाठी 'आरएच 560' हे साउंडिंग रॉकेट वापरण्यात आले.
- या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग भविष्यातील कमी खर्चाच्या आणि पुनर्वापर करता येणाऱ्या रॉकेटमध्ये केला जाणार आहे.
- 'इस्रो' तर्फे गेल्या महिन्यात भविष्यवेधी रियूजेबल लाँच वेहिकलच्या(आरएलव्ही) लँडिंग प्रयोगाची तिसरी आणि अखेरची यशस्वी चाचणी घेण्यात आली.
- या चाचणीमधून अमेरिकी अवकाश यानासारख्या दिसणाऱ्या पुष्पक यानाला जमिनीपासून चार किलोमीटर उंचावर नेऊन स्वयंचलित पद्धतीने धावपट्टीवर विमानासारखे उतरवण्यात आले.

- आता या यानाला कमी खर्चात अवकाशात नेऊ शकणाऱ्या तंत्रज्ञानाची दुसरी चाचणीही यशस्वी झाली.
- श्रीहरिकोटा येथे 22 जुलै रोजी सकाळी चाचणीवेळी रोहिणी साउंडिंग रॉकेटला 'इस्रो' ने विकसित केलेले स्क्रॅमजेट इंजिन जोडण्यात आले होते.
- रॉकेट वातावरणातून ध्वनीपेक्षा जास्त वेगाने प्रवास करत असताना 'स्क्रॅमजेट'च्या साह्याने वातावरणातील ऑक्सिजन शोषला जाऊन त्याचा वापर 'ऑक्सिडायझर' म्हणून केला जातो.
- या तंत्रज्ञानामुळे रॉकेटमधील इंधनाच्या मिश्रणात वापरण्यात येणाऱ्या 'ऑक्सिडायझर' चे वजन कमी होऊन रॉकेट हलके होते आणि खर्चातही बचत होते.
- **कमी खर्चात अवकाश प्रवास शक्य**
- या चाचणीत विविध 110 प्रकारच्या घटकांची पडताळणी करण्यात आली.
- हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष वातावरणात वापरण्याआधी विक्रम साराभाई अवकाश केंद्र, लिक्विड प्रॉपल्शन सिस्टीम सेंटर आणि नॅशनल एअरोस्पेस लॅबोरेटरी येथे जमिनीवरील चाचण्या यशस्वीपणे पार पडल्या होत्या.
- याआधी या तंत्रज्ञानाची पहिली चाचणी 28 ऑगस्ट 2016 रोजी यशस्वी झाली होती.
- भविष्यात श्वसन करणारे रॉकेट आणि पुनर्वापर करता येणारे यान यांच्या साह्याने कमी खर्चात अवकाश प्रवास किंवा उपग्रह प्रक्षेपणाची 'इस्रो'ची योजना आहे.
- स्क्रॅमजेट तंत्रज्ञान अवगत असलेला भारत हा जगातील चौथा देश आहे.

## तारा नष्ट करणाऱ्या 'पल्सार'चा शोध

- पुण्यातील नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्समधील (एनसीआरए) शास्त्रज्ञांनी सूर्यपेक्षा दहा पटींनी कमी वस्तुमानाच्या ताऱ्याला नष्ट करणाऱ्या

'पल्सार'ची दुर्मीळ घटना समोर आणली आहे.

- अमेरिका आणि ब्रिटनमधील शास्त्रज्ञांसोबत केलेल्या या संशोधनासाठी जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोपच्या (जीएमआरटी) नोंदींचा वापर करण्यात आला आहे.

**पल्सार म्हणजे काय?**

✓ 'पल्सार' हा आकाराने लहान, अतिशय घन आणि अधिक वयाचा न्यूट्रॉन तारा असून, तो अत्यंत वेगाने स्वत:भोवती फिरत असतो.

✓ या ताऱ्यामधून उत्सर्जित होणारे रेडिओ संदेश पृथ्वीवर विशिष्ट कालावधीने नोंदले जात असल्यामुळे त्याला 'पल्सार' म्हणतात.

✓ काही पल्सार एका सेकंदामध्ये शेकडो वेळा स्वत:भोवती फिरतात, अशांना 'मिलिसेकंद पल्सार' म्हणतात.

✓ 2016 मध्ये 'एनसीआरए'मधील प्रा. भासवती भट्टाचार्य आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'जीएमआरटी'च्या नोंदींच्या साह्याने 'जे 1242-4712' या मिलिसेकंदचा शोध लावला होता.

**सूक्ष्म बदल टिपला**

➢ संस्थेतील पीएचडीची विद्यार्थिनी असलेल्या अंकिता घोषच्या पुढाकाराने झालेल्या संशोधनातून खगोल शास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय गटाने 'जे 1242-4712' या 'पल्सार'च्या क्षेत्रातील घडामोडी समोर आणल्या आहेत.

➢ 'एनसीआरए'ने दिलेल्या माहितीनुसार, अद्ययावत जीएमआरटीच्या साह्याने शास्त्रज्ञांनी 400 आणि 650 मेगाहर्टझ फ्रीक्वेन्सीवर या 'पल्सार'च्या 2.4 मायक्रोसेकंदच्या अचूकतेने नोंदी घेतल्या.

➢ या नोंदींमधून 'पल्सार'च्या संदेशांमध्ये होणारा सूक्ष्म बदल टिपण्यात आला.

**वस्तुमानाचा ऱ्हास**

❖ जे 1242-4712' पल्सारला आपल्या सूर्यपेक्षा दहा पटींनी कमी वजन असलेला जोडीदार असून, हे दोन्ही तारे एकमेकांभोवती 7.7 तासांत एक प्रदक्षिणा पूर्ण करतात.

❖ या काळात काही वेळा या जोडीकडून येणाऱ्या संदेशांची तीव्रता कमी होते.

❖ 'पल्सार'कडून मुक्त होणाऱ्या तीव्र ऊर्जेमुळे त्याच्या जोडीदार ताऱ्याच्या वस्तुमानाचा ऱ्हास होत असून, एक प्रकारे 'पल्सार' त्याच्या जोडीदाराला नष्ट करत आहे.

❖ जोडीदार ताऱ्यातून बाहेर पडलेल्या वस्तुमानामुळे 'पल्सार'कडून येणाऱ्या रेडिओ संदेशांची तीव्रता कमी होते, असे या संशोधनातून समोर आले आहे.

❖ हे संशोधन 'ॲस्ट्रोफिजिकल जर्नल'मध्ये नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

## क्राउडस्ट्राइक अपडेटमुळे मायक्रोसॉफ्टची 15 तास सेवा ठप्प



- अमेरिकन अँटी-व्हायरस कंपनीच्या अपडेटमुळे मायक्रोसॉफ्टवर परिणाम झाला. त्यामुळे 19 जुलै रोजी सकाळी 5 ते रात्री 8 वाजेपर्यंत 15 तास विमानसेवा, टीव्ही टेलिकास्ट, बँकिंग आणि जगभरातील अनेक कॉर्पोरेट कंपन्यांच्या कामकाजावर परिणाम झाला. जवळपास 1400 उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.
- ऑनलाइन सेवा ठप्प झाल्यामुळे अनेक विमानतळांवर फ्लाइट बोर्डिंग पास हाताने देण्यात आले.

**क्राउडस्ट्राइक अपडेटमुळे मायक्रोसॉफ्ट सेवा ठप्प**

✓ जगभरातील काही मायक्रोसॉफ्ट विंडोज वापरकर्ते त्यांच्या लॅपटॉपवर निळ्या स्क्रीनचा अनुभव घेत आहेत. यामुळे त्यांची प्रणाली आपोआप रीस्टार्ट किंवा बंद होते.

✓ डेल टेक्नोलॉजीजने ही समस्या अलीकडील क्राउडस्ट्राइक अपडेटमुळे झाली असल्याचे नमूद केले

✓ क्राइडस्ट्राइक हे सायबर सुरक्षा प्लॅटफॉर्म आहे जे वापरकर्त्यांना सुरक्षा उपाय प्रदान करते.

✓ क्राउडस्ट्राइक अपडेटमुळे मायक्रोसॉफ्टच्या अझुर क्लाउड आणि मायक्रोसॉफ्ट 365 सेवांमध्ये समस्या निर्माण झाल्या आहेत.

✓ **मायक्रोसॉफ्ट अझुर हे क्लाउड कॉम्प्युटिंग प्लॅटफॉर्म आहे.**

✓ मायक्रोसॉफ्ट अझुर हे क्लाउड कॉम्प्युटिंग प्लॅटफॉर्म आहे. हे अनुप्रयोग आणि सेवा तयार करणे, तैनात करणे आणि व्यवस्थापित करण्यासाठी कार्य करते. Microsoft 365 हे उत्पादकता सॉफ्टवेअर आहे, ज्यामध्ये वर्ड, एक्सेल, पॉवरपॉइंट, आउटलुक आणि वन नोट सारख्या लोकप्रिय अनुप्रयोगांचा समावेश आहे.

**'ब्लू स्क्रीन ऑफ डेथ' म्हणजे काय?**

- 'ब्लू स्क्रीन ऑफ डेथ' ही मायक्रोसॉफ्ट विंडोज आणि रिॲक्टओएस ऑपरेटिंग सिस्टीमवर दर्शवली जाणारी महत्त्वपूर्ण आणि गंभीर त्रुटी आहे.
- ऑपरेटिंग सिस्टीम सुरक्षितपणे काम करणे अशक्य होते, अशा परिस्थितीत सिस्टीम कोलमडल्याचे या स्क्रीनद्वारे दर्शवले जाते. या त्रुटीला 'ब्लू स्क्रीन एरर', 'ब्लॅक स्क्रीन एरर' किंवा 'स्टॉप कोड एरर' असेही म्हटले जाते.
- विंडोजला अनपेक्षितपणे बंद किंवा रिस्टार्ट करावे लागले की, हा एरर उद्भवतो.
- 'तुमच्या कम्प्युटरचे नुकसान टाळण्यासाठी विंडोज शटडाऊन करण्यात आले आहे' अशा अर्थाचा संदेश दर्शवला जाऊ शकतो.

**द फ्युचर इज नाऊ' या संकल्पनेचे अनावरण**



- केंद्रीय दूरसंचार तसेच ईशान्य प्रदेश विकास मंत्री ज्योतिरादित्य एम.सिंदिया यांच्या हस्ते इंडिया मोबाईल काँग्रेस (आयएमसी) 2024 साठीच्या ‘द फ्युचर इज नाऊ’ या संकल्पनेचे अनावरण करण्यात आले.

- आयएमसी 2024 जागतिक पातळीवरील विचारवंत, अग्रणी आणि संशोधक अशा सर्व प्रमुख व्यक्तींना एकमेकांशी सहयोग साधून आपल्या जगात आज परिवर्तन घडवून आणणाऱ्या तंत्रज्ञानांना आकार देण्यासाठी एकत्र आणून भविष्य ही केवळ एक संकल्पना नसून ते वास्तवात घडते आहे हे दाखवून देण्याचा मंच आहे.
- केंद्रीय संचार तसेच ईशान्य प्रदेश विकास मंत्री ज्योतिरादित्य एम.सिंदिया यांनी यावेळी इंडिया मोबाईल काँग्रेस 2024 मधील नोंदणीसाठीचे वैशिष्ट्यपूर्ण परस्परसंवादात्मक असे विशेष ॲप्लिकेशन आणि संकेतस्थळ देखील सुरु केले.
- इंडिया मोबाईल काँग्रेस या आशियातील प्रमुख डिजिटल तंत्रज्ञानविषयक प्रदर्शनाचे हे आठवे वर्ष असून केंद्रीय दूरसंचार विभाग आणि सेल्युलर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया यांच्याकडे या काँग्रेसचे सह-यजमानपद आहे.
- यावर्षी (2024) नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर 15 ऑक्टोबरपासून इंडिया मोबाईल काँग्रेस होणार आहे.

## जगातील पहिल्या सीएनजी दुचाकीचे अनावरण



- सीएनजी इंधनावर चालणाऱ्या जगातील पहिल्या दुचाकीचे बजाज ऑटोने अनावरण केले.
- 'फ्रीडम' असे या दुचाकीचे नामकरण करण्यात आले असून, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.
- बजाज 'फ्रीडम' ही सीएनजी दुचाकी तीन प्रकारांमध्ये दाखल झाली आहे.

**वैशिष्ट्ये:**

✓ दुचाकीला अतिरिक्त दोन लिटरची पेट्रोलची टाकी आहे. त्यावर दुचाकी आणखी 130 किलोमीटरचे अंतर कापू शकेल.

✓ सीएनजी संपल्यास चालकाला पेट्रोलचा पर्याय उपलब्ध असेल.

✓ सीएनजी दुचाकीमुळे पर्यावरण राक्षणास मदत होणार आहे.

✓ पेट्रोल वरील वाहनाच्या तुलनेत सीएनजी वरील वाहनामुळे होणारे कार्बन उत्सर्जन केवळ 26.7% आहे.

✓ बजाजच्या फ्रीडम दुसाकीने सुरक्षिततेच्या 11 चाचणी यशस्वीपणे पार केले आहेत.

✓ दुचाकीची सीट 28.9 इंच लांबीची. एवढ्या लांबीची सीट असणारी ही जगातील पहिली मोटारसायकल.

✓ सीएनजी टाकी 16किलोची, क्षमता 2 किलो


✓ डिस्क एलइडी, ड्रम एलइडी, आणि ड्रम असे तीन पर्याय सात रंगांत उपलब्ध

✓ एक किलो सीएनजीमध्ये 102 किमी

✓ एक लिटर पेट्रोलमध्ये 65 किमी

✓ इंधन खर्चात पाच वर्षांत 75 हजार रुपये बचतीचा दावा

## 'आदित्य-एल-1'ची पहिली कक्षा पूर्ण



- 'आदित्य एल-1' या यानाने सूर्य आणि पृथ्वीमधील एल-1 बिंदूभोवती पहिली प्रभामंडल कक्षा पूर्ण केली.
- आदित्य एल-1 ला प्रभामंडल कक्षेत 'एलवन' बिंदूभोवती एक फेरी पूर्ण करण्यासाठी 178 दिवस लागतात.
- प्रभामंडल कक्षेतील प्रवासादरम्यान या यानाला विविध त्रासदायक बलांचा सामना करावा लागेल.

**सूर्याचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याचा शोधासाठी सात पेलोड्स**

- या मोहिमेमागे इस्रोची अनेक उद्दिष्टे आहेत.
- ज्याप्रमाणे पृथ्वीवर भूकंप होतात त्याचप्रमाणे सौर भूकंप देखील होतात,

ज्याला कोरोनल मास इजेक्शन म्हणतात.

- सौर कंपनांचा अभ्यास करण्यासाठी सूर्याचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. भारताची पहिली सौर मोहीम 'आदित्य' मध्ये सूर्याचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याचा शोध घेण्यासाठी सात पेलोड्स आहेत.
- आदित्य एल-1 हे भारतीय अंतराळ संशोधन संस्था द्वारे विकसित केले गेलेले अतंराळयान असून दिनांक 7 सप्टेंबर 2023 रोजी यशस्वीरित्या प्रक्षेपित केले आहे.
- सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आणि सौर वायू आणि हवामान याबद्दल माहिती गोळा करण्यासाठी समर्पित आहे.
- हे भारताचे पहिले सौर मिशन आहे.

## 'कू' ॲप अखेर बंद

- 'एक्स'ला (पूर्वीचे ट्विटर) पर्यायी ॲप म्हणून चार वर्षांपूर्वी लाँच झालेले भारतीय बनावटीचे 'कू' ॲप अखेर बंद करत असल्याची घोषणा संस्थापकांनी केली.
- 'कू'चे संस्थापक अपरामेय राधाकृष्ण आणि सहसंस्थापक मयंक बिदवात्का यांनी याबाबतची माहिती दिली.
- 2020 मध्ये भारतीय बनावटीचे आणि बहुभाषिक संवादासाठी 'कू' हे मायक्रोब्लॉगिंग ॲप लाँच करण्यात आले होते.

## जागतिक इंडिया एआय शिखर परिषद 2024




- दोन दिवसीय जागतिक इंडिया एआय शिखर परिषद 2024चा नवी दिल्लीत भारत मंडपममध्ये प्रारंभ झाला.
- केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान, रेल्वे आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जपानचे गृह आणि दळणवळण खात्याचे

उपमंत्री हिरोशी योशिदा, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितीन प्रसाद, सचिव एस कृष्णन, नॅसकॉमच्या अध्यक्ष देबजानी घोष, ओपनएआयचे उपाध्यक्ष श्रीनिवास नारायणन् आणि मेतीचे अतिरिक्त सचिव अभिषेक सिंग शिखर परिषदेच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित होते.

## डिजिटल इंडियाला 9 वर्षे पूर्ण




- ऑनलाइन पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून तसेच इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवून सरकारी सेवा नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकारने डिजिटल इंडिया मोहीम सुरू केली.
- तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाला डिजिटल पद्धतीने सक्षम बनवण्याचाही त्याचा उद्देश आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 जुलै 2015 रोजी मोहीम सुरू केली.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल इंडिया उपक्रमाने यशस्वीरित्या 9 वर्षे पूर्ण केल्याबद्दल प्रशंसा केली आहे.
- जीवनमान सुलभता आणि पारदर्शकतेला चालना देणाऱ्या सक्षम भारताचे डिजिटल इंडिया हे प्रतीक आहे, असे ते म्हणाले.

**डिजिटल इंडिया म्हणजे....**

✓ डिजिटल इंडिया हा ग्रामीण भागात हाय-स्पीड इंटरनेट नेटवर्क उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकारने घेतलेला पुढाकार होता.

✓ मेक इन इंडिया, भारतमाला, सागरमाला, स्टार्टअप इंडिया, भारतनेट आणि स्टँडअप इंडिया यासह इतर सरकारी योजनांचे लाभार्थी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 जुलै 2015 रोजी डिजिटल इंडिया मिशन सुरू केले.

- ✓ **डिजिटल इंडिया मिशनचे ब्रीदवाक्य : 'सशक्तीकरणाची शक्ती'**
- ✓ डिजिटल इंडिया उपक्रमाचे तीन प्रमुख घटक आहेत. ते म्हणजे डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे, सेवांचे डिजिटल वितरण आणि डिजिटल साक्षरता.

**उद्दिष्टे:**

- ➢ सर्व ग्रामपंचायतींमध्ये हायस्पीड इंटरनेट उपलब्ध करून देणे.
- ➢ सर्व परिसरातील कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) मध्ये सहज प्रवेश प्रदान करण्यासाठी.
- ➢ डिजिटल इंडिया हा एक असा उपक्रम आहे जो मोठ्या संख्येने कल्पना आणि विचारांना एकाच, सर्वसमावेशक दृष्टीमध्ये एकत्रित करतो जेणेकरून त्या प्रत्येकाकडे मोठ्या ध्येयाचा भाग म्हणून पाहिले जाईल.
- ➢ डिजीटल इंडिया कार्यक्रम अनेक विद्यमान योजनांची पुनर्रचना करण्यावर लक्ष केंद्रित करतो ज्या समक्रमित पद्धतीने लागू केल्या जाऊ शकतात.

-------------------



# 7. निधन

## आर. संपतन यांचे निधन



- श्रीलंकेतील तमिळ नागरिकांच्या न्याय आणि सन्मानासाठी जीवन समर्पित करणारे ज्येष्ठ राजकारणी आणि तमिळ नेते आर. संपतन यांचे वयाच्या 91 व्या वर्षी निधन झाले.
- आर. संपतन श्रीलंकेतील तमिळ नॅशनल अलायन्सचे 2004 पासून नेतृत्व करीत होते.
- सिंहला समाज बहुसंख्य असलेल्या श्रीलंकेमध्ये ते प्रमुख विरोधी नेते होणारे दुसरे नेते होते. अनेक दिवसांपासून ते आजारी होते.
- श्रीलंकेतील विभाजन दूर करण्यासाठी संपतन यांनी न थकता काम केले.

## प्रेमाताई पुरव यांचे निधन



- हजारो महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देत आत्मनिर्भर बनविण्यामध्ये योगदान देणाऱ्या 'अन्नपूर्णा महिला मंडळ' व 'अन्नपूर्णा परिवारा' च्या संस्थापक आणि गोवा मुक्ती

संग्रामातील स्वातंत्र्यसेनानी प्रेमाताई पुरव यांचे वृद्धापकाळाने वयाच्या 88 व्या वर्षी निधन झाले.

- केंद्र सरकारने 2002 मध्ये पद्मश्री किताबाने त्यांच्या कार्याचा गौरव केला होता.

### अन्नपूर्णाच्या कामाला चालना...

✓ इंदिरा गांधी यांनी केलेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे 20 टक्के कर्ज दुर्बल घटकांना द्यायचे धोरण आले.


✓ त्याचा उपयोग 'अन्नपूर्णा'च्या बायकांचे गट करून त्यांच्यासाठी कर्ज घेण्यासाठी झाला आणि 'अन्नपूर्णा'च्या कामाला चालना मिळाली.

✓ नवऱ्याचे नाव लावल्याने दारूडे नवरे बायकांकडे कर्जातला हिस्सा मागू लागले. त्यावर बँकवाल्यांशी झगडून प्रेमाताईंनी मार्ग काढले.

✓ आईचे नाव मुलाला लावता येणे, घरावर नवऱ्याबरोबर बायकोचे नाव हवे यासाठी प्रेमाताईंचे प्रयत्न पुढे यशस्वी झाले.

✓ 'मायक्रोक्रेडिट'ची कल्पना इला भट, जया अरुणाचलम आणि प्रेमाताई अशा तिघींनी आणली.

## रॉबर्ट टाउन यांचे निधन



- 'चाइनाटाउन' चित्रपटासाठी ऑस्कर पुरस्कार मिळवणारे लेखक रॉबर्ट टाउन यांचे लॉस एंजलिस येथील राहत्या घरी वयाच्या 89 व्या वर्षी निधन झाले.
- साठच्या दशकात अभिनेता, लेखक म्हणून काम केलेले टाउन हे चित्रपट इतिहासातील सर्वांत मागणी असलेले पटकथालेखक बनले.
- 1974 या वर्षी 'चाइनाटाउन' साठी पुरस्काराने गौरविण्यात आले.

## जॉन लँडो यांचे निधन



- ऑस्कर विजेते निर्माते जॉन लँडो यांचे वयाच्या 63 व्या वर्षी अमेरिकेत निधन झाले.
- 'अवतार'चे दोन भाग आणि 'टायटॅनिक' या दिग्दर्शक जेम्स कॅमेरून यांच्यासोबत आतापर्यंतच्या तीन सर्वांत मोठ्या ब्लॉकबस्टर चित्रपटांची त्यांनी निर्मिती केली होती.
- लँडो यांच्या कारकिर्दीस सन 1980 च्या दशकात प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून सुरुवात झाली.
- 'हनी आय श्रंक द किड्स' आणि 'डिक ट्रेसी'साठी त्यांनी सहनिर्माता म्हणून काम केले.
- जागतिक बॉक्स ऑफिसवर एक अब्ज डॉलरची कमाई करणारा 'टायटॅनिक' पहिला चित्रपट ठरला आणि त्याने सर्वोत्कृष्ट चित्रासह 11 ऑस्कर जिंकले.

## एअर मार्शल रणजित सिंग बेदी (निवृत्त) यांचे निधन



- एअर मार्शल रणजित सिंग बेदी (निवृत्त), भारतीय हवाई दलाचे वरिष्ठ अधिकारी आणि 1965 आणि 1971 च्या युद्धातील दिग्गज आणि चंदीगड नगर परिषदेचे माजी नगरसेवक यांचे अल्पशा आजाराने नवी दिल्लीत वयाच्या 90 व्या वर्षी निधन झाले.
- नियोजन, अचूकता आणि प्रावीण्य यांचे महत्त्व भारतीय हवाई दलाचे एअर मार्शल रणजितसिंह बेदी (निवृत्त) यांना चांगलेच ज्ञात होते.
- सहकाऱ्याच्या विमानाची धडक बसल्यानंतरही जमिनीवर कोसळण्याच्या बेतात असणाऱ्या आपल्या ‘मिग 21’चे अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी नियंत्रण गमावले नाही! विलक्षण कसब दाखवत अपघातग्रस्त विमान चंडीगढ

हवाई तळावर आणले.1970 मध्ये प्रजासत्ताक दिन सोहळ्याच्या मानवंदना उड्डाणातील (फ्लायपास्ट) रंगीत तालमीत ही घटना घडली होती.

- राजपथावर हिऱ्याच्या आकारात (डायमंड फॉर्मेशनमध्ये) मिग 21 विमाने मार्गक्रमण करीत असताना हा अपघात झाला होता.
- या फॉर्मेशनचे नेतृत्व बेदी यांच्याकडे होते.
- प्रचंड ताणतणाव, दबाव असताना शांत, धीरोदात्तपणे कार्यरत राहण्याचा आदर्श त्यांनी वैमानिकांसमोर ठेवला. याबद्दल त्यांना **वायू सेना** पदकाने सन्मानित करण्यात आले.
- भारत-पाकिस्तानच्या 1965आणि 1971 मधील युद्धात त्यांचा सहभाग होता.
- एअर मार्शल बेदी हे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या नवव्या शिक्षणक्रमाचे विद्यार्थी.
- 1956 मध्ये त्यांना वैमानिक शिक्षणक्रमातून हवाई दल प्रबोधिनीत नियुक्ती मिळाली.
- लढाऊ विमानासाठी निवड झाली.
- डी. हॅविलँ ॅड, हॉकर हंटर, मिग 21 आदी विमानांचे त्यांनी सारथ्य केले.
- हवाई दलाच्या पहिला एरोबिक्स संघ स्थापनेपासून ते जुन्या विमानांवर कार्यरत वैमानिकांना मिग 21 विमान संचलनासाठी तयार करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.
- अल्फा तुकडीचे विभागीय अधिकारी म्हणून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत जबाबदारी सांभाळली.
- 1965 च्या युद्धात हवाई गस्त व फ्लाइट कमांडरची धुरा सांभाळणाऱ्या बेदी यांनी 1971 च्या युद्धात ‘एस्कॉर्ट’ म्हणून तसेच गस्तमोहिमांसाठी उड्डाण केले.
- विंग कमांडर या पदोन्नतीवर त्यांची 27 स्क्वाड्रनचे कमांडिंग अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.
- टॅक्टिकल एअर कमांड, प्रमुख कार्यवाही अधिकारी, कमांडिंग हवाई अधिकारी या पदोन्नतींनंतर त्यांनी हवाई दलाच्या पश्चिम मुख्यालयात प्रभारी वरिष्ठ अधिकारी (प्रशासन)

आणि एअर मार्शल म्हणून पूर्वेकडील एअर कमांडचे वरिष्ठ हवाई कर्मचारी अधिकारी म्हणून काम केले.

- त्यांची दलातील अखेरची नियुक्ती महासंचालक (संरक्षण कर्मचारी नियोजन) म्हणून झाली होती.
- 39 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नोव्हेंबर 1993 मध्ये ते निवृत्त झाले.
- निवृत्तीनंतर चंडीगढ महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून ते निवडून आले होते.
- संरक्षण व सामरिकशास्त्र विषयांवर विपुल लेखन केले.
- **'रॅण्डम थॉट्स : नॅशनल सिक्युरिटी अ◌ॅण्ड करंट इश्यूज'** हे पुस्तकही त्यांच्या नावावर आहे.

## सुभाष दांडेकर यांचे निधन



- सामाजिक भान, कलेची जाण व उद्यमशीलता अंगी बाळगणारे 'कॅम्लिन फाइन सायन्सेस'चे संस्थापक व 'कोकुयो कॅम्लिन'चे मानद अध्यक्ष सुभाष दांडेकर यांचे वयाच्या 85 व्या वर्षी निधन झाले.
- चित्रकलेसाठीच्या साहित्य व निर्मितीतील अग्रेसर अशा कॅम्लिन उद्योग समूहाची धुरा सुभाष दांडेकर यांनी गेली अनेक वर्षे सांभाळली होती.
- कला आणि उद्योग क्षेत्रासह विशेषतः कॅम्लिन कुटुंबातील अनेकांसाठी ते मार्गदर्शक होते.
- त्यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक भान जपले आणि स्वयंसेवी संस्थांनाही सहकार्य केले.
- 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री' चे ते माजी अध्यक्ष होते.
- सरकारने विविध नगरविकास उपक्रमांसाठी त्यांची नियुक्तीकेली होती.
- उद्योग क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'गेम चेंजर्स ऑफ

महाराष्ट्र', 'लाइफ टाइम अचीव्हमेंट अवॉर्ड' अशा पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले.

- काळानुसार बदलत गेलेल्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून सतत नवे प्रयोग करण्यावर त्यांनी भर दिला.
- त्याच वेळी उत्पादनांची गुणवत्ता व मूल्यांशी कधीच तडजोड केली नाही.

## डॉ. एस. ए. पाटील यांचे निधन

- पुणे कृषिशास्त्रज्ञ आणि भारतीय कृषी संशोधन संस्थेचे माजी संचालक डॉ. एस. ए. पाटील यांचे वयाच्या 78 व्या वर्षी निधन झाले.
- डॉ. पाटील धारवाड कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू होते.
- डॉ. पाटील हे कृषी अध्यापन, संशोधन, विस्तार, विकास आणि प्रशासनाशी संबंधित पन्नास संस्थांमध्ये कार्यरत होते.
- त्यांनी कापूस, भुईमूग, सूर्यफूल आणि एरंड या पिकांच्या 16 संकरित आणि उच्च उत्पन्न देणाऱ्या जाती विकसित केल्या.
- त्यांनी विकसित केलेले कापसाचे 'वरलक्ष्मी' हे जगातील पहिले लांब धाग्याचे हायब्रीड वाण आहे.
- त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले होते.

## कमला पुजारी यांचे निधन



- पद्मश्री पुरस्कार प्राप्त आणि प्रख्यात सेंद्रिय शेतकरी कमला पुजारी यांचे शनिवारी मूत्रपिंडाशी संबंधित आजाराने वयाच्या 74 व्या वर्षी निधन झाले.
- ओडिशातील कोरापुट जिल्ह्यातील पत्रपुट गावात जन्मलेल्या कमला पुजारी यांनी सेंद्रिय शेतीला सुरुवात केली.
- 2019 मध्ये तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

- कमला यांनी शेतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## फादर दिब्रिटो यांचे निधन

- 93 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि हरित वसई चळवळीचे प्रणेते सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे वयाच्या 82 व्या वर्षी निधन झाले.
- साहित्य, पर्यावरण आणि समाजकारण या क्षेत्रांत कार्यरत राहून भरीव योगदान देणारे धर्मगुरू, अशी त्यांची ओळख होती.

**अल्पपरीचय:**

- विरार पश्चिमेकडील नंदाखाल गावात 4 डिसेंबर 1942 रोजी जन्मलेल्या फ्रान्सिस दिब्रेटो यांचे प्राथमिक शिक्षण गावातील सेंट जोसेफ मराठी हायस्कूल मध्ये झाले.
- फादर दिब्रिटो हे वयाच्या 29 व्या वर्षी धर्मगुरु झाले.
- त्यांनी पुणे विद्यापीठातून समाजशास्त्रात बी.ए., तर धर्मशास्त्रात एम.ए. केले.
- त्यानंतरच्या काळात त्यांनी विपुल लिखाण केले.
- 'आनंदाचे अंतरंग', 'ओॲसिसच्या शोधात', 'ख्रिस्ताची गोष्ट', 'ख्रिस्ती सण आणि उत्सव', , 'तेजाची पावले', 'नाही मी एकला', 'संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची : इस्त्रायल व परिसराचा संघर्षमय इतिहास, सुबोध बायबल, सृजनाचा मळा, मुलांचे बायबल, सृजनाचा मोहोर, इत्यादी समग्र लिखाण त्यांनी केले.
- धार्मिक अभ्यास करतानाच त्यांनी साहित्य उपासनाही सुरू ठेवली.
- वसईतून प्रसिद्ध होणाऱ्या 'सुवार्ता' या मासिकाचे दीर्घकाळ संपादक होते.
- त्यांच्या विचारांवर आणि लेखनावर बायबलसह ज्ञानोबा-तुकोबांच्या संतसाहित्याचाही मोठा प्रभाव होता.
- साहित्याच्या विविध प्रकारांत लेखन करणाऱ्या दिब्रिटो यांनी बायबलचा मराठी अनुवाद केला. त्याबद्दल त्यांना

साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले.

- 2020 मध्ये उस्मानाबाद(आताचे धाराशिव) येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.
- पत्रकारिता, साहित्य आणि सामाजिक - कार्यासाठी त्यांना राज्यस्तरावरील 22हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत.
- वसईतील हरितपट्टा वाचवण्यासाठी, वाढवण्यासाठीच्या पर्यावरण चळवळीचे ते प्रणेते होते.
- त्याचबरोबर या पट्ट्यात फोफावत चाललेल्या भूमाफिया आणि गुंडगिरीविरोधातही त्यांनी सामान्यजनांची एकजूट करून यशस्वी लढा दिला.

## डॉक्टर स्नेहलता देशमुख यांचे निधन

- मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू व प्रसिद्ध बालरोगतज्ञ, शल्यविशारद डॉक्टर स्नेहलता देशमुख यांचे वयाच्या 85 व्या वर्षी निधन झाले.
- परीक्षा पद्धतीतील बदल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा महाविद्यालयांचे वर्गीकरण आणि व्यवसायभिमुख अभ्यासक्रमांची सुरुवात इत्यादीतून उच्च शिक्षण क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले.
- गर्भसंस्कार, तंत्र आणि मंत्र, तंत्रयुगातील उमलती मने, अरे संस्कार संस्कार, इत्यादी पुस्तकांची लिखाण त्यांनी केले.

-------------------



# 8. कृषी व पर्यावरण

## कोडेक्स एलिमेंटेरियस आयोगाच्या समितीत भारताचा सहभाग



- कोडेक्स एलिमेंटेरियस आयोगाच्या कार्यकारी समितीच्या (सीसीईएक्सईसी) 86 व्या सत्रात भौगोलिक स्थानानुसार (आशिया) निवड झालेला सदस्य देश म्हणून भारत सक्रियपणे सहभागी झाला आहे.
- भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी कमला वर्धन राव यांनी रोम येथील अन्न आणि कृषी संघटनेच्या मुख्यालयात 1 ते 5 जुलै 2024 दरम्यान आयोजित सत्रामध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.
- कोडेक्स एलिमेंटेरियस आयोग ही अन्न आणि कृषी संघटना आणि जागतिक आरोग्य संघटनेने स्थापन केलेली आंतरराष्ट्रीय संस्था असून, ग्राहकांच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि अन्न पदार्थांच्या व्यापारात योग्य पद्धतींना प्रोत्साहन देणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे.

YOUR PERSONAL MENTOR

- सीसीईएक्सईसी नवीन कामाच्या प्रस्तावांचे पुनरावलोकन करण्यामध्ये आणि मानकांच्या विकासाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावते.
- सत्रादरम्यान, भारताने लहान वेलची, हळद आणि व्हॅनिलासह विविध मसाल्यांसाठी मानके विकसित करण्यातील प्रगतीला जोरदार पाठिंबा दिला.
- या मसाल्यांचा एक प्रमुख उत्पादक आणि निर्यातदार देश असल्यामुळे, भारतासाठी हा उपक्रम विशेष महत्वाचा आहे, कारण त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक सुलभ होईल.
- याव्यतिरिक्त, भारताने नामांकित वनस्पती तेलांसाठी मानकांच्या प्रगतीला, शिगा टॉक्सिन-उत्पादक एस्चेरिचिया कोलायच्या नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि अन्न उत्पादन आणि प्रक्रियेमध्ये पाण्याचा सुरक्षित वापर आणि पुनर्वापराचे समर्थन केले आहे.
- खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये पुनर्प्रक्रिया केलेल्या सामग्रीच्या वापराशी संबंधित अन्न सुरक्षेसाठी कोडेक्स मार्गदर्शन विकसित करण्याच्या प्रस्तावालाही भारताने सहमती दर्शवली.
- हवामान बदल, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वतता यासारख्या जागतिक आव्हानांना तोंड देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा आहे. त्याशिवाय, भारताने एफएसएसएआय ने अन्नाच्या संपर्कात येणाऱ्या उपकरणांसाठी ग्राहकांनी वापरलेल्या PET वर पुनर्प्रक्रीया करण्यासाठी विकसित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांबाबतचे आपले अनुभव इतरांना सांगितले.
- उच्च-स्तरीय कार्यकारी समितीचा सदस्य देश म्हणून भारताचा सहभाग, मजबूत अन्न सुरक्षा मानके प्रस्थापित करण्यासाठी आणि जागतिक अन्न व्यापारात न्याय्य पद्धतींना चालना देण्यासाठीची समर्पित भूमिका अधोरेखित करत असून, पर्यायाने

आंतरराष्ट्रीय अन्न उद्योगातील भारताची महत्वाची भूमिका प्रतिबिंबित होते.

## क्रांती कारखान्याला उत्कृष्ट ऊस विकास संवर्धनाचा राष्ट्रीय पुरस्कार



- सांगली येथील कुंडलमधील क्रांती सहकारी साखर कारखान्याला ह राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ दिल्लीचा उत्कृष्ट ऊस विकास संवर्धनाचा राष्ट्रीय पातळीवरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.
- देशातील सर्व 260 सहकारी साखर कारखाने व नऊ राज्यातील साखर संघ सदस्य असलेल्या नवी दिल्लीस्थित राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ या शिखर संस्थेमार्फत दरवर्षी देशातील सहकारी साखर कारखान्यांचे मूल्यांकन करण्यात येते.
- यातीलच एक ऊस उत्पादकता हा असून कारखान्याला त्यातील काटेकोर मूल्यमापन करून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.
- हे पारितोषिक राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी जाहीर केले. याप्रसंगी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे उपस्थित होते.

## देशातील पहिले 'रोडोडेंड्रॉन उद्यान'



- उत्तराखंड मधील पिठोरागड येथील मुनसियारी गावात 35 प्रजातींच्या फुलांचे देशातील पहिले 'रोडोडेंड्रॉन उद्यान' विकसित करण्यात आले.

- 'रोडोडेंड्रॉन आर्बोरियम' असे याचे नाव असून, ही वनस्पती जगभरात सर्वत्र प्रसिद्ध आहे.
- या 35 प्रजातींपैकी पाच प्रजाती केवळ उत्तराखंडमध्ये सापडतात.
- 'या वनस्पतीबाबतच्या पुढील वैज्ञानिक संशोधनासाठी प्रजातींचे जतन करण्याच्या उद्देशाने; तसेच नागरिकांमध्ये रोडोडेंड्रॉनचे पर्यावरणीय आणि आर्थिक महत्त्व रुजवण्याच्या उद्देशाने उत्तराखंड वन विभागाच्या संशोधन शाखेने या उद्यानाची उभारणी केली आहे.

**'रोडोडेंड्रॉन' वनस्पतीचे महत्त्व...**

✓ उत्तराखंडचा राज्य वृक्ष

✓ नागालँडचे राज्य फूल

✓ नेपाळचा राष्ट्रीय वृक्ष

**रोडोडेंड्रॉन'चे वैशिष्ट्य काय?**

➢ हिमालयीन परिसंस्थेमध्ये रोडोडेंड्रॉन एक प्रमुख प्रजाती म्हणून काम करते.

➢ ही वनस्पती पूर्ण बहरात असताना मनमोहक रंगाची फुले येतात. त्यामुळे या फुलांकडे पक्षी आणि कीटक मोठ्या संख्येने आकर्षित होतात.

➢ रोडोडेंड्रॉनच्या फुलामध्ये अँटी ऑक्सिडेंट, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात.

## जेईमी चक्रीवादळ

- फिलिपिन्सला तडाखा देणारे 'जेईमी' हे चक्रीवादळ तैवानच्या दिशेने मार्गक्रमण करत असून खबरदारीचा उपाय म्हणून सर्व कार्यालये, शाळा आणि पर्यटनस्थळे बंद ठेवण्याचा आदेश दिला आहे.
- या वादळामुळे फिलिपिन्समध्ये तुफान पाऊस कोसळत असून किमान 13 जणांचा मृत्यू झाला आहे.
- तैवानमध्येही पावसाला सुरुवात झाली आहे. मासेमारी करण्यासाठी समुद्रात गेलेल्या बोटींना परतण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## आसामचे 'मोइदम्स' युनेस्कोच्या वारसा यादीत

- आसाममधील अहोम राजघराण्याची 600 वर्षे जुनी दफन पद्धत असलेल्या 'मोइदम्स' चा युनेस्कोच्या जागतिक

वारसा यादीत समावेश करण्यात आले.

- ईशान्य भारतातील युनेस्कोच्या यादीत समाविष्ट होणारा हा पहिलाच सांस्कृतिक वारसा ठरला आहे.
- दफन भूमी म्हणून वापरल्या जाणाऱ्या पिरॅमिड सारखी रचना असलेले हे ढिगारे 'मोइदम्स' म्हणून ओळखले जातात.
- त्याचा वापर आसाममधील ताय-अहोम राजघराणे करत होते.
- ज्या राजघराण्याने इ.स 1228 ते 1826 या दरम्यान सुमारे 600 वर्षे आसामवर राज्य केले.
- चरैदेव मोईदान अधिकृतपणे युनेस्कोच्या वारसा यादीत आहे.
- चरैदेव ही अहोम राज्याची राजधानी होती.
- मोईदम ही ईशान्येकडील पहिली सांस्कृतिक संपत्ती आहे. त्याला प्रतिष्ठा मिळाली आहे.
- भारतामध्ये सुरू असलेल्या जागतिक वारसा समितीच्या 46 व्या अधिवेशनात 'मोइदम्स' चा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- 'मोइदम्स' किंवा चरैदेवमधील अहोम राजघराण्यातील दफन पद्धतीला एप्रिल 2014 मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाच्या तात्पुरत्या यादीत पहिल्यांदा - सूचीबद्ध करण्यात आले होते.
- 2019-20 मध्ये राज्य सरकारने - चरैदेव पुरातत्व स्थळाच्या संरक्षण, संवर्धन आणि विकासासाठी 25 कोटी रुपयांची तरतूद केली होती.

**'मोइदम्स' काय आहे?**

- 'मोइदम्स' हे आसाममध्ये 600 वर्षे राज्य करणाऱ्या ताय अहोम राजघराण्याच्या उत्तरार्ध मध्ययुगीन (13 वे-19वे शतक) काळात ढिगाऱ्यावर दफन करण्याची परंपरा आहे.
- 'मोइदम्स' मध्ये प्रिय वस्तूंसह त्यांचे दफन करण्यात येत असे.
- अहोमची पहिली राजधानी चराईदेवमध्ये 'मोइदम्स'आढळतात.

- यात प्रामुख्याने तीन विभाग असून पहिल्या दुमजली विभागात प्रवेशासाठी कमानीचा रस्ता असतो.
- या विभागाला झाकणाऱ्या अर्धगोलाकार असलेल्या मातीच्या टेकडीवर विटा व मातींची संरचना आहे.
- 'मोइदम्स' चा पायाची भिंत बहुभुजाकृती असून पश्चिमेला कमानीचे मजबूत प्रवेशद्वार आहे.
- प्रत्येक कक्षात मध्यवर्ती ठिकाणी मृतदेह ठेवण्यासाठी जागा आहे.
- राजघराण्यातील मृत व्यक्तीबरोबर त्याने वापरलेले सोन्याचे दागिने, हस्तिदंत, कपडे, शस्त्रे आदींचेही दफन केले जात असे.
- 'मोइदम्स' चा आकार छोट्या टेकडीपासून मोठ्या पहाडापर्यंत आहे. ही टेकडी वनस्पतींनी झाकलेली असते.
- हे ऐकून भारताचे 43 वे वारसा स्थळ ठरले आहे.
- याआधी2023 मध्ये 41 वे कोलकत्ता येथील 'शांतीनेकतेन' तर 42 वे कर्नाटकातील 'होयसळ मंदिर' हे जागतिक वारसा स्थळ म्हणून युनोस्कोने घोषित केले होते.

## सादो खाणीला वारसास्थळाचा दर्जा

- जपानमधील वादग्रस्त सादो सोन्याच्या खाणीची नोंद सांस्कृतिक वारसास्थळात करण्याचे 'युनेस्को'च्या जागतिक वारसा समितीने जाहीर केले आहे.
- दुसऱ्या महायुद्धात कोरियाच्या शेकडो मजुरांच्या छळाचा काळा इतिहास या खाणीला आहे.
- तो जगासमोर आणण्यास जपानने मान्यता दिल्यानंतर सादो खाणीचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे.
- 'युनेस्को'च्या हा निर्णय म्हणजे जपान आणि कोरियामधील संबंध सुधारल्याचे प्रतीक मानले जात आहे.


## आफ्रिकेतील ऐतिहासिक स्थळेही 'वारसा यादी'त

- दक्षिण आफ्रिकेच्या मुक्तिसंग्रामाशी आणि मानवी हक्कांसाठी लढलेल्या नेल्सन मंडेला यांच्याशी निगडित ऐतिहासिक स्थळांचा'युनेस्को'च्या 'जागतिक वारसा यादी'त - समावेश करण्यात आला.
- 'ह्युमन राइट्स, लिबरेशन स्ट्रगल अँड रिकन्सिलिएशन : नेल्सन मंडेला लिगसी साइट्स' नावाचे नामांकन आफ्रिकन देशाने मांडले होते.
- इटली, दक्षिण कोरिया, सेंट व्हिन्सेंट आणि द ग्रेनेडाइन्स, जपान आणि इटलीसह विविध सदस्यांनी नामांकनाला पाठिंबा दिला.

## प्राणी प्रजातींची प्रथमच नोंद

- देशात आढळणाऱ्या प्राण्यांच्या सर्व प्रजातींची नोंद भारताने केली आहे.
- एकूण 1 लाख 4 हजार 561 प्रजातींची नोंद करण्यात आली असून ही कामगिरी करणारा भारत हा जगातील पहिला देश बनला आहे.
- झूऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या (झेडएसआय) 109 व्या स्थापनादिनानिमित्त 'फॉना ऑफ इंडिया चेकलिस्ट पोर्टल'चे उद्घाटन कोलकता येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव उपस्थित होते.
- देशातील सर्व प्राणी प्रजातींची नोंद केली असल्याने जैववैविध्याची नोंद करण्याच्या क्षेत्रात भारत जगाचे नेतृत्व करू शकतो.
- सर्व प्राण्यांची नोंद घेतली गेली असल्याने संशोधक, प्राध्यापक, अभ्यासक आणि धोरणकर्त्यांना त्याचा उपयोग होणार
- 'झेडएसआय'ने तयार केलेल्या या नोंदीमध्ये एकूण 121 प्रकारच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत.
- या यादीत नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या प्रजातींचाही समावेश करण्यात आला आहे.
- केंद्र सरकारने 'एक पेड माँ के नाम' हा नवीन उपक्रम देखील सुरू केला आहे.

------------------------



# 9. सामाजिक व शैक्षणिक

## लाडकी बहीण योजनेत सुधारणा



- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यानंतर राज्य शासनाने त्यात मोठी सुधारणा केली असून, नवीन बदलानुसार योजनेचा लाभ घेण्यासाठी आता महिलांना 31 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज करता येणार आहे.
- विशेष म्हणजे लाभार्थी महिलेची वयोमर्यादा आता 21 ते 65 करण्यात आली आहे.पूर्वो 21 ते 60 पर्यंत मर्यादा होती.
- रहिवास प्रमाणपत्राची अट देखील शिथील झाली आहे.
- राज्य सरकारने लाडकी बहीण योजना जाहीर केल्यानंतर त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी महिलांची खूपच धावपळ होत असल्याचे चित्र सगळीकडे दिसून

आले होते त्याच धर्तीवर हा बदल करण्यात आला आहे.

- लाडकी बहीण योजनेत अर्ज करण्याची मुदत यापूर्वी दि. 1 जुलै ते 15 जुलै 2024 पर्यंत ठेवण्यात आली होती. परंतु, या मर्यादेत सुधारणा करण्यात आली असून आता सदरची मुदत दोन महिने वाढविण्यात आली आहे.
- त्यानुसार 31 ऑगस्ट 2024 पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येईल.
- विशेष म्हणजे 31ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज करणाऱ्या लाभार्थी महिलांना 1 जुलै 2024 पासुनच दरमाह 1500 रूपयांचा आर्थिक लाभ मिळणार आहे.
- लाडकी बहीण योजनेच्या पात्रतेमध्ये याआधी आधिवास प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, आता लाभार्थी महिलेकडे आधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसले तरी त्या ऐवजी 15 वर्षापूर्वीचे रेशन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा जन्म दाखला यापैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.
- परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा आधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.
- 2.5 लाख रूपये वार्षिक उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्न दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्यात आली आहे.
- याशिवाय यापूर्वी फक्त विवाहित, विधवा, घटस्फोटीत महिलांनाच लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार असल्याचे म्हटले होते. मात्र, आता कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला म्हणजे मुलीला सुध्दा लाडकी बहीण योजनेतून 1500 रूपये दरमहा लाभ देण्यात येणार आहे.


## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी 5500 कोटी



- मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेसाठी सुमारे 5 हजार 585 कोटी रुपये निधी देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.
- शासकीय योजनांचा प्रचार व प्रसिद्धीसाठी 50 हजार तरुणांना **'योजनादूत'** नियुक्त करण्यात येणार आहे.
- अर्थविभागाच्या सूचनेनंतर प्रशासकीय खर्च, प्रसिद्धी व प्रचारावर एकूण योजना खर्चाच्या 8 टक्क्यांऐवजी 3 टक्केच निधी खर्च करता येणार आहे.
- कौशल्यविकास विभागाच्या माध्यमातून तरुणांना रोजगारसंधी उपलब्ध करून देतानाच त्याअंतर्गत हे योजनादूत निवडले जातील.
- प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात एक आणि शहरी भागात पाच हजार लोकसंख्यमागे एक योजनादूत नेमले जाणार आहेत.
- या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी नगरविकास आणि ग्रामविकास विभागाकडे देण्यात आली असून महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी ,यांना हे योजनादूत नियुक्तीचे अधिकार देण्यात आले आहेत.
- बारावी, आयटीआय, पदविका,पदवी, पदव्युत्तर आदी शिक्षण घेतलेल्या तरुणांना रोजगार संधी उपलब्ध करुन कौशल्यविकास देण्यासाठी विभागाने संकेतस्थळ सुरू केले आहे.
- खासगी कंपन्या, उद्योग, लघुउद्योग, सहकारी संस्था, निमशासकीय संस्था, महामंडळे आदींनी त्यांना ज्या प्रकारचे कौशल्य शिक्षण घेतलेले उमेदवार हवे आहे, त्याबाबतची नोंदणी या संकेतस्थळावर करायची आहे.

- तरुणांनीही आपल्या प्रशिक्षणानुसार नावनोंदणी करणे आवश्यक आहे. बारावी उत्तीर्ण असलेल्यांना दरमहा 6 हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारकाला 10 हजार रुपये विद्यावेतन द्यावे, असे निश्चित करून देण्यात आले आहे.
- सुमारे 10 लाख तरुणांना मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा लाभ देण्याचे नियोजन आहे.

## महावाचन उत्सवाचे अमिताभ बच्चन सदिच्छा दूत



- वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक वर्ष 2024 - 25 मध्ये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये महावाचन उत्सव 2024 हा उपक्रम 22 जुलै ते 30 ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार आहे.
- या उपक्रमासाठी जेष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची सदिच्छा दूत म्हणून निवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला .
- शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. वाचनामुळे त्यांचे अभ्यासाच्या गतीमध्ये वाढ होते. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात भर पडते. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व शाळांमध्ये महाराष्ट्रातील वाचन चळवळ हा उपक्रम राबवण्याचा निर्णय 22 नोव्हेंबर 2023 रोजी घेण्यात आला होता.
- या उपक्रमात 66 हजार शाळा आणि 52 लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता .
- रीड इंडिया सेलिब्रेशन या संस्थेच्या सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला होता.

- या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष 2024 - 25 मध्ये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महावाचन उत्सव 2024 हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.
- उपक्रमात तिसरी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे.
- त्यासाठी तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी असे तीन गट करण्यात आले आहेत.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये:**

✓ वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे

✓ विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे

✓ मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी नाळ जोडणे

✓ विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना देणे

✓ विद्यार्थ्यांमध्ये भाषा संवाद कौशल्य विकसित करणे

**स्वरूप:**

➢ महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत उपक्रमासाठी स्वतंत्र वेब पोर्टल विकसित करण्यात येईल.

➢ उपक्रमात सहभागी विद्यार्थी वाचन केलेल्या पुस्तकावर विचार करतील आणि तो विचार लिखित स्वरूपात संबंधित पोर्टलवर अपलोड करतील.

➢ विद्यार्थी वाचन केलेल्या पुस्तकाची सारांश देणारी एका मिनिटाची ध्वनिचित्रफित, ध्वनिफित पोर्टलवर अपलोड करतील.

➢ ग्रंथालय प्रदर्शन, पुस्तक मेळावे आयोजित करण्यात येतील.

➢ तालुका, जिल्हा, शैक्षणिक विभाग, राज्य स्तरावर विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिके दिली जातील.

## 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत 84,119 मुलांची सुटका

- रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) गेली सात वर्षे 'नन्हे फरिश्ते' अभियान प्रभावीपणे राबवत आहे.
- भारतीय रेल्वेच्या देशभरातील विविध विभागांमध्ये काळजी आणि सुरक्षेची गरज असलेल्या लहान मुलांची सुटका करण्यासाठी हे अभियान समर्पित आहे.
- आरपीएफ ने गेल्या सात वर्षांत (2018- मे 2024), रेल्वे स्थानके आणि रेल्वे गाड्यांमधून संकटात सापडलेल्या 84,119 मुलांची सुटका करून, संभाव्य धोक्यापासून त्यांचे संरक्षण केले आहे.
- "ऑपरेशन नन्हे फरिश्ते" च्या आरंभासह 2018 हे वर्ष महत्वाचे ठरले. या वर्षात, आरपीएफने एकूण 17,112 मुलांची सुटका केली. यामध्ये मुले आणि मुली दोन्ही समाविष्ट होते.
- 2018 या वर्षाने अशा उपक्रमाची तातडीची गरज अधोरेखित करत, या अभियानाचा भक्कम पाया रचला.
- 2019 या वर्षात, आरपीएफ च्या प्रयत्नांना फळ मिळू लागले, या वर्षी एकूण 15,932 मुलांची सुटका करण्यात आली, ज्यात मुले आणि मुली दोन्ही आहेत.
- कोविड-19 साथ रोगामुळे 2020 हे वर्ष आव्हानात्मक ठरले, ज्यामुळे सामान्य जीवन विस्कळीत झाले आणि अभियानाच्या कामावर लक्षणीय परिणाम झाला. तरीही या आव्हानांचा सामना करत, आरपीएफने 5,011 मुलांची सुटका करण्यात यश मिळविले.
- 2021 मध्ये, आरपीएफ ने आपल्या बचाव कार्यात आणखी प्रगती केली आणि 11,907 मुलांची सुटका केली.

- 2022 मध्ये, आरपीएफ अदम्य वचनबद्धता दिसून आली, कारण या वर्षात त्यांनी 17,756 मुलांची सुटका केली, जी आतापर्यंतची सर्वाधिक संख्या होती.
- या वर्षी घरातून पळून गेलेली आणि हरवलेली मुले मोठ्या संख्येने सापडली. त्यांना आवश्यक ती काळजी आणि संरक्षण देण्यात आले.
- 2023 या वर्षात आरपीएफ ने 11,794 मुलांची सुटका केली.
- 2024 च्या पहिल्या पाच महिन्यांत, आरपीएफने 4,607 मुलांची सुटका केली आहे.यामध्ये घरातून पळून गेलेल्या 3430 मुलांचा समावेश आहे.
- वर्षाच्या सुरुवातीच्या या कामामधून आरपीएफची 'नन्हे फरिश्ते' अभियानाप्रति वचनबद्धता दिसून येते.
- या संख्येवरून मुलांची घरातून पळून जाण्याची समस्या आणि त्याचे निराकरण करण्यासाठी आरपीएफचे समर्पित प्रयत्न दोन्ही दिसून येते.
- आरपीएफने आपल्या अथक परिश्रमांनी केवळ मुलांची सुटका केली नाही, तर पळून जाणाऱ्या आणि हरवलेल्या मुलांच्या वाढत्या समस्येबाबत जागरुकता निर्माण केली, ज्यामुळे पुढील कारवाई शक्य झाली आणि या अभियानाला विविध हितधारकांचे पाठबळ मिळाले.

## 'लाडका भाऊ' योजनेची घोषणा



- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेनंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या भावांसाठी खास विद्यावेतन योजनेची घोषणा केली आहे.
- मुलांसाठीच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने' अंतर्गत बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा 6 हजार रुपये दिले जाणार असून, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना 8 हजार रुपये मिळणार आहेत,तसेच पदवीधर तरुणांना 10 हजार रुपये विद्यावेतन मिळेल.

- प्रशिक्षणात (अप्रेन्टिसशिप) सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना हा लाभ मिळणार आहे.
- मुख्यमंत्री शिंदे यांनी मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर राज्यात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना सुरू केली आहे. या योजनेतील लाभार्थी महिलांना दरमहा दीड हजार रुपये मिळणार आहेत.
- बारावी उत्तीर्ण, आयटीआय, पदविका आणि पदवी उत्तीर्ण असणाऱ्या युवकांना त्यांनी नोंदणी केल्यानंतर या योजनेचा लाभ दिला जाईल. मात्र, ज्या उमेदवारांचे शिक्षण सुरु असेल त्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.
- अर्ज दाखल करणाऱ्या युवकांचे वय 18 ते 35 वर्ष असणे आवश्यक आहे.
- राज्य सरकार महाराष्ट्राच्या रहिवासी असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टायपेंड म्हणून रक्कम देणार आहे.
- युवकांनी अर्ज दाखल केल्यानंतर राज्य सरकारकडे नोंदणी केलेल्या कंपन्यांमध्ये प्रशिक्षण दिले जाणार आहे.
- युवकांना संबंधित कंपन्यांमध्ये सहा महिने प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागणार आहे.
- युवकांना सहा महिने स्टायपेंडची रक्कम दिली जाणार आहे.
- राज्य सरकार युवकांच्या विद्यावेतनाचा खर्च करणार आहे. 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'द्वारे दरवर्षी दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण दिले जाणार आहे.
- युवकांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर संबंधित कंपनीकडून त्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.
- संबंधित आस्थापना अथवा कंपनीला युवकाचे काम योग्य वाटल्यास त्यांना तिथे नोकरी देऊ शकतात. याशिवाय राज्य सरकार देत असलेल्या विद्या वेतनाशिवाय अधिकची रक्कम संबंधित आस्थापना युवकांना देऊ शकतात.

## बालकांच्या विकासासाठी 'बूस्ट माय चाइल्ड'




- कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करून बालकांचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी 'बूस्टमायचाइल्ड' उपयोजनाची निर्मिती करण्यात आली आहे.
- हे उपयोजन पालक, शिक्षक, शाळांसाठी उपयुक्त ठरणार असून, 'बूस्टमायचाइल्ड' लोकाभिमुख करण्यासाठी वर्धन समूहातर्फे एक कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे.
- वर्धन ग्रुपचे चेअरमन नितीन जावळकर, 'बूस्टमायचाइल्ड'चे संस्थापक विपुल जोशी हे आहेत.
- बाल मानसशास्त्रज्ञ, बालरोगतज्ज्ञ,मानसशास्त्रज्ञ, बालरोगतज्ज्ञ, बालशिक्षणातील तज्ज्ञ, कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञांच्या चार वर्षांच्या एकत्रित संशोधनातून उपयोजनाची निर्मिती करण्यात आली.
- 1 महिना ते 8 वर्षे वयोगटातील बालकांचे पालक आणि शिक्षक यांच्यासाठी हे उपयोजन उपयुक्त आहे.
- या उपयोजनाद्वारे पाल्याच्या सर्वसमावेशक विकासाचे मूल्यांकन, विश्लेषण शक्य आहे

## ‘पोषण भी पढाई भी’ 2.0 उपक्रम

- सरकारने 10 मे 2023 रोजी सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांची क्षमता आणि कौशल्य वाढवण्यासाठी पोषण भी पढाई भी (PBPB) हा उपक्रम सुरू केला आहे.
- जेणेकरून सर्व अंगणवाडी कर्मचारी या सहा वर्षांखालील मुलांची बालपणी घेण्याची काळजी आणि शिक्षण आणि तसेच पोषण सेवा पुरविण्यासाठी सक्षम होतील.
- याअंतर्गत जून, 2024 पर्यंत देशभरात एकूण 11,364 राज्यस्तरीय प्रमुख

प्रशिक्षक (CDPO, पर्यवेक्षक आणि अतिरिक्त संसाधन व्यक्ती) आणि 1877 अंगणवाडी सेविकांना 'पोषण भी पढाई भी' अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

- दिव्यांग मुलांसह 6 वर्षाखालील बालकांच्या सर्जनशील, सामाजिक, भावनिक आणि संज्ञानात्मक विकासाला चालना देण्यासाठी तसेच बालपणी घेण्याची काळजी आणि शिक्षण यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी - अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करत आणि अंगणवाडी केंद्रांतून उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा, खेळाची उपकरणे पुरवून अंगणवाड्यांचे चांगल्या सुविधा असलेल्या शिक्षण केंद्रात रूपांतर करण्यासाठी,सक्षम अंगणवाडी आणि पोषण 2.0 चा दुसरा टप्पा तसेच 'पोषण भी पढाई भी' हा उपक्रम 10 मे 2023 रोजी सुरू करण्यात आला.

- अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि दिव्यांग मुलांसह सर्व मुलांना चांगले शिक्षण मिळावे हे सुनिश्चित करण्यासाठी,महिला बालकल्याण मंत्रालयाने - "नवचेतना- जन्म झाल्यापासून तीन वर्षापर्यंत विकासाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय उपक्रम-2024(नॅशनल फ्रेमवर्क फॉर अर्ली चाइल्डहुड स्टिम्युलेशन फॉर चिल्ड्रन फॉर बर्थ टू थ्री इयर्स 2024") आणि "आधारशिला- पोशन भी पढाई भी या कार्यक्रमांतर्गत तीन ते सहा वर्षे 2024 पर्यंतच्या मुलांसाठी बालपणी घेण्याची काळजी आणि शिक्षण यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम,हे दोन अभ्यासक्रम विकसित केले आहेत.

## नॅटस 2.0

- केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी 30 जुलै रोजी नवी दिल्ली येथे राष्ट्रीय शिकाऊ आणि प्रशिक्षण योजनेच्या (नॅटस - NATS :National Apprenticeship and Training Scheme 2.0) पोर्टलचे उद्घाटन केले आणि डीबीटी अर्थात थेट लाभ हस्तांतरण पद्धतीद्वारे शिकाऊ उमेदवारांना 100 कोटी रुपयांची छात्रवृत्ती दिली.

- हे प्रशिक्षणार्थी माहिती तंत्रज्ञान/आयटीईएस (माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा), उत्पादन, वाहन अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.
- हा उपक्रम युवकांच्या कौशल्य आणि रोजगारक्षमतेवर लक्ष केंद्रीत करतो.
- या पोर्टलवर मोठ्या संख्येने शिकाऊ उमेदवार नोंदणी अर्ज करतील अशी अपेक्षा आहे.
- याव्यतिरिक्त आस्थापना/ उद्योगातील रिक्त जागा आणि करारांच्या व्यवस्थापनासाठी पोर्टल उपयुक्त आहे.
- पदवी आणि पदविकाधारकांना रोजगार कौशल्ये विकसित करण्यासाठी या पोर्टलची मदत होईल.
- लोकशाही पद्धतीने शिकाऊ उमेदवारांमध्ये कौशल्ये विकसित करून त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करण्यासाठी नॅटस पोर्टल 2.0 हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.
- या पोर्टलमुळे प्रशिक्षणार्थींना अधिकाधिक संधी उपलब्ध होतील आणि त्यांच्यात आणि रोजगार देण्याऱ्या कंपन्या यांच्यात समन्वय साधण्यासाठी मदत मिळेल.
- सर्व लाभार्थ्यांना स्टायपेंडमधील शासनाच्या हिश्याचे वितरण करण्यासाठी डीबीटी प्रणालीचा अधिकाधिक वापर करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

---------------------



# 10. विविधा

## गोव्यात जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदचे आयोजन



- भारत 20 ते 24 नोव्हेंबर दरम्यान गोव्यात जगभरातील माध्यम आणि मनोरंजन उद्योगासाठी महत्वपूर्ण अशा जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेचे आयोजन करणार असल्याची घोषणा केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली.
- जागतिक दर्जाची माध्यम आणि मनोरंजन उद्योगातील शिखर परिषद आयोजित करणे हे या शिखर परिषदेचे उद्दिष्ट आहे.
- “भारताची आर्थिक वाढ होत असताना भारताचे कौशल्य प्रभुत्व वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.
- 20 ते 24 नोव्हेंबर 2024 या कालावधीत भारतातील गोव्यात वेव्हज् 2024 चे आयोजन केले जाणार आहे.

## रवीचंद्रन अश्विनचे आत्मचरित्र प्रकाशित



- भारताचा फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनचे 'आय हॅव द स्ट्रीट्स - अ कुट्टी क्रिकेट स्टोरी' या आत्मचरित्राचे 12 जुलै रोजी प्रकाशन करण्यात आले.
- ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ मोंगाने हे आत्मचरित्र लिहिले आहे.

## शेन वॉटसनचे 'द विनर्स माइंडसेट' पुस्तक




- ऑस्ट्रेलियचा माजी अष्टपैलू खेळाडू शेन वॉटसनने 'द विनर्स माइंडसेट' (The Winner's Mindset) हे पुस्तक लिहिले आहे.
- त्याने या पुस्तकात आपल्या भीतीवर विजय मिळवत क्रिकेट कारकिर्दीत गाठलेल्या उंचीबाबत रणनीती सांगितली आहे.

---------------------




# 11. क्रीडा

## रविंद्र जाडेजा निवृत्त




- विराट कोहली व रोहित शर्मा यांच्यानंतर आता रवींद्र जडेजा या भारताच्या अष्टपैलू खेळाडूने क्रिकेटच्या टी-20 प्रकारामधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला.
- रवींद्र जडेजाने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या निवृत्तीची घोषणा केली. मात्र जडेजा हा कसोटी व एकदिवसीय अशा दोन्ही प्रकारांत खेळत राहणार आहे.

**जाडेजाची टी-20 कारकीर्द..**

- ✓ रवींद्र जडेजाने 2009 मध्ये टी-20 क्रिकेटमध्ये पदार्पण केले.
- ✓ रवींद्र जडेजा देशासाठी 74 टी-20 सामने खेळला. त्याने 127.16च्या स्ट्राईकरेटने 515 धावा फटकावल्या.
- ✓ तसेच 7.13 च्या इकॉनॉमी रेटने 54 फलंदाज बाद केले.

YOUR PERSONAL MENTOR

## ऑलिंपिकसाठी सिंधू ध्वजवाहक



- तारांकित बॅडमिंटनपटू पी .व्ही. सिंधूची आगामी पॅरिस ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भारताची महिला ध्वजवाहक म्हणून निवड करण्यात आली आहे.
- तसेच लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवणारा नेमबाज गगन नारंग यावर्षी भारताचा पथक प्रमुख असेल.
- याआधी पथक प्रमुखाची भूमिका बॉक्सिंग पटू मेरी कोमने निभावली होती.
- पॅरिस ऑलम्पिक साठी पुरुष ध्वजवाहक म्हणून यापूर्वीच टेबल टेनिसपटू अंचता शरथ कमल याचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

## जसप्रीत बुमरा स्मृती मानधना जून 2024 मधील सर्वोत्तम खेळाडू



- ट्वेंटी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेचा हिरो जसप्रीत बुमरा आणि सातत्यपूर्ण कामगिरी करत असलेली स्मृती मानधना आयसीसीच्या जून महिन्यातील आयसीसी चे सर्वोत्तम पुरुष आणि महिला खेळाडू ठरले.
- भारतीय क्रिकेटसाठी हे दुहेरी यश आहे.
- असा सन्मान क्वचितच एका देशाला मिळाला आहे.
- बुमराला याआधीही मान मिळालेला होता मात्र स्मृती मानधना पहिल्यांदाच आयसीसीच्या मासिक पुरस्काराची मानकरी ठरली आहे.

## गौतम गंभीर भारतीय संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक



- भारतीय क्रिकेट संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर यांची निवड करण्यात आली.
- गंभीर आता डिसेंबर 2027 पर्यंत भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षक पदावर कायम राहणार असून टी-20 एकदिवसीय व कसोटी अशा तिन्ही प्रकारात ते खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत.
- 27 जुलैला सुरू होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यापासून गंभीर हे भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत.
- खेळाडू म्हणून गौतम गंभीरणे भारताच्या 2007 च्या टी-ट्वेंटी आणि 2011 च्या एकदिवसीय विश्वचषकात महत्त्वाची भूमिका बजावली होती. तसेच कर्णाधार म्हणूनही त्यांनी इंडियन प्रीमियर लीगमध्येही छाप पाडली .
- त्यांच्या नेतृत्वाखाली कोलकत्ता ने 2012 आणि 2014 मध्ये आयपीएलचे विजेतेपद पटकावले .
- 2024 मध्ये झालेल्या आयपीएल मध्ये ही कोलकत्ता या संघाचे मेंटॉर म्हणून काम पाहिलेले गंभीर कोलकत्ता च्या संघाला विजेतेपद मिळवून देण्यात मुख्य भूमिका निभावली होती.

**या महत्त्वाच्या स्पर्धा गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडतील..**

✓ 2025 चॅम्पियन करंडक

✓ 2025 जागतिक कसोटी अंतिम सामना

✓ 2026 टी- 20 विश्वचषक स्पर्धा

✓ 2027 एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा

## पवन सिंह ऑलम्पिक मधील एकमेव भारतीय पंच



- स्थानिक 'गन फॉर ग्लोरी' या नेमबाजी प्रशिक्षण संस्थेचे सहसंस्थापक आणि राष्ट्रीय रायफल संघटनेचे संयुक्त महासचिव पवन सिंह यांची सलग दुसऱ्यांदा ऑलिम्पिकमध्ये नेमबाजी पंच म्हणून निवड करण्यात आली आहे.
- पवन यांची यापूर्वी टोकियो ऑलिम्पिकसाठीही पंच म्हणून निवड झाली होती.
- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पवन सिंह 'आरटीएस' (रिझल्ट, टाईमिंग आणि स्कोअरर) पंच म्हणून काम पाहणार आहेत.
- ऑलिम्पिक स्पर्धेत पंच म्हणून काम पाहणारे पवन हे एकमेव भारतीय आहेत.

## जेम्स अँडरसनला विजयाने निरोप



- इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन निवृत्त होताना इंग्लंड मधील लॉर्ड्स मैदानावर वेस्ट इंडिजच्या संघाविरुद्ध त्याने अखेरचा कसोटी सामना खेळला.
- इंग्लंडने वेस्ट इंडीजवर एक डाव व 114 धावांनी मात केली.
- जेम्स अँडरसनला विजयाने निरोप देण्यात आला.
- कसोटी क्रिकेटमध्ये त्याने एकूण 704 विकेट मिळवल्या.
- अखेरच्या कसोटीत त्याने चार फलंदाज बाद केले.
- जोशुआ डी सिल्वा ही 41 वर्षीय अँडरसनची कसोटी कारकिर्दीतील अखेरची विकेट ठरली.
- अँडरसनने कसोटीत मायदेशात 438 विकेट घेतल्या.

- त्याने मायदेशाबाहेर कसोटीत 266 विकेट घेतल्या.
- अँडरसन 188 कसोटी सामने खेळला.
- तो सचिन तेंडुलकरनंतर (200 कसोटी) सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा क्रिकेटपटू ठरला.
- अँडरसनने लॉर्ड्स येथे सर्वाधिक 123 विकेट मिळवले.
- एका मैदानात मुरलीधरन याने सर्वाधिक 166 विकेट मिळवल्या आहेत. त्याने कोलंबो येथे ही किमया केली.

**कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेटस् घेणारे गोलंदाज**

1) 800 विकेट : मुथय्या मुरलीधरन (श्रीलंका)
2) 708 विकेट : शेन वॉर्न (ऑस्ट्रेलिया)
3) 704 विकेट : जिमी अँडरसन (इंग्लंड)
4) 619 विकेट : अनिल कुंबळे (भारत)
5) 604 विकेट : स्टुअर्ट ब्रॉड (इंग्लंड)

## विम्बल्डन स्पर्धा - 2024



**महिला एकेरीत क्रेजिकोवा विजेती**

- प्रतिष्ठेच्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेला सलग आठव्या वर्षी नवविजेती मिळाली.
- 13 जुलै रोजी झालेल्या महिला एकेरीच्या अंतिम लढतीत चेक प्रजासत्ताकच्या बार्बोरा क्रेजिकोवाने इटलीच्या जैस्मिन पाओलिनीचा 6-2, 2-6, 6-4 असा पराभव करून विम्बल्डनमधील आपले पहिले जेतेपद पटकावले.
- पाओलिनीला सलग दुसऱ्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

- क्रेजिकोवाचे हे विम्बल्डनमधील पहिले, तर कारकीर्दीतील दुसरे ग्रँडस्लॅम जेतेपद ठरले.
- यापूर्वी क्रेजिकोवाने 2021 मध्ये फ्रेंच स्पर्धा जिंकली होती.
- क्रेजिकोवाने आत्तापर्यंत दुहेरीच्या 10 ग्रँड स्लॅम विजेतीपदे मिळवलेली आहेत, त्यातील दोन विजेतीपदे विम्बल्डनमधील आहेत.
- विम्बल्डन स्पर्धेचे महिला एकेरीतील सर्वाधिक वेळा विजेतेपद अमेरिकेच्या मार्टिना नवरातिलोवा (9 वेळा)पटकावले.

**विम्बल्डन स्पर्धा**

✓ 2024 ची एकूण 137 वी स्पर्धा

✓ ठिकाण : लंडन

✓ सुरवात : 1877

✓ सर्वात जुनी ग्रँड स्लॅम स्पर्धा

✓ ही स्पर्धा ग्रास कोर्ट वरती खेळवली जाते.

## पुरुष एकेरीत अल्कराझ विजेता



- विम्बल्डन स्पर्धेच्या पुरुष एकेरी अंतिम सामन्यात स्पेनच्या कार्लोस अलकाराझने सर्बियाचा अनुभवी टेनिसपटू नोव्हाक जोकोविचवर 6-2, 6-2, 7 -6(7-4) अशा सर्व सेट मध्ये मात केली .
- हे अल्कराझचे चौथे ग्रँड स्लॅम चषक आहे.

**अल्कराझची कामगिरी...**

✓ वयाच्या 22 वर्षांच्या आत विम्बल्डन दोन वेळा जिंकण्याच्या बियॉर्न बोर्ग, बोरिस बेकरच्या कामगिरीशी बरोबरी

✓ एकाच वर्षांत फ्रेंच आणि विम्बल्डन स्पर्धा जिंकणारा सहावा खेळाडू. यापूर्वी रॉड लेव्हर, बियॉर्न बोर्ग, रॉजर फेडरर, रॅफेल नदाल आणि नोव्हाक जोकोविच

✓ वयाच्या 21 व्या वर्षीच चार ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदे. (2022 अमेरिकन, 2023 विम्बल्डन, 2024 फ्रेंच आणि विलम्बल्डन)

✓ विम्बल्डन स्पर्धेचे पुरुष एकेरीतील सर्वाधिक वेळा विजेतेपद स्वित्झर्लंडच्या रॉजर फेडररच्या नावे आहेत त्याने एकूण आठ वेळा विम्बल्डन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

## युरो स्पर्धेत स्पेन विजेता



- अंतिम फेरीत इंग्लंड संघाचा 2 - 1 अशा फरकाने पराभव करीत स्पेनच्या संघाने विक्रमी चौथ्यांदा युरो कपवर आपले नाव कोरले.
- युरो कप 2024 चा अंतिम सामना 15 जुलै रोजी स्पेन आणि इंग्लंड यांच्यात बर्लिन, जर्मनी येथे खेळला गेला.
- याआधी 1964, 2008 ,2012 यावर्षी स्पेनने विजेतेपद मिळवले होते .
- तब्बल बारा वर्षांनी पहिले मोठे विजेतेपद पटकावण्यात स्पेनला यश मिळाले.
- स्पेनचे एका स्पर्धेत 15 गोल. फ्रान्सला(14) मागे टाकले.
- स्पेन ने यावर्षीच्या स्पर्धेत साखळी पासून अंतिम फेरीपर्यंत सर्व सातही सामने जिंकले अशी कामगिरी करणारा स्पेन पहिलाच देश ठरला.

**युएफा युरो फुटबॉल अजिंक्यपद (इंग्लिश: UEFA European Football Championship)**

✓ ही युरोप खंडामधील देशांच्या राष्ट्रीय फुटबॉल संघांची एक स्पर्धा आहे.

✓ युएफा ही युरोपियन फुटबॉल संस्था दर 4 वर्षांनी ह्या स्पर्धेचे आयोजन करते.

✓ इ.स. 1960 साली पहिली यूरो स्पर्धा खेळवली गेली.

**युरो कप : 2024**

➢ स्पर्धा - 17 वी

➢ ठिकाण - जर्मनी

- ➢ अंतिम सामना - बर्लिन
- ➢ विजेता - स्पेन
- ➢ उपविजेता - इंग्लंड
- ➢ सहभागी संघ - 24
- ➢ सर्वोत्तम खेळाडू - रॉड्री(स्पेन)
- ➢ सर्वोत्तम युवा खेळाडू - लामीन यमाल(स्पेन)

## अर्जेंटिनाचे 16 वे विजेतेपद




- अर्जेंटिनाने फुटबॉल विश्वातील आपले वर्चस्व कायम राखताना विक्रमी 16 व्यांदा कोपा अमेरिका स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.
- अर्जेंटिनाने 2021 मध्ये झालेल्या गेल्या कोपा अमेरिका स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते.
- त्यानंतर 2022 मध्ये त्यांनी विश्वविजेते पदावर मोहरे उमटवली होती आणि आता कोपा अमेरिकेचा करंडक आपल्याकडेच राखताना सलग तीन मोठ्या स्पर्धा जिंकण्याची किमया अर्जंटीनाच्या संघाने केली.
- कोपा अमेरिका स्पर्धेच्या अंतिम लढतीत अर्जेंटिनाने कोलंबीयाचा 1 - 0 असा पराभव केला.
- कोपा अमेरिका स्पर्धेचे विजेतेपद सर्वाधिक वेळा अर्जेंटिनाने(16) पटकावले. त्याखालोखाल उरूग्वेने 15 वेळा तर ब्राझीलने 9 वेळा पटकावले.

### कोपा अमेरिका 2024

- ✓ कोपा आमेरिका ही कॉन्मेबॉल ह्या दक्षिण अमेरिकेमधील फुटबॉल मंडळाद्वारे आयोजित केली जाणारी एक फुटबॉल स्पर्धा आहे.
- ✓ कोपा आमेरिकाच्या विजेत्याला फिफा कॉन्फेडरेशन्स चषक स्पर्धेत आपोआप आमंत्रण मिळते.
- ✓ इ.स. 1916 साली पहिली कोपा आमेरिका स्पर्धा भरवली गेली. तेव्हापासून दर चार वर्षांनी ह्या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे.

- ✓ स्पर्धा : 48 वी
- ✓ सर्वोत्तम खेळाडू :जेम्स रॉड्रिग्ज (कोलंबिया)
- ✓ अंतिम सामना : मियामी,फ्लोरिडा अमेरिका

## म्युलरची निवृत्ती



- जर्मनीच्या थॉमस म्युलरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील 14 वर्षांच्या सांगता केली.
- 2014मध्ये वर्ल्ड कप जिंकलेल्या संघात म्युलरला स्थान होते.
- तो एकूण 131 आंतरराष्ट्रीय सामने खेळला.त्यात त्याने 45 गोल केले.
- तो पहिली लढत 2010 मध्ये अर्जेंटिनाविरुद्ध खेळला होता.
- म्युलरचा सहकारी टोनी क्रूस यानेही निवृत्ती जाहिर केली.

## पॅरिस ऑलम्पिकसाठी भारताकडून 117 खेळाडू



- पॅरिस ऑलम्पिक या प्रतिष्ठेच्या क्रीडा महोत्सवासाठी भारताचा संघ सज्ज झाला आहे.
- भारताच्या 117 खेळाडूंसह 140 व्यक्तींचा सहाय्यक स्टाफ तयार करण्यात आला असून एकूण 257 जणांचे पथक ऑलम्पिकसाठी निश्चित करण्यात आले आहे.
- 117 खेळाडूंपैकी 70 खेळाडू पुरुष तर 47 महिला खेळाडूंचा सहभाग असेल.
- भारतीय संघामध्ये ॲथलेटिक्स (29) व नेमबाज (21) या दोन खेळांमध्ये सर्वाधिक खेळाडू पात्र ठरले आहेत.

## मानोलो मार्केझ भारतीय फुटबॉल संघाचे नवे प्रशिक्षक



- स्पेनच्या मानोलो मार्केझ यांची भारतीय पुरुष फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- ते इंडियन सुपर लीगमधील (आयएसएल) क्लब एफसी गोवाच्या प्रशिक्षकपदही कायम राहतील.
- 'एआयएफएफ'च्या कार्यकारी समितीच्या बैठकीत नवे प्रशिक्षक म्हणून मार्केझ यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.
- मार्केझ यांचा कार्यकाळ किती वर्षांचा असेल हे स्पष्ट करण्यात आले नाही.
- भारतीय संघाला 2026 च्या विश्वचषक पात्रता फेरीच्या तिसऱ्या फेरीत स्थान मिळवण्यात अपयश आल्यानंतर इगोर स्टिमॅच यांची प्रशिक्षकपदावरून हकालपट्टी करण्यात आली होती.
- मार्केझ 2020 सालापासून भारतात प्रशिक्षक म्हणून काम करत आहेत.
- त्यांनी प्रथम हैदराबाद एफसी क्लबला (2020-23) मार्गदर्शन केले. या काळात हैदराबाद संघाने 'आयएसएल' चषक पटकावला होता.
- मार्केझ यांनी 2023 मध्ये हैदराबाद संघ सोडून गोवा एफसीचे प्रशिक्षकपद स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

## 'ऑलिम्पिक ऑर्डर'ने अभिनव बिंद्रांचा सन्मान

- वैयक्तिक क्रीडाप्रकारातील भारताचा पहिला ऑलिम्पिक सुवर्णपदकविजेता नेमबाज अभिनव बिंद्रा यांना आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतर्फे ऑलिम्पिक चळवळीतील अमूल्य योगदानाबद्दल प्रतिष्ठेच्या 'ऑलिम्पिक ऑर्डर' बहुमानाने सन्मानित करण्यात येणार आहे.
- पॅरिस ऑलिम्पिक सोहळ्याच्या समारोपाच्या एक दिवस आधी 10

ऑगस्टला होणाऱ्या 'आयओसी'च्या 142 व्या सभेमध्ये बिंद्रा यांना गौरविण्यात येईल.

- बीजिंगमध्ये 2008 मध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत अभिनव यांनी 10 मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक मिळवले होते.
- 'आयओसी' च्या कार्यकारी समितीने ऑलिम्पिक चळवळीतील योगदानाबद्दल त 'ऑलिम्पिक ऑर्डर' बहुमानाने गौरविण्याचा निर्णय घेतला
- 'ऑलिम्पिक ऑर्डर' हा 'आयओसी'चा सर्वोच्च पुरस्कार असून, ऑलिम्पिक चळवळीतील विशिष्ट योगदानासाठी तो दिला जातो.

## श्रीजेशची निवृत्तीची घोषणा

- भारताचा अनुभवी हॉकी गोलरक्षक पी. आर. श्रीजेशने 18 वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीला पॅरिस ऑलिम्पिकनंतर पूर्णविराम देण्याचा निर्णय जाहीर केला.
- श्रीजेश चौथ्यांदा ऑलिम्पिक स्पर्धेत खेळत असून, अनेक राष्ट्रकुल आणि विश्वचषक स्पर्धेसह तब्बल 328 आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव श्रीजेशकडे आहे.

### श्रीजेशची कारकीर्द

- ✓ 2006 दक्षिण आशियाई स्पर्धेतून पदार्पण
- ✓ 2011, 2016, 2018, 2023 आशियाई चॅम्पियन्स स्पर्धेत विजेतेपद
- ✓ 2014, 2022 आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक, 2018 मध्ये कांस्य
- ✓ 2016, 2018 चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत रौप्यपदक
- ✓ 2019 'एफआयएच' हॉकी लीगमध्ये विजेतेपद
- ✓ 2020 टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदक
- ✓ 2022 राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक

### श्रीजेशचा सन्मान

- ➢ मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार (2021)

- वर्षातील सर्वोत्कृष्ट जागतिक खेळाडू (2021)
- 'एफआयएच'चा सलग दोन वर्षे सर्वोत्कृष्ट गोलरक्षक (2021 व 2022)

## झेंग होहाओ ऑलिम्पिक मधील सर्वात कमी वयाची खेळाडू

- 11 वर्षे 11 महिने वय असलेली चीनची स्केटबोर्डर खेळाडू झेंग होहाओ पॅरिस ऑलिंपिकमध्ये पदार्पण करणार आहे.
- 2024 च्या स्पर्धेतील ती सर्वात लहान खेळाडू असणार आहे.
- आतापर्यंत सर्वात लहान खेळाडू ऑलिंपिकमध्ये खेळण्याचा विक्रम ग्रीक जिम्नॅस्ट दिमित्रिओस लाउंड्रास हिच्या नावावर होता.
- 1986 च्या स्पर्धेत तिचे वय 10 वर्षे 218 दिवस असे होते.
- झेंग 11 ऑगस्ट रोजी 12 वर्षांची होईल.

## भारताकडून धिनिधी सर्वांत लहान खेळाडू

- ✓ भारताकडून जलतरणपटू धिनिधी देसिंधू ही सर्वात लहान खेळाडू असणार आहे.
- ✓ ती 14 वर्षांची आहे.
- ✓ पॅरिस ऑलिंपिकमध्ये ती 200 मीटर - फ्रिस्टाईलमध्ये सहभागी होणार आहे.
- ✓ ऑलिंपिक कोट्यातून ती पात्र ठरली आहे.

## जिल इरविंग सर्वात वयस्क खेळाडू

- कॅनडाची अश्वारोहक जिल इरविंग ही पॅरिस ऑलिंपिकमध्ये सहभागी होणारी सर्वात वयस्व खेळाडू असणार आहे.
- 61 व्या वर्षी ती या पॅरिस ऑलिंपिकमध्ये पदार्पण करणार आहे.
- झेंग होहाओपेक्षा तिचे वय पाच पटीने अधिक आहे.
- मात्र 69 वर्षीय गी ऑस्ट्रेलियाची मेरी हाना जिल इरविंग हिला मागे टाकू शकतात.

- 1996 च्या अॅटलांटा स्पर्धेपासून ती अश्वरोहणात सहभागी होत आहेत.
- आताही त्यांचा संघात राखीव खेळाडू म्हणून समावेश आहे.
- ऑस्ट्रेलिया संघातील एखादा खेळाडू जखमी झाला किंवा आजारी पडला तरच मेरी हाना खेळू शकतात.
- आजतागायत ऑलम्पिक मध्ये सर्वाधिक वयस्क खेळाडू होण्याचा मान स्वीडनचे नेमबाज ऑस्कर स्वाहन यांच्या नावावर आहे.
- 1920 मधील अँटवर्प ऑलिंपिकमध्ये ते 72 वर्षांचे होते.

## पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत मनु भाकरला कांस्यपदक

- हरियाणाच्या मनू भाकरने ऑलिम्पिक नेमबाजीतील भारताची 12 वर्षांपासूनची प्रतीक्षा संपवताना पॅरिसमध्ये 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.
- ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू भारताची पहिली महिला नेमबाज आहे.
- 22 वर्षीय मनूने 221.7 गुणांचा वेध घेत कांस्यपदक मिळवले.
- नेमबाजीत पदक मिळवणारी मनू पाचवी भारतीय नेमबाज.
- याआधी राज्यवर्धन राठोड (डबल ट्रॅप रौप्य, 2004), अभिनव बिंद्रा (10 मीटर एअर रायफल सुवर्ण, 2008), विजय कुमार (रॅपिड फायर पिस्तूल रौप्य, 2012) आणि गगन नारंग (10 मीटर एअर रायफल कांस्य) यांना पदके.
- कोरियन खेळाडूंमध्ये रौप्य आणि सुवर्ण पदकसाठी लढत पार पडली.
- जिन ओह हिने 243.2 गुणांसह सुवर्णपदक पटकावले, तर येजी किम हिने 241.3 गुणांसह रौप्यपदकाची कमाई केली.भारताची मनू भाकर 221.7 गुणांसह कांस्य पदकाची मानकरी ठरली.
- मनू भाकर हिने पात्रता फेरीत 580 गुणांची कमाई केली, तसेच यादरम्यान पैकीच्या पैकी गुण तिने 27 वेळा मिळवले. ही संख्या सर्वोच्च ठरली.

- नेमबाजीतील वैयक्तिक प्रकाराची अंतिम फेरी गाठणारी मनू भाकर ही मागील 20 वर्षांतील पहिलीच भारतीय महिला नेमबाज ठरली.
- याआधी सुमा शिरुरने 2004मधील अथेन्स ऑलिंपिकमधील 10 मीटर एअर रायफल प्रकाराची अंतिम फेरी गाठली होती.

**मनू भाकरची कारकीर्द**

✓ 22 वर्षीय मनू हरियाणातील झज्झर जिल्ह्यातील गोरिया गावातील.

✓ वडील मर्चेंट नेव्हीत मुख्य अभियंता.

✓ वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत ती मार्शल आर्ट, बॉक्सिंग, टेनिस, स्केटिंग असे खेळ खेळत होती.

✓ यानंतर तिने आपला मोर्चा नेमबाजीकडे वळविला.

✓ 2023 मध्ये बाकू आणि 2022मध्ये कैरो येथे झालेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेत अनुक्रमे सुवर्ण, रौप्य

✓ 2022च्या हाँग्वझू आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक

✓ वर्ल्ड कप नेमबाजी स्पर्धेत आतापर्यंत नऊ सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन ब्राँझपदक

✓ आशियाई अजिंक्यपदक स्पर्धेत दोन सुवर्ण

✓ 2018 च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक

✓ जागतिक ज्युनियर स्पर्धेत चार सुवर्णपदके

**मनू - सरबज्योतला कांस्य पदक**

- मनू भाकरने सरबज्योत सिंगच्या साथीने 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारातील मिश्र सांघिक गटात कांस्यपदक मिळवत भारताच्या खात्यात आणखीन एका पदकाची भर घातली.
- स्वातंत्र्योत्तर काळात एकाच ऑलिंपिकमध्ये दोन पदके मिळवण्याची किमया मनूने साधली आहे. अशी कामगिरी करणारी ती पहिलीच खेळाडू ठरली.
- यापूर्वी स्वतंत्र्यपूर्वकाळात 1900 मध्ये नॉर्मन पीचार्ड या धावपटूने 200 मीटर

आणि 200 मीटर अडथळा शर्यतीत रौप्य पदकाची कमाई केली होती.

- भारताचा पहिला ऑलिम्पिक पदक विजेता म्हणून त्याचेच नाव घेतले जाते.
- ऑलम्पिक स्पर्धेत दोन पदके मिळविणारी मनू भाकर ही भारताची एकूण तिसरी खेळाडू ठरली आहे.
- याआधी अशी कामगिरी कुस्तीगीर सुशीलकुमार याने 2008 (कांस्य)आणि 2012(रौप्य) च्या ऑलिम्पिक स्पर्धेत पदक जिंकले होते.
- तर बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू ने 2016 (रौप्य) आणि 2020(कांस्य) च्या ऑलम्पिक स्पर्धेत पदक जिंकलेले आहे.

**सरबज्योत सिंग**

✓ हरियाणा, अंबाला येथील धिन या गावात सरबज्योतचा जन्म

✓ 2022 मधील आशियाई क्रीडा स्पर्धेत सांघिक गटात सुवर्ण आणि मिश्र गटात रौप्य

✓ 2023 मध्ये कोरियातील अशियाई अजिंक्यपद स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात कांस्य आणि ऑलिंपकसाठी पात्रता

✓ 2023 मध्ये भोपाळ येथील विश्वकरंडक स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णा

✓ 2023 बाकू येथे झालेल्या विश्वकरंडक स्पर्धेत मिश्र दुहेरीत सुवर्ण

✓ 2022 मध्ये ज्युनियर विश्वकरंडक स्पर्धेत सांघित गटात सुवर्ण तसेच वैयक्तिक आणि मिश्र गटात दोन रौप्य

✓ 2021 मध्ये लिमा येथील ज्युनियर विश्वकरंडक स्पर्धेत सांघिक आणि मिश्र दुहेरीत सुवर्णपदके.

---




# 12. पुरस्कार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी रशियाच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित



- भारत-रशिया संबंध बळकट करण्यासाठीच्या योगदानाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना क्रेमलिनमधील सेंट अँड्रयू हॉलमध्ये एका विशेष समारंभात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी रशियाचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार **"द ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू द अपॉस्टल"** प्रदान केला.
- 2019 मध्ये या पुरस्काराची घोषणा करण्यात आली होती.
- हा पुरस्कार स्वीकारताना पंतप्रधानांनी तो भारतातील नागरिकांना तसेच भारत आणि रशिया यांच्यातील मित्रत्वाच्या पारंपरिक बंधांना समर्पित केला.
- हा बहुमान उभय देशांमधील खास आणि विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी अधोरेखित करतो असेही त्यांनी नमूद केले.

- या पुरस्काराची सुरुवात 300 वर्षांपूर्वी करण्यात आली होती.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या पुरस्काराने सन्मानित होणारे **पहिले भारतीय** नेते आहेत.
- रशियाशी संबंध दृढ करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नेतृत्वासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.
- भारत आणि रशियामधील संबंध दृढ करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- 1698 मध्ये पीटर द ग्रेट यांच्याकडून यशू यांचे पहिले प्रेरित आणि सेंट अँड्रयू यांच्या सन्मान करण्यासाठी ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू द अपॉस्टल हा सर्वोत्तम पुरस्कार हा नागरिक आणि सैनिकांना दिला जात असतो.
- अलिकडच्या काही वर्षांत हा सन्मान गैर-रशियन व्यक्तींना देण्याची परंपरा सुरू झाली होती.
- पंतप्रधान नरेंद्र मोदींपूर्वी हा सन्मान चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, कझाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष नजरबायेव आणि अझरबैजानचे राष्ट्राध्यक्ष हैदर अलीयेव यांना देण्यात आला आहे.

## राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार-2024



- मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या अंतर्गत पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग, शेतक-यांना शाश्वत उपजीविका प्रदान करण्यासाठी पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्राच्या प्रभावी विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.
- भारतातील देशी गोवंशाच्या जाती मजबूत आहेत आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याची अनुवांशिक क्षमता त्यांच्याकडे आहे.
- स्थानिक गोवंश जातींचे वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन आणि विकास

करण्याच्या उद्देशाने **डिसेंबर 2014 मध्ये "राष्ट्रीय गोकुळ मिशन "** सुरू करण्यात आले.

- राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत, 2021 पासून हा विभाग दूध उत्पादक शेतकरी, दुग्ध सहकारी संस्था/एमपीसी /एफपीओ आणि कृत्रिम रेतन तंत्रज्ञ यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने दरवर्षी राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार प्रदान करत आहे.
- यावर्षी देखील खालील श्रेणींसाठी राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार दिला जात आहे:
- देशी गायी/म्हशींच्या जातींचे संगोपन करणारे सर्वोत्तम दूध उत्पादक शेतकरी,सर्वोत्कृष्ट दुग्ध सहकारी संस्था / दूध उत्पादक कंपनी / शेतकरी उत्पादक संघटना,सर्वोत्कृष्ट कृत्रिम रेतन तंत्रज्ञ
- या वर्षापासून, विभागाने ईशान्य क्षेत्रातील राज्यांसाठी विशेष पुरस्कार समाविष्ट केला आहे जेणेकरुन ईशान्य प्रदेशातील दुग्ध विकास उपक्रमांना प्रोत्साहन आणि चालना मिळेल.
- राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार 2024 वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक श्रेणीतील ईशान्य क्षेत्र राज्यांसाठी 1ला, 2रा, 3रा आणि एक विशेष पुरस्कार प्रदान करेल.
    - 5,00,000/-रुपये ( पाच लाख रुपये फक्त) -पहिला क्रमांक
    - 3,00,000/-रुपये ( तीन लाख रुपये फक्त) -दुसरा क्रमांक आणि
    - 2,00,000/-रुपये (दोन लाख रुपये फक्त) -तृतीय क्रमांक
- 2,00,000/-रुपये ( दोन लाख रुपये फक्त) - ईशान्य क्षेत्रासाठी विशेष पुरस्कार.
- सर्वोत्कृष्ट कृत्रिम रेतन तंत्रज्ञ श्रेणीच्या बाबतीत, राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार-2024 मध्ये गुणवत्तेचे प्रमाणपत्र आणि केवळ स्मृतिचिन्ह असेल.
- 2024 वर्षात राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कारासाठी नामांकन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल द्वारे ऑनलाइन

https://awards.gov.in दाखल केले जातील आणि 15.07.2024 पासून सुरू होईल आणि नामांकन सादर करण्याची अंतिम तारीख 31.08.2024 असेल.

- राष्ट्रीय दूध दिनानिमित्त (26 नोव्हेंबर 2024) हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

## ममता सागर यांना जागतिक साहित्य पुरस्कार



- प्रसिद्ध कन्नड कवयित्री, लेखिका तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्या ममता जी सागर यांना 'वर्ल्ड ऑर्गनायझेशन ऑफ रायटर्स' कडून प्रतिष्ठित 'जागतिक साहित्य पुरस्कारा'ने गौरवण्यात आले.
- ममता जी सागर, कन्नड कवयित्री असण्यासोबतच, प्रसिद्ध नाटककार आणि शिक्षणतज्ज्ञ देखील होत्या.
- ममता जी सागर या सृष्टी मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट, डिझाइन आणि टेक्नॉलॉजीच्या फॅसिलिटेटर आहेत.
- हा कार्यक्रम अबुजा, नायजेरिया येथे लेखकांच्या जागतिक संघटनेच्या पहिल्या काँग्रेसचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आला होता.
- असोसिएशन ऑफ नायजेरियन ऑथर्स (ANA) रायटर्स व्हिलेज येथे तीन दिवसीय काँग्रेस आयोजित करण्यात आली होती.
- प्रसिद्ध नायजेरियन लेखक चिनुआ अचेबे यांनी 1981 मध्ये सुरू केलेला समुदाय होता.
- हा कार्यक्रम ANA आणि पॅन आफ्रिकन रायटर्स असोसिएशन (PAWA) यांच्यातील सहयोग होता.

**ममता जी सागर यांच्याविषयी..**

✓ ममता सागर सध्या कर्नाटकातील बेंगळुरू येथील सृष्टी मणिपाल

इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट, डिझाइन आणि टेक्नॉलॉजीमध्ये फॅसिलिटेटर आहे.

✓ 2016 मध्ये सृष्टी मणिपालमध्ये रुजू होण्यापूर्वी त्यांनी हैदराबाद विद्यापीठ आणि बंगळुरू विद्यापीठात शिक्षण घेतले.

✓ ममता यांच्या कविता आणि संशोधन कार्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. त्यांच्या कलाकृतींचे विविध भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.

**ममता यांना मिळालेले पुरस्कार आणि सन्मान:**

➢ अलीकडच्या काळात ममता जी सागर यांना देश- विदेशातील अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

➢ चार्ल्स वॉलेस इंडिया ट्रस्ट फेलोशिप (2015)

➢ यूकेमध्ये सांची होन्नम्मा कविता प्रशंसा (2019)

➢ भाषा भारती अनुवाद पुरस्कार (2019).

## रामचरणला साहित्यातील मानद डॉक्टरेट बहाल



- चेन्नईतील वेल्स विद्यापीठाने प्रसिद्ध भारतीय अभिनेता रामचरणला साहित्यातील मानद डॉक्टरेट (Doctorate in Literature) प्रदान केली.
- रामचरणचे सिनेसृष्टीतील उल्लेखनीय योगदान आणि जगभरातील प्रेक्षकांवर त्यांचा खोलवर झालेला प्रभाव याचा गौरव करणारा हा सन्मान आहे.

## राहुल गांधी यांना चंडी पुरस्कार

- केरळचे माजी मुख्यमंत्री दिवंगत ओमेन चंडी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या पहिल्या ओमेन चंडी सार्वजनिक सेवक पुरस्कारासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची निवड झाली आहे.

- चंडी यांच्या पहिल्या स्मृतीदिनानंतर 21 जुलै रोजी ओमेन चंडी या पुरस्काराची घोषणा केली.
- एक लाख रुपये आणि स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## माया रणावरे यांना वेलेस्ली बेली पुरस्कार जाहीर

- कुष्ठरोग्यांसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'द लेप्रोसी मिशन' या सेवाभावी संस्थेच्यावतीने देण्यात येणाऱ्या 'वेलेस्ली बेली' पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.
- वेलेस्ली बेली पुरस्कार 2024 साठी भारतातील माया रणावरे यांच्यासह जगभरातील चार जणांची निवड करण्यात आली आहे.
- कोरोना महासाथीमुळे मागील काही काळ हे पुरस्कार देण्यात आले नव्हते.
- 2024 हे वर्ष 'द लेप्रोसी' या संस्थेचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने चार जणांना पुरस्कार देण्यात आल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.
- माया रणावरे यांच्यासह म्यानमारमधील यू सो विन, बांगलादेशातील कमालउद्दिन आणि काँगो येथील सैंड्रा डोंगो बोटोलो यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

## डॉ. कारभारी काळे यांना मानद कर्नल पदवी

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी विश्वनाथ काळे यांना भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून प्रतिष्ठेची असलेली मानद कर्नल पदवी जाहीर करण्यात आली आहे.
- ही पदवी विशिष्ट सेवा पदक प्राप्त अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगिंदर सिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.
- या सोहळ्यासाठी कार्यकारी परिषदचे सदस्य, विद्या परिषदचे सदस्य तसेच विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

- संपूर्ण देशातून 19 विद्यापीठांच्या कुलगुरूमधून प्रा. डॉ. कारभारी काळे यांची निवड करण्यात आली आहे
- आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याचे प्रथम तंत्रशास्त्र विद्यापीठ असून या विद्यापीठास अभियांत्रिकी, फार्मसी, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजीचे सुमारे 340 महाविद्यालये संलग्नित आहेत.

## सुधा मूर्ती यांना लोकमान्य टिळक पुरस्कार जाहीर

- लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, सिद्धहस्त लेखिका आणि सुधा मूर्ती यांना 2024 चा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
- 'इन्फोसिस'चे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांना हा पुरस्कार यापूर्वीच प्रदान करण्यात आला असल्याने एकाच कुटुंबातील दोघांना हा पुरस्कार मिळणारे हे पहिलेच दाम्पत्य ठरले आहे.
- लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त 1 ऑगस्ट दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या कार्यक्रमात टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते मूर्ती यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.
- ज्येष्ठ नेते च शरद पवार, खासदार शाहू छत्रपती, काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला आणि ट्रस्टचे विश्वस्त सुशीलकुमार शिंदे उपस्थित राहणार आहेत.
- 2024 हे या पुरस्काराचे 42 वे वर्ष आहे.
- सुधा मूर्ती या नामवंत लेखिका आहेत. त्या इन्फोसिस फाउंडेशनच्या सहसंस्थापक आहेत. या संस्थेच्या माध्यमातून त्या सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांनी विविध क्षेत्रांत विकासकामांना प्रोत्साहन दिले आहे.

- कर्नाटकातील ग्रामीण भागांत आणि बंगळूर शहर व परिसरात त्यांनी सुमारे दहा हजार स्वच्छतागृहे उभारली आहेत.
- ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य देशाच्या विकासाला चालना देणारे ठरले आहे.

**पुरस्काराची सुरवात**

✓ लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची सुरुवात लोकमान्य टिळक ट्रस्टतर्फे लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीला 1 ऑगस्ट 1983 पासून करण्यात आली.

✓ एक लाख रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असते.

✓ 1983 या वर्षी पहिला लोकमान्य टिळक पुरस्कार एस. एम.जोशी यांना प्रदान करण्यात आला होता.

❖**पुरस्काराचे पूर्वीचे मानकरी:** एस. एम. जोशी ,गोदावरी परुळेकर, इंदिरा गांधी ,श्रीपाद अमृत डांगे, अच्युतराव पटवर्धन, खान अब्दुल गफार खान ,सुधाताई जोशी, मधु लिमये, बाळासाहेब देवरस, पांडुरंग शा

❖स्त्री आठवले, शंकर दयाळ शर्मा, अटलबिहारी वाजपेयी, टी. एन. शेषन, डॉ. रा. ना. दांडेकर, डॉक्टर मनमोहन सिंग, डॉक्टर आर. चिदंबरम, डॉ. विजय भटकर, राहुल बजाज ,प्राध्यापक एम. एस. स्वामीनाथन ,डॉ. वर्गीस कुरियन, रामोजी राव, एन. आर. नारायण मूर्ती, सॅम पित्रोदा, जी माधवन नायर, डॉ. ए. सिवाथानू पिल्लई, मॉन्टेकसिंग अहलुवालिया, प्रणव मुखर्जी, शीला दीक्षित ,डॉक्टर कोटा हरि नारायण, डॉक्टर विकास आमटे, डॉक्टर प्रकाश आमटे ,डॉक्टर श्रीधरण ,डॉक्टर अविनाश चंदेर, सुबैया अरुणन, शरद पवार, आचार्य बाळकृष्ण, डॉ. के. सिवन, बाबा कल्याणी, सोनम वांगचुक, डॉक्टर सायरस पुनावाला, डॉक्टर टेसी थॉमस , नरेंद्र मोदी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

------------------------




## भारत - थायलंड यांच्यात संयुक्त लष्करी सराव



- संयुक्त लष्करी सराव 'मैत्री'च्या 13व्या सत्रात भाग घेण्यासाठी भारतीय सैन्य दल 1 जुलै रोजी थायलंडला रवाना झाले.
- हा संयुक्त लष्करी सराव थायलंडच्या टाक प्रांतातील वाचिराप्राकन फोर्ट येथे 1 ते 15 जुलै 2024 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.
- याआधी सप्टेंबर 2019 मध्ये मेघालय मधील उमरोई येथे अशाप्रकाचा संयुक्त सराव झाला होता.
- भारतीय सैन्य दलात एकूण 76 सैनिकांचा समावेश असून त्यामध्ये मुख्यत्वे लडाख स्काउट्सच्या तुकडीचे जवान आणि इतर संरक्षण दले आणि सेवांमधील कर्मचाऱ्यांचा देखील समावेश आहे.
- रॉयल थायलंड सैन्यदलामध्ये प्रामुख्याने पहिल्या तुकडीतील चौथ्या डिव्हिजनच्या 14 इन्फंट्री रेजिमेंट मधील 76 जवानांचा समावेश आहे.

- भारत आणि थायलंड यांच्यात लष्करी सहकार्य वृद्धिंगत करण्याचे मैत्री या संयुक्त सरावाचे उद्दिष्ट आहे.
- या सरावामुळे संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या अध्याय VII अंतर्गत जंगल आणि शहरी पर्यावरणातील घुसखोरी / दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी दोन्ही देशांच्या लष्कराची क्षमतावृद्धी होईल.
- या सरावामध्ये उच्च दर्जाची शारीरिक तंदुरुस्ती, संयुक्त व्यवस्थापन आणि संयुक्तपणे विविध सामरिक कवायतींचा समावेश असेल.
- या सरावादरम्यान होणाऱ्या सामरिक कवायतींमध्ये संयुक्त परिचालन केंद्राची निर्मिती, गुप्तचर आणि देखरेख केंद्राची स्थापना, ड्रोनचा वापर आणि ड्रोन विरोधी यंत्रणा, लँडिंग साठी जागेची निश्चिती, लहान तुकडी रणनीती आणि एक्सट्रॅक्शन, स्पेशल हेलिबोर्न ऑपरेशन्स, घेराबंदी आणि शोध मोहीम, रूम इंटरव्हेंशन ड्रिल्स आणि बेकायदेशीर बांधकामे नष्ट करणे यांचा समावेश असेल.
- **मैत्री** सराव, दोन्ही देशांच्या लष्कराला त्यांच्या संयुक्त कारवाईसाठी रणनीती, तंत्र आणि कार्यपद्धती यांमधील सर्वोत्तम पद्धती सामायिक करण्यास सक्षम करेल.
- या सरावामुळे दोन्ही देशांच्या सैनिकांमधील आंतर-कार्यक्षमता, सौहार्द आणि सद्भाव वाढवण्यास मदत होईल.

## 'नोमॅडिक एलिफंट' : भारत - मंगोलिया संयुक्त युद्ध सराव



- भारत मंगोलियाचा 16 वा संयुक्त युद्ध सराव 'नोमॅडिक एलिफंट' मेघालयातील उमरोई येथील फॉरेन ट्रेनिंग नोड येथे प्रारंभ झाला.
- हा युद्धसराव 3 ते 16 जुलैदरम्यान संपन्न होईल.
- भारताच्या 45 जणांच्या पथकाचे प्रतिनिधित्व सिक्कीम स्काऊट्स ची

एका बटालियन तसेच अन्य शाखा आणि सेवा दलातील जवान करत आहेत.

- मंगोलियाच्या पथकाचे प्रतिनिधित्व मंगोलियन लष्कराच्या 150 क्विक रिअक्शन फोर्स बटालियन चे जवान करत आहेत.
- ‘नोमॅडीक एलिफंट’ हा वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा एक भाग असून तो आलटून पालटून मंगोलिया आणि भारतात आयोजित केला जातो.
- याआधीचा सराव मंगोलियात जुलै 2023 मध्ये आयोजित केला गेला.
- ‘नोमॅडीक एलिफंट’ या युद्धसरावाच्या उदघाटन प्रसंगी मंगोलियाचे भारतातील राजदूत डाम्बजाविन गनबोल्ड व भारतीय सैन्यदलातर्फे 51 सब एरिया जी ओ सी मेजर जनरल प्रसन्न जोशी उपस्थित होते.

**सरावाचे उद्दीष्ट:**

✓ संयुक्त राष्ट्रसंघ मॅण्डेट अंतर्गत सातव्या प्रकरणातील सब कॉन्व्हेंशनल सिनॅरिओ मधील घूसखोरीविरोधी मोहीमा चालवण्याच्या दृष्टीने दोन्ही देशांच्या संयुक्त लष्करी क्षमता वाढवणे हे या युद्धसरावाचे उद्दिष्ट आहे.

✓ या सरावात निमशहरी व डोंगराळ भागातील मोहिमांवर भर दिला गेला आहे.

✓ नोमॅडीक एलिफंट’ या युद्धसरावात दोन्ही देशांना संयुक्त मोहिमांमध्ये उपयोगी येणारी आपली युद्धकौशल्ये सामायिक करता येतील.

✓ या युद्धसरावामुळे दोन्ही देशांच्या सैन्यदलांमध्ये सहकार्य सुलभ होईल, बंधुभाव निर्माण होईल तसेच संबंधही सुधारतील.

✓ यामुळे या दोन्ही मित्रदेशांमधील संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढीस लागेल व द्विपक्षीय संबंधातही अधिक सुधारणा होईल.

## जपान-फिलिपिन्स यांच्यात करार



- चीनच्या वाढत्या वर्चस्वाच्या पार्श्वभूमीवर जपान आणि फिलिपिन्स या देशांमध्ये महत्त्वाचा संरक्षण करार झाला आहे.
- यामुळे फिलिपिन्समध्ये होणाऱ्या लष्करी सरावात जपान सहभागी होऊ शकणार आहे, जेणेकरून या भागात जपानी सैन्याचा वावर वाढणार आहे.
- दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानी सैन्याने फिलिपिन्सवर ताबा मिळविला होता. त्यामुळे अनेक वर्षे या दोन देशांमध्ये कटुता होती. मात्र, चीन या दोघांना आव्हानात्मक ठरणाऱ्या देशाचे बळ वेगाने वाढत असल्याने या दोन देशांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

## त्रिपुट जहाजाचे जलावतरण

- भारतीय नौदलासाठी गोवा शिपयार्ड लिमिटेड(जीएसएल) तयार करत असलेल्या दोन प्रगत युद्धनौकांपैकी या पहिल्या युध्दनौकेचे 23 जुलै 24 रोजी जीएसएल , गोवा येथे जलावतरण करण्यात आले.
- सागरी परंपरेनुसार, अथर्ववेदाच्या मंत्रोच्चारात गोव्याचे राज्यपाल पी एस श्रीधरन पिल्लई यांच्या उपस्थितीत रीता श्रीधरन यांच्या हस्ते जहाजाचे जलावतरण करण्यात आले.
- भारतीय नौदलाच्या अदम्य भावनेचे तसेच दूरवर आणि खोलवर मारा करण्याच्या क्षमतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शक्तिशाली बाणावरून या जहाजाचे नाव त्रिपुट ठेवण्यात आले आहे.
- 25 जानेवारी 2019 रोजी संरक्षण मंत्रालय आणि गोवा शिपयार्ड लिमिटेड यांच्यात त्रिपुट श्रेणीतील दोन प्रगत युद्धनौका तयार करण्याच्या करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती .
- शत्रूच्या क्षेत्रातील जहाजे, पाणबुड्या आणि विमानांविरुद्ध लढाऊ कारवाईच्या दृष्टीने या जहाजांची रचना करण्यात आली आहे.

**वैशिष्ट्ये:**

✓ त्रिपुट श्रेणीची जहाजे 124.8 मीटर लांब आणि 15.2 मीटर रुंद आहेत.

- ✓ पाण्याखालील खोली 4.5 मीटर आहे.
- ✓ त्याचे वजन अंदाजे 3600 टन आहे.
- ✓ गती कमाल 28 सागरी मैल आहे .
- ✓ ही जहाजे स्टेल्थ वैशिष्ट्ये, प्रगत शस्त्रे आणि सेन्सर्स आणि प्लॅटफॉर्म व्यवस्थापन प्रणालींनी सुसज्ज आहेत.
- ✓ जीएसएलमध्ये जहाजबांधणी झालेल्या त्रिपुट श्रेणीतील जहाजे रशियाकडून विकत घेतलेल्या तेग आणि तलवार श्रेणीच्या जहाजांप्रमाणे आहेत.
- ✓ भारतीय शिपयार्डद्वारे प्रथमच स्वदेशात या युद्धनौका बनवल्या जात आहेत.
- ✓ 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमाच्या अनुषंगाने, शस्त्रास्त्रे आणि सेन्सर्ससह बहुतांश उपकरणे आणि सुटे भाग स्वदेशी आहेत.
- ✓ यामुळे भारतीय उत्पादन कंपनीद्वारे मोठ्या प्रमाणावर संरक्षण उत्पादन , देशात रोजगार निर्मिती आणि क्षमता वृध्दी सुनिश्चित होईल.

-------------------------

# आरोग्य व पोषण

## केरळमध्ये अमिबाचा चौथा रुग्ण आढळला



- केरळमध्ये मेंदू कुरतडणारा अमिबा संसर्गाने बाधित आणखी एक रुग्ण आढळून आला आहे.
- हा रुग्ण उत्तर केरळच्या पय्योली जिल्ह्यातील असून पीडित मुलाला एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
- या आजाराला अमीबिक मेनिंगोएन्सेफलाइटिस असे म्हटले जाते.
- या आजारामुळे आतापर्यंत तीन मुले मृत्युमुखी पडले आहेत.
- या आजाराने ग्रस्त असलेला मे महिन्यानंतरचा हा पहिला आणि एकूण चौथा रुग्ण आहे.
- या आजाराने आतापर्यंत तिघांचा मृत्यू झाला आहे.

## मेंदू खाणारा अमिबा म्हणून प्रसिद्ध

- ✓ यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोलच्या मते, पीएएम हा मेंदूचा संसर्ग आहे जो अमीबा किंवा नेग्लेरिया फॉवलेरी नावाच्या एकल-पेशी जीवांमुळे होतो.
- ✓ हा अमीबा तलाव, नद्या आणि गरम पाण्याचे झरे यांसारख्या माती आणि उबदार गोड्या पाण्यात राहतो.
- ✓ याला सामान्यतः 'ब्रेन इटिंग अमिबा' असे म्हणतात कारण जेव्हा अमिबा असलेले पाणी नाकात जाते तेव्हा ते मेंदूला संक्रमित करते.
- ✓ 'प्रायमरी अमीबिक मेनिंगोएन्सेफलायटिस' म्हणजेच पीएएम या आजारात मेंदू खाणारा अमिबा मानवी मेंदूला संक्रमित करतो आणि मांस खातो.
- ✓ हा सामान्य अमिबा नाही, ज्याचा संसर्ग प्रतिजैविकांनी बरा होऊ शकतो. हे इतके जीवघेणे आहे की जर संसर्ग वेळीच थांबला नाही तर 5 ते 10 दिवसात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होऊ शकतो.
- ✓ **लक्षणे**: डोकेदुखी, ताप, उलट्या होणे, झटके येणे

## पुण्यात झिका व्हायरसचा शिरकाव



- महाराष्ट्रातील पुणे शहरात झिका व्हायरसचे रुग्ण आढळून आलेले आहेत.
- 9 जुलै 2024 पर्यंत पुणे शहरात 15 रुग्णांची नोंद करण्यात आली होती

### झिका व्हायरस म्हणजे काय?

- ✓ झिका व्हायरस रोग किंवा झिका ताप हा मुख्यतः संक्रमित एडीस इजिप्ती (मादी)प्रजातीच्या डासांच्या चावण्याने होतो .
- ✓ एडिस डास प्रामुख्याने दिवसा चावतात, विशेषत: पहाटे आणि दुपार/संध्याकाळच्या वेळी.

**गर्भवती महिलांना अधिक धोका...**

- एखाद्या गर्भवती महिलेला संक्रमित डासाने चावा घेतल्यास झिका विषाणू प्लेसेंटामध्ये प्रवेश करू शकतो आणि गर्भावर परिणाम करू शकतो.
- झिका विषाणूचा संसर्ग कोणालाही होऊ शकतो, परंतु गर्भवती महिलांना गर्भपात होण्याची शक्यता अधिक असते आणि गर्भाच्या मायक्रोसेफली आणि इतर न्यूरोलॉजिक विकृती यांसारख्या जन्मजात विकृतींचा परिणाम झिका विषाणूच्या बाळामध्ये होतो.
- झिका आजारावर कोणतीही लस किंवा औषध नाही.
- **लक्षणे :** ताप, पुरळ, डोकेदुखी ,सांधेदुखी, डोळे लाल होणे ,स्नायूदुखी
- झीकावर निश्चित उपचार नसल्याने रुग्णाला दिसणाऱ्या लक्षणांवर औषधे दिली जातात भरपूर पाणी पिणे पुरेशी विश्रांती आणि सात्विक आहार यातून रुग्ण बरा होऊ शकतो.
- झिका विषाणू रोग हा स्पॉन्डवेनी गटातील फ्लॅविव्हायरस वंशातील फ्लॅविविरिडे कुटुंबातील विषाणूमुळे होतो.
- हे प्रथम 1947 मध्ये युगांडाच्या झिका जंगलातील माकडापासून वेगळे केले गेले होते, त्यानंतर 1948 मध्ये त्याच जंगलातील डासांमध्ये (एडीस आफ्रिकनस) आणि 1952 मध्ये नायजेरियातील एका माणसामध्ये लक्षणे दिसून आली.

## 16 लाख बालके लशी पासून वंचित



- ज्या बालकांना 2023 मध्ये एकही लस देण्यात आलेली नाही अशा बालकांच्या संख्येमध्ये भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे.
- भारतातील सुमारे 16 लाख बालकांना या वर्षात एकही लस देण्यात आलेली नाही,

- नायजेरियाचा यात पहिला क्रमांक असून त्या देशात झिरो डोस बालकांची संख्या 21 लाख इतकी आहे .
- युनिसेफच्या अहवालात ही आकडेवारी समोर आली आहे.

**अहवालातील निरीक्षणे:**

✓ 2019 मधील कोरोनाच्या साथीपूर्वीच्या तुलनेत 2023 मध्ये 27 लाख बालके लशीपासून वंचित

✓ लस न घेतलेल्या मुलांना गंभीर आजार होण्याचा धोका

✓ शून्य लसीकरणातील 20 देशांच्या क्रमवारीत चीनचा 18 वा तर पाकिस्तानचा 10 वा क्रमांक

✓ लसीकरण न झालेल्या बालकांच्या 2021मधील संख्येच्या आधारे 20 देशांना 'लसीकरण मोहीम 2030' साठी प्राधान्य

✓ भारतात गोवरप्रतिबंध लशीचा(एमसीव्ही १') पहिला डोस न घेतलेल्या बालकांची संख्या 2023मध्ये 16 लाख होती. यात देशाचा क्रमांक तिसरा होता

✓ राष्ट्रीय लसीकरण धोरणानुसार साधारणपणे 9 किंवा 12 महिन्यांच्या बालकांना 'एमसीव्ही १' लसीकरण केले जाते. यात ९३ टक्क्यांपर्यंत घट.

✓ लसीकरणाचे प्रमाण 2019 पेक्षाही 93 टक्के होते. 2023 मध्ये ते आणखी कमी झाले.

**2023 मध्ये 'झिरो डोस' बालकांची संख्या सर्वाधिक असलेले देश:**

1) नायजेरिया - 21 लाख
2) भारत - 16 लाख
3) इथिओपिया - 9.17 लाख
4) कांगो - 8.39 लाख
5) सुदान - 7.01 लाख

## केरळमध्ये निपाहचा पहिला बळी

- निपाह संसर्गावर उपचार सुरू असलेल्या एका 14 वर्षीय मुलाचा केरळमधील मलप्पुरम येथील रुग्णालयात मृत्यू झाला.
- 'पांडिक्कड येथील निपाह संसर्ग झालेल्या या मुलाला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. तो बेशुद्धावस्थेत

होता. 21 जुलै रोजी सकाळी 10.50 वाजता त्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर त्याला वाचवण्याचे बरेच प्रयत्न करण्यात आले; परंतु सकाळी 11.30 वाजता त्याचे निधन झाले.

## निपाह विषाणू

- ✓ फळांच्या वटवाघळांपासून आणि डुकरांसारख्या प्राण्यांपासून उद्भवणाऱ्या निपाह विषाणूमुळे मानवांमध्ये मेंदूला सूज येऊन प्राणघातक ताप येऊ शकतो.
- ✓ निपाह प्रादुर्भावासाठी उच्च जोखमीचे क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे केरळ, त्याचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना राबवत आहे.
- ✓ निपाह विषाणू मलेशियामध्ये 1998 मध्ये पोर्सिन न्यूरोलॉजिक आणि श्वसन रोग म्हणून उदयास आला जो जिवंत, संक्रमित डुकरांच्या संपर्कात असलेल्या मानवांमध्ये पसरला

## लक्षणे

- ➢ निपाह विषाणूची लागण झालेल्यांना अनेक आजारांनी ग्रासले आहे. लक्षणे नसलेल्या (सबक्लिनिकल) संसर्गापासून ते तीव्र श्वसनाचे आजार आणि घातक एन्सेफलायटीस यामुळे लोकांमध्ये गंभीर आजार आणि मृत्यू होऊ शकतो, ज्यामुळे सार्वजनिक आरोग्याची चिंता निर्माण होते.
- ➢ डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार , विषाणूची लागण झालेल्यांना सुरुवातीला ताप, डोकेदुखी, मायल्जिया (स्नायू दुखणे), उलट्या आणि घसा खवखवणे ही लक्षणे दिसतात.
- ➢ यानंतर चक्कर येणे आणि तीव्र एन्सेफलायटीस दर्शविणारी न्यूरोलॉजिकल चिन्हे येऊ शकतात.
- ➢ काही लोकांना ॲटिपिकल न्यूमोनिया आणि तीव्र श्वासोच्छवासाच्या त्रासासह गंभीर श्वसन समस्या देखील येऊ शकतात .एन्सेफलायटीस आणि फेफरे गंभीर प्रकरणांमध्ये होतात, 24 ते 48 तासांच्या आत कोमात जातात.


Current Affairs
Daily News
THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
25 Sept 2024
THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR
@theofficermentor
@mpscanswerwritingpractice
9665666195 \ 9665288834
Download
Our Free
App
अधिकच्या चालू घडामोडींचा अभ्यास
करण्यासाठी Weekly Current Affairs
चे Session आवर्जून पहा.
4/4
DOWNLOAD OUR
FREE APP
www.THEOFFICER.in
9665666195 / 9665288834